# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्रं. - १३** **// महासभा बैठकीचे कार्यवृत्त //** **दि.२९/०८/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि. २९/०८/२०१९ गुरूवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर . सौ.सिमा सुरेश भोळे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करून खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.सिमा सुरेश भोळे, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| सोनवणे अश्विन शांताराम | पाटील सचिन भिमराव | ढेकळे सदाशिव गणपत |
| जोहरे प्रिया मधुकर | चौधरी मनोज सुरेश | पाटील राजेंद्र झिपरु |
| नेरकर सरिता अनंत | भोईटे लताबाई रणजीत | महाजन सुनिल सुपडू |
| पोकळे दिलिप बबनराव | पाटील प्रतिभा सुधिर | महाजन जयश्री सुनिल |
| खान रुकसानाबी गबलु | पाटील चंद्रशेखर शिवाजी | नाईक प्रशांत सुरेश |
| सोनवणे कांचन विकास | देशमुख प्रतिभा गजानन | बालाणी भगतराम रावलमल |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | पाटील विजय पुडलिक | अत्तरदे रजनी प्रकाश |
| शिंदे गायत्री उत्तम | सोनवणे सुरेश माणिक | काळे रेश्मा कुंदन |
| बाविस्कर किशोर रमेश | बारी शोभा दिनकर | आहुजा मनोज नारायणदास |
| सपकाळे मिना धुडकु | शेख हसीनाबी शरीफ | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| सपकाळे रंजना भरत | पाटील कुलभुषण विरभान | सोनार रंजना विजय |
| कोल्हे प्रविण रामदास | भिल पार्वताबाई दामु | खडके सुनिल वामनराव |
| सनकत चेतन गणेश | पाटील उषा संतोष | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| सोनवणे भारती कैलास | बरडे नितीन मनोहर | देशमुख सुन्नाबी राजु |
| चौधरी चेतना किशोर | बेंडाळे उज्वला मोहन | शेख सैईदा युसुफ |
| सोनवणे मुकुंदा भागवत | राणे गायत्री इंद्रजित | पटेल इब्राहिम मुसा |
| भंगाळे विष्णू रामदास | जोशी अनंत हरिश्चंद्र | सोनवणे विक्रम किसन |
| तायडे ज्योती शरद | तायडे सुरेखा नितीन | कैलास नारायण सोनवणे |
| लढढा नितीन बालमुकुंद | चव्हाण ज्योती बाळासाहेब | विशाल राधेश्याम त्रिपाठी |
| काळे अमित पांडुरंग | मराठे जितेंद्र भगवान | राजेंद्र नारायण मराठे |
| चौधरी मंगला संजय | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | महेश रतन चौधरी |
| अड.हाडा शुचिता अतुलसिंह | पाटील रेखा चुडामण | भागचंद मोतीलाल जैन |
| सोनवणे धिरज मुरलीधर | सोनवणे सुरेखा सुदाम | |

सदर सभेस मा. आयुक्त, डॉ.उदय टेकाळे , मा.उपायुक्त.श्री.मिनानाथ दंडवते , मा.उपायुक्त.श्री.उत्कर्ष गुटे , मा.उपायुक्त.श्री. अजित मुठे, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते .

सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा .सदस्या सोनवणे राखी शामकांत , काळे दिपमाला मनोज , कोल्हे सिंधू विजय , सोनवणे लताबाई चंद्रकांत ,कोल्हे ललीत विजय , कापसे मयुर चंद्रकांत यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेले आहेत.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१९५ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | सिमा सुरेश भोळे, मा.महापौर | भारत सरकारच्या माजी परराष्ट्र व्यवहार मंत्री स्व. सुष्मा स्वराज, माजी केंद्रीय अर्थ मंत्री स्व.अरुणजी जेटली, महाराष्ट्र राज्याचे विशेष सरकारी वकील श्री.उज्वलजी निकम यांचे बंधू जेष्ठ सरकारी वकील पद्मश्री स्व.दिलीप देवराम निकम, मनपा कर्मचारी श्री.पुरुषोत्तम हिरालाल जोशी यांच्या मातोश्री स्व.कमलाबाई हिरालाल जोशी, मनपा प्रभाग क्रमांक ७ मधील रहिवासी स्व.रविंद्र भावसार, शहरातील जुने जळगांव परिसरातील स्व.मुक्ताबाई खिवराज खडके यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| २. | डॉ.अश्विन शांताराम सोनवणे, मा.उपमहापौर<br>धिरज मुरलीधर सोनवणे | देशाच्या अर्थमंत्री आणि संरक्षणमंत्री पदाची जबाबदारी साभाळलेल्या श्री.अरुणजी जेटली, भाजपाच्या धुरंधर महिला नेत्या व देशाच्या माजी परराष्ट्र व्यवहार मंत्री स्व.सुषमा स्वराज यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ३. | प्रविण रामदास कोल्हे | माजी केंद्रीय अर्थ मंत्री स्व.अरुणजी जेटली, शहरातील मनसे पक्षाचे पदाधिकारी स्व.घनश्याम शांताराम दिक्षित, ज्ञानदेव नगर परिसरातील सेवानिवृत्त शिक्षक, स्व.कौतिक नागो पाटील, ज्ञानदेव नगर परिसरातील स्व.सिंधूबाई गोविंदा पाटील, ज्ञानदेव नगर परिसरातील स्व.मुरलीधर जयराम सावदेकर यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ४. | ललित विजयराव कोल्हे<br>नवनाथ विश्वनाथ दारकुंडे<br>रेश्मा कुंदन काळे<br>मनोज नारायणदास आहुजा | भारत सरकारच्या माजी परराष्ट्र व्यवहार मंत्री स्व. सुष्मा स्वराज, माजी केंद्रीय अर्थ मंत्री तथा दिल्ली क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष, स्व.अरुणजी जेटली, शहरातील मनसे पक्षाचे पदाधिकारी स्व.घनश्याम शांताराम दिक्षित यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ५. | लताताई रणजितराव भोईटे | महाराष्ट्र राज्याचे विशेष सरकारी वकील श्री.उज्वलजी निकम यांचे बंधू माजी जिल्हा परिषद सदस्य, जेष्ठ सरकारी वकील स्व.दिलीप देवराम निकम, भारतीय जनता पार्टीचे मंडल अध्यक्ष श्री शक्ती महाजन यांच्या मातोश्री कै.बेबाबाई महाजन, ज.जि.म.वि.प्र.सह.समाज लि.जळगांव या संस्थेचे चेअरमन कै.जगन्नाथ गंगाराम पवार, जळगांव महानगरपालिकेचे माजी नगरसेवक कै.उल्हास देवराम साबळे यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ६. | डॉ.चंद्रशेखर शिवाजीराव पाटील | भारत सरकारच्या माजी परराष्ट्र व्यवहार मंत्री स्व. सुष्मा स्वराज, ज.जि.म.वि.प्र.सह.समाज लि.जळगांव या संस्थेचे चेअरमन कै.जगन्नाथ गंगाराम पवार, जळगांव शहरातील खोटे नगर परिसरातील सामाजिक कार्यकर्ते श्री.सुशिल शिंदे यांच्या आजी स्व.द्रोपदाबाई आत्माराम शिंदे, शहरातील खोटे नगर परिसरातील रहिवासी स्व.बाळू गोकूळ पाटील यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ७. | पार्वताबाई दामू भिल<br>रंजना विजय वानखेडे<br>अड.शुचिता अतुलसिंह हाडा | भाजपाच्या धुरंधर महिला नेत्या व देशाच्या माजी परराष्ट्र व्यवहार मंत्री स्व. सुष्मा स्वराज तसेच देशाचे अर्थमंत्री आणि संरक्षणमंत्री पदाची जबाबदारी साभाळलेल्या श्री.अरुणजी जेटली यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ८. | किशोर रमेश बाविस्कर | राज्यात अलिकडेच उद्भवलेल्या अतिवृष्टी व पुर परिस्थितीत जिवीत व वित्त हाणी झाली त्याबद्दल हळहळ व्यक्त करुन मृतांबाबत श्रध्दांजली, तसेच भाजपाच्या धुरंधर महिला नेत्या व देशाच्या माजी परराष्ट्र |

| | | |
|---|---|---|
| | | व्यवहार मंत्री स्व. सुष्मा स्वराज तसेच देशाच्या अर्थमंत्री आणि संरक्षणमंत्री पदाची जबाबदारी साभाळलेल्या श्री.अरुणजी जेटली, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष स्व.भिला गोटु सोनवणे तसेच श्री.प्रभाकर गोटु सोनवणे यांच्या भगिनी स्व.सरस्वती बळीराम सपकाळे यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ९. | उषाताई संतोष पाटील | माजी केंद्रीय अर्थ मंत्री तथा दिल्ली क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष, स्व.अरुणजी जेटली, शहरातील मनसे पक्षाचे पदाधिकारी स्व.घनश्याम शांताराम दिक्षित यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| १०. | विष्णु रामदास भंगाळे | श्री पणन महासंघाचे संचालक व जिल्हा बँकेचे संचालक श्री.संजय मुरलिधर पवार यांचे काका सरपंच श्री.सचिन पवार यांचे वडील स्व.जे.जे.पवार, डॉ.के.के.भोळे व तुकाराम भोळे यांच्या मातोश्री तर मृदंग इंडियाचे अनंत भोळे यांच्या आजी स्व.गीताबाई भोळे, शामसुंदर व प्रकाश रामकृष्ण मुंगड यांचे बंधु स्व.डॉ.कैलास रामकृष्ण मुंगड यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ११. | शोभाताई दिनकर बारी | जुने जळगांव येथिल रहिवासी स्व.गयाबाई खंडू बारी व हरिविठ्ठल नगर येथिल रहिवासी स्व.देविदास हरि बारी यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| १२. | महेश रतन चौधरी | शहरातील मनसे पक्षाचे पदाधिकारी स्व.घनश्याम शांताराम दिक्षित यांचे दु:खद निधनाबद्दल. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१९६ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १ | सिमा सुरेश भोळे,मा.महापौर<br>नवनाथ विश्वनाथ दारकुंडे | भारतीय जागतिक बॅडमिंटनपटू पी.व्ही.सिंधू जागतिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्ण पदक जिंकणारी पहिली भारतीय महिला खेळाडूचा मान मिळवून भारताचे नांव लौकीक केल्याबद्दल तसेच सन्मा.नगरसेविका, सौ.भारती कैलास सोनवणे, सौ.पार्वताबाई दामू भिल, सन्मा.नगरसेवक, श्री.सदाशिव गणपतराव ढेकळे, श्री.नितीन मनोहर बरडे यांची जळगांव जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल हार्दीक अभिनंदन.<br>भारतीय संसदेने घेतलेल्या ऐतिहासिक जम्मु कश्मिरचा कलम ३७० रद्द करुन भारताला पुर्ण करुन अखंड भारताचे स्वप्न करणे कामी मा.ना.श्री.अमितजी शाह यांनी प्रस्तावित केलेला प्रस्ताव व मा.ना.श्री.नरेंद्रजी मोदी यांचे अथक प्रयत्नाने सदर अखंड भारताचा प्रस्ताव मंजुर केल्याबद्दल मा.ना.श्री.नरेंद्रजी मोदी,पंतप्रधान व मा.ना.श्री.अमितजी शाह, गृहमंत्री भारत सरकार यांचे हार्दीक अभिनंदन. |

| | | |
|---|---|---|
| | | मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणविस,मुख्यमंत्री, मा.ना.श्री.चंद्रकांतदादा पाटील, महसूल मंत्री, मा.ना.श्री.गिरीषजी महाजन, पालकमंत्री, मा.श्री.एकनाथरावजी खडसे,माजी मंत्री, मा.आ.श्री.सुरेश भोळे यांनी जळगांव महानगरपालिकेचे हुडकोचे कर्ज माफ करुन जळगांव महानगरपालिकेस हुडकोच्या कर्जातुन मुक्तता करुन दिल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| २ | डॉ.अश्विन शांताराम सोनवणे, मा.उपमहापौर<br>उज्वला मोहन (किरण)बेंडाळे | मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणविस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व त्यांचे मंत्रीमंडळ, मा.ना.श्री.गिरीषजी महाजन, पालकमंत्री, मा.आ.श्री.सुरेश भोळे, मा.आ.श्री.चंदुभाई पटेल, मा.महापौर,सौ.सिमा सुरेश भोळे, मनपा,आयुक्त, श्री.उदय टेकाळे, उपायुक्त तसेच लेखापरिक्षक,श्री.संतोष वाहुळे आणि अधिकारी यांनी तळमळीने केलेल्या प्रयत्नामुळे जळगांव महानगरपालिकेचे हुडकोचे कर्ज माफ करुन कर्जमुक्तीकरीता अर्थसहाय्य उपलब्ध करुन देवुन जळगांव महानगरपालिकेस हुडकोच्या कर्जातुन मुक्तता करुन दिल्याबद्दल हार्दीक अभिनंदन.<br>भारतीय संसदेने घेतलेल्या ऐतिहासिक जम्मु कश्मिरचा कलम ३७० रद्द करुन भारताला पुर्ण करुन अखंड भारताचे स्वप्न करणे कामी मा.ना.श्री.अमितजी शाह यांनी प्रस्तावित केलेला प्रस्ताव व मा.ना.श्री.नरेंद्रजी मोदी यांचे अथक प्रयत्नाने सदर अखंड भारताचा प्रस्ताव मंजुर केल्याबद्दल मा.ना.श्री.नरेंद्रजी मोदी,पंतप्रधान व मा.ना.श्री.अमितजी शाह, गृहमंत्री भारत सरकार, मा.राज्यसभा, मा.लोकसभा यांचे हार्दीक अभिनंदन.<br>चंद्रयान २ हया महत्वाकांक्षी मोहीमेचे आजवरचे सर्व टप्पे यशस्वी झालेले असुन नुकताच चंद्रयानाने चंद्राच्या कक्षेत प्रवेश केला या महत्वाकांक्षी आणि तितक्याच आगळयावेगळया व कमी खर्चात पुर्ण करण्यात येत असलेल्या मोहीमेने अवघ्या जगाचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले आहे. २ मुळे चंद्राचा शोध घेण्याच्या मानवी कार्यक्रमाला बळ मिळेल त्याच बरोबर आजवर दुर्लक्षित राहीलेल्या चंद्राच्या दक्षिण ध्रृवावर प्रकाशझोत पडणार आहे. अवघ्या मानवजातीसाठी ही गोष्ट महत्वपुर्ण असुन आपल्यासाठी ते भुषणावह असल्याने या मोहीमेबद्दल इस्त्रो आणि भारत सरकार यांचे हार्दीक अभिनंदन. |
| ३ | डॉ.चंद्रशेखर शिवाजीराव पाटील<br>पार्वताबाई दामू भिल<br>राजेद्र नाराण मराठे<br>रंजना विजय वानखेडे | जम्मु कश्मिरचा ३७०, ३५ ए कलम रद्द करणे कामी मा.ना.श्री.अमितजी शाह यांचा प्रस्ताव व मा.ना.श्री.नरेंद्रजी मोदी यांचे अथक प्रयत्नाने सदर अखंड भारताचा प्रस्ताव मंजुर केल्याबद्दल मा.ना.श्री.नरेंद्रजी मोदी,पंतप्रधान व मा.ना.श्री.अमितजी शाह, गृहमंत्री भारत सरकार यांचे हार्दीक अभिनंदन. |

| | | |
|---|---|---|
| | | मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणविस,मुख्यमंत्री, मा.ना.श्री.चंद्रकांतदादा पाटील, महसूल मंत्री, मा.ना.श्री.गिरीषजी महाजन, पालकमंत्री, मा.आ.श्री.सुरेश भोळे यांनी जळगांव महानगरपालिकेचे हुडकोचे ५० टक्के कर्ज माफ करुन करुन दिल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ४ | नवनाथ विश्वनाथ दारकुंडे | मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे महाजनादेश यात्रा आगमनाच्या वेळी ज्या समाज बांधवांच्या वतीने सत्कार करण्यात आला त्या समाज बांधवांचे हार्दीक अभिनंदन, मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे महाजनादेश यात्रा आली असुन त्यावेळी सभेत मा.मुख्यमंत्री यांनी मतदारांशी व कार्यकर्त्यांशी सवांद साधुन सरकारने केलेल्या कामाबद्दल सभेत सवांद साधला त्याबद्दल हार्दीक अभिनंदन. मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन,पालकमंत्री यांचे हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव येथे १५ ऑगष्ट २०१९ रोजी स्वातंत्र दिनानिमित्त झेंडावंदन करण्यात आलेबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ४ | राजेंद्र नारायण मराठे | मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन,पालकमंत्री यांचे हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव येथे १५ ऑगष्ट २०१९ रोजी स्वातंत्र दिनानिमित्त झेंडावंदन करण्यात आलेबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ५ | इब्राहीम मुसा पटेल | मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणविस, मुख्यमंत्री, मा.ना.श्री.गिरीषजी महाजन, पालकमंत्री, मा.आ.श्री.सुरेश भोळे यांनी जळगांव महानगरपालिकेचे हुडकोचे कर्ज माफ करुन जळगांव महानगरपालिकेस हुडकोच्या कर्जातुन मुक्तता करुन दिल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ६ | शोभाताई दिनकर बारी | कोमालिका बारी हिने जमशेदपुर येथे झालेल्या जागतिक युवा तिरंदाजी स्पर्धेत सुवर्णपदक पटकविल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने वरील सर्व पदाधिकारी, सन्मा.नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक संस्था यांचे हे सभागृह अभिनंदन करीत असुन उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहे.

**दि.२९/०८/२०१९ चे महासभेसाठी आरोग्य विभागासंबंधीत सन्मा.सदस्य श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा यांनी मांडलेली लक्षवेधी**

संपुर्ण जळगांव शहरातील स्वच्छतेचा मोठा प्रश्न सद्यस्थितीत उद्भवलेला आहे हे आपणास ज्ञात असेलच- स्थानिक दैनिक व ईलेक्ट्रानिक मिडीया (व्हॉटसअप+फेसबुक) च्या माध्यमातुन शहरातील स्वच्छतेवर सतत प्रश्न उपस्थित होत असुन महानगरपालिकेच्या कामकाजासंबंधात नकारात्मक टिपण्या व बातम्या प्रसिध्द होत असुन त्यामुळे महापालिकेची प्रतिष्ठा पणाला लागलेली आहे. नुकतेच साफसफाई व स्वच्छता कामाच्या एकमुस्त मक्ता वॉटरग्रेस कंपनीला दिलेला असुन सदर मक्तेदाराचे काम हे फारच असमाधानकारक व वेळ काढु प्रकाराचे दिसुन येत आहे. यास्तव या सर्व स्वच्छता विषयक मुद्दयांवर महासभेत तातडीने चर्चा करुन साफसफाईचे काम कशा प्रकारे सुव्यवस्थित होईल या दृष्टीने चर्चा करुन कामकाजासंबंधात दिशानिर्देश करणे गरजेचे झालेले आहे. जेणे करुन पावसाळयाचे दिवस लक्षात घेता शहरात रोगराई फोफावुन अनिष्ट घटना घडु नये यासाठी सदरची लक्षवेधी यथाशिघ्र चर्चेत घेणे संबंधात विनंती आहे.

**दि.२९/०८/२०१९ चे महासभेसाठी आरोग्य विभागासंबंधीत सन्मा.सदस्य श्री.कैलास नारायण सोनवणे यांनी मांडलेली लक्षवेधी**

संपुर्ण जळगांव शहरातील स्वच्छतेचा मोठा प्रश्न सद्यस्थितीत उद्भवलेला आहे हे आपणास ज्ञात असेलच- स्थानिक दैनिक व ईलेक्ट्रानिक मिडीया (व्हॉटसअप+फेसबुक) च्या माध्यमातुन शहरातील स्वच्छतेवर सतत प्रश्न उपस्थित

होत असुन महानगरपालिकेच्या कामकाजासंबंधात नकारात्मक टिपण्या व बातम्या प्रसिध्द होत असुन त्यामुळे महापालिकेची प्रतिष्ठा पणाला लागलेली आहे. नुकतेच साफसफाई व स्वच्छता कामाच्या एकमुस्त मक्ता वॉटरग्रेस कंपनीला दिलेला असुन सदर मक्तेदाराचे काम हे फारच असमाधानकारक व वेळ काढु प्रकाराचे दिसुन येत आहे. यास्तव या सर्व स्वच्छता विषयक मुद्दयांवर महासभेत तातडीने चर्चा करुन साफसफाईचे काम कशा प्रकारे सुव्यवस्थित होईल या दृष्टीने चर्चा करुन कामकाजासंबंधात दिशानिर्देश करणे गरजेचे झालेले आहे. जेणे करुन पावसाळयाचे दिवस लक्षात घेता शहरात रोगराई फोफावुन अनिष्ट घटना घडु नये यासाठी सदरची लक्षवेधी यथाशिघ्र चर्चेत घेणे संबंधात विनंती आहे.

**नगरसचिव :-** या ठिकाणी दोन सन्मा.सदस्य श्री.नितीन लढढा आणि श्री.कैलास सोनवणे यांनी लक्षवेधी मांडलेली आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** मागच्या वेळेस मी जी लक्षवेधी मांडलेली होती त्याचा Present Status जाणुन घ्यायचे आहे. १७ ऑगस्ट २०१९ ला मक्तेदाराचा टेंडर संपणार आहे असा सांगण्यात आले होते. तर पुढे काय करण्यात आलेले आहे त्या लक्षवेधी बद्दल, सर्व सभागृहाचा हा विषय आहे आणि सर्व जळगांवच्या लाईटसची व्यवस्था तशीच आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** सर्वात पहिले मी सर्वांना जागतिक खेळ दिनाच्या शुभेच्छा देतो. एकुण दोन लक्षवेधी आलेली आहे. एक नितीन भाऊंनी दिली, एक मी टाकलेली आहे. माझा कमी अभ्यास झालेला आहे म्हणुन मी पहिले आणि शॉर्ट मध्ये बोलत आहे. नितीन भाऊंचा डिप मध्ये अभ्यास झालेला असेल कारण माणुस जेव्हा विरोधी पक्षात असतो तो अभ्यासाला लागुन जातो, आणि सत्तेत जेव्हा येतो त्याला गंज चढतो, आळस येतं. ठेकेदाराशी जो करारनामा केलेला आहे आणि अ,ब,क,ड या प्रमाणे तो करारनामा केलेला आहे. वृत्तपत्र, काही नागरीक यांच्या काही तक्रारी वृत्तपत्रातुन वाचण्यात आल्या. विशेष तर दिव्य मराठी, लोकमत आणि बाकी सर्व पेपर. या पेपरांमध्ये वाजवी तक्रारी आल्या. त्या मध्ये सत्य ही होते. जेव्हा मी काल महापालिकेच्या बिल्डींग मध्ये आलो आणि बसलो कमीत कमी आम्हाला १०.००- १०.३० वाजुन गेले होते. चार सी.एस.आय. आपले दंडवते साहेब संबंधीत क्लर्क आणि बाकीचे लोकं, या लोकांना माझ्या मुळे त्रास झाला. रात्री १०.३० वाजेपावेतो आम्ही कार्यालयात होतो आणि ते सर्व लिहीण्यास सुरूवात केली आणि जे जे अनुभवले त्यामध्ये प्रथमदर्शनी असे दिसुन आले की मक्तेदाराची चुक झालेली आहे तर मक्तेदाराची काय चुक झालेली आहे तर त्याचे फक्त जे ट्रॅक्टर लावायचे आहे याठिकाणी १० ट्रॅक्टर जर त्याने लावले असते आणि व्यवस्थित यंत्रणा लावली असती तर आज जळगांवचे चित्र वेगळे राहीले असते आणि जर असे झाले असते तर ईतक्या तक्रारी व वृत्तपत्रामधुन बातम्या आल्या नसत्या व नागरीकांनाही त्याचा त्रास झाला नसता मक्तेदाराचा जो ठराव झाला होता तो ६ जून रोजी जनरल मिटींग मध्ये झालेला होता व दुसरा ठराव जो झालेला आहे स्टँडीग मिटींग मध्ये तो ६ जुलै रोजी झालेला आहे आणि त्यानंतर १६ ऑगस्ट व २१ ऑगस्टला कार्यादेश देण्यात आलेले आहे त्याच्याजवळ २ महिन्याचा कालावधी होता या दोन महिन्यात त्याने या सर्व गोष्टींची तयारी करायला पाहीजे होती परंतु मक्तेदाराकडुन ते झालं नाही. त्याच्या काय अडचणी होत्या काय माहिती, आता मक्तेदाराच्या पार्टनर त्याला साथ देत नाही अशी हवेत माहिती आहे. शहरात स्वच्छतेचा प्रश्न मोठया प्रमाणावर उद्भवलेला आहे. कारण वृत्तपत्रातुन आणि सोशल मिडीयातुन समोर येत आहे. शहरात स्वच्छता व्हावी म्हणुन आपण एक मुस्त पध्दतीने शहराची साफसफाई व्हावी म्हणुन ठेका वॉटर बेस कंपनीला रु.९५०.५० प्रति टन प्रमाणे दिलेला आहे. आपली मागील यंत्रणा होती, आरोग्याधिकारी, चार एस.आय., १९ सि.एस.आय.,४४० कायम कर्मचारी, ४०० मक्तेदाराचे कर्मचारी ज्यांना आपण २० मक्त्याची साफसफाई दिली होती.घंटागाड्या ४९ होत्या, ४ डंपर होते आणि चांगल्या प्रकारे साफसफाई होत होती. नविन मक्त्यामध्ये पण काहीच फरक नाही पडला, ४४० कामगार आहे, ४०० कामगार आहे उलट या वेळेस घंटागाड्यांमध्ये आपली वाढ झालेली आहे. मागच्या वेळेस घंटागाड्या आपल्या ४९ होत्या आजच्या १०० झालेल्या आहे. मक्त्याच्या रकमेतही वाढ झालेली आहे. मागच्यापेक्षा दर महिन्याला ११ लाख रुपये जास्त आणि रु.५४/- सर्व्हीस टॅक्स, म्हणजेच रु.५४/- प्रति कामगार, ५४ x ४०० x ५ वर्ष ऐवढयाचा मक्ता जास्तीचा आहे त्या प्रमाणे साफसफाई खुप चांगली व्हायला पाहिजे होती, ती दिसत नाही, फक्त आणि फक्त त्यांच्या नियोजनाच्या अभावामुळे आणि त्याने ट्रॅक्टर कमी लावले त्याच्यामुळे हा सगळा प्रकार घडलेला आहे, मक्तेदारासोबत जे करार झालेला आहे त्यामध्ये अ मध्ये ४४ अटीशर्ती आहे तर जवळ जवळ त्याने त्यामध्ये २० अटीशर्तीचा भंग केलेला आहे. क मध्ये कामगारा विषयी २२ तरतुदीमधुन ५ अटींचा भंग केलेला आहे, महत्वाचा म्हणजे इ मध्ये सर्व दंडाच्या तरतुदी आहे, त्या

मध्ये तुम्हाला आणि खास करुन दंडवते साहेबांना विनंती राहील, त्या दंडाच्या तरतुदी तपासुन आणि यात काय काय चुका आहे सर्व एस.आय.कडुन घेऊन त्याला दंड व्हायला पाहिजे नागरीकांना त्याने सेवेपासुन वंचित ठेवलेले आहे. घनकचरा व्यवस्थापनसाठी शासनाने जे डी.पी.आर. सन २०१७ मध्ये बनविले होते. त्यामध्ये म.न.पा.चे भैगोलीक क्षेत्रफळ ६८.७४ चौ.कि. असुन प्रभाग समिती क्र.१ ते ४ मध्ये १९ वार्ड असुन शहरातील एकुण घनकचरा निर्मितीचे प्रमाण सरासरी अंदाजी दररोज २२०.४५ टन आहे. हे झालं सन २०१७ च्या डिपी.आर. प्रमाणे, आणि आम्ही Calculation करुन सन २०१९ च्या अंदाजाने प्रति दिन प्रति माणुस ४२६ ग्राम कचरा निर्माण होतो. हे मी अंदाजी ढोबळ २०१९ प्रमाणे केलं. त्यासाठी १०० घंटागाड्या पुरेसे आहे, त्यात मनपाची काही चुक नाही, त्यांनी जे काम करायचे होते ते त्यांनी केलेले आहे. कचरा उचलणेसाठी २० ट्रॅक्टर गरजेचे आहे त्यांनी १० ट्रॅक्टर लावलेले आहे २८ तारखेपर्यंत आज आले असतील तर माहित नाही. आता कामगारांची माहिती सांगतो मी तुम्हाला, प्रभागाची माहिती काढलेली आहे. एकुण ४२०० कर्मचारी पाहिजे होते त्यानुसार ३८१७ हजर आहे. त्यांचा नियमाप्रमाणे जे दंड असेल ते आकारला जायला पाहिजे. अ मधील सांगतो मी त्यानी काय काय अटीशर्तींचा भंग केलेला आहे, मी डिटेल मध्ये यासाठी सांगत आहे की बऱ्याच सदस्यांना या मक्त्याची माहिती नाही. त्यांना तक्रारी करणे, एस.आय.चा काम काय, टोल फ्री नंबर कसा पाहिजे. कुठे जी.पी.एस पाहिजे, कामगारांना कुठल्याप्रकारे वेतन द्यायला पाहिजे. या सर्व गोष्टींची शहानिशा झाली तर सर्वांसाठी आणि नागरीकांसाठी तक्रार करणे कामी उपयोगात येईल. अट क्र.५ नुसार दैनंदिन कचरा व घरातुन निघणारा ओला सुका कचरा इत्यादी ठिकाणचा कचरा विलोगीक करुन संकलन करुन घनकचरा प्रकल्पापर्यंत वाहतुक करणे कामी वार्ड निहाय घंटागाडी मार्गाचे तसेच कचरा उचलण्याची वेळ ठिकाण सुस्पष्ट नियोजन करुन आराखडा तयार करण्याची जबाबदारी मक्तेदाराची राहील. कचरा हंजीर प्रकल्पावर तो टाकत आहे. जो करारामध्ये नाही. ओला कचरा टाकण्याचा करार आहे. तो सुका ही टाकत आहे. त्याच प्रमाणे अट क्र.११ आहे.प्रत्येक घंटागाडीच्या रुट मध्ये घंटागाडीची वेळ सकाळी ७.०० वाजता व दुपारी ३.०० पर्यंत राहील. १५०० घरं एका घंटागाडीला राहील असे नियोजन कंत्राटदाराने करायचे आहे. ७-३ एकुण १५०० घरे होईल असे शहरात दिसत नाही. या अटीचा ही भंग केलेला आहे. याची ही खात्री मी दंडवते साहेबाकडुन केलेली आहे. अट क्र.१२ मक्तेदाराने मनुष्यबळ व पर्यवेक्षक स्टॉप यांचे नांवे व संपर्क क्रमांक सादर करायला पाहिजे, तसेच कर्मचाऱ्यांचे बायोमेट्रीक हजेरी पुस्तक तसेच लॅगबुक ठेवणे क्रमप्राप्त असुन त्यावर संबंधीत पर्वेक्षकाचे स्वाक्षरीने प्रमाणीत करणे मक्तेदाराला बंधनकारक राहील. परंतु ते सिस्टीम नाही. त्याच प्रमाणे १५ नंबर ची अट, त्यामध्ये त्याला काही साधणे लागणार आहे, त्यासाठी लागणारी घंटागाडी, हातगाडी मनपा उपलब्ध करुन देईल. आता जे झोपडपट्टया मधील कचरा आहे त्याची यंत्रणा लागलेली नाही. अट क्र.१६, मक्तेदाराने कचरा वाहतुक करतांना बंधिस्त करुन किंवा ताडपत्रीने झाकुन ठेवायचे आहे. ट्रॅक्टर व घंटागाडी बंधिस्त नाही. आता जे नविन आहे ते बंधिस्त आहे. या ही कराराचा भंग झालेला आहे. यात काही प्रमाणात याला दंड आकारण्यात यावा.या सर्व दंडाबाबत जे ई मध्ये दाखविण्यात आलेली दंडाची तरतुद आहे त्यानुसार प्रति दिन त्याला दंडाची आकारणी करावी. अट क्र.१७, या कामासाठी मक्तेदाराने नागरीकांना टोल फ्री नंबर १५ दिवसात उपलब्ध करुन द्यावा. टोल फ्री नंबर नाही आहे. अट क्र.१९ म्हणजे त्याने कार्यालय करायला पाहिजे त्यांचा कार्यालय, प्रभाग समित्यांचा कार्यालय असायला पाहिजे, कार्यालय ही नाही. अट क्र.२२ मनपा तर्फे मिळणाऱ्या घंटागाडयाने कचरा संकलन करणे, ओला सुका कचरा वेगळा करुन कलेक्शन सेंटरपर्यंत वाहतुक करणे, मक्तेदाराने सुक्या कचऱ्याची नोंद घेऊन उतरविणे, तद्नंतर ओला व सुका कचऱ्याचे लॉगबुक नाही. अट क्र.२६ मक्तेदाराने सर्व प्रभागांमध्ये टोल फ्री क्रमांक घंटागाडीचे ठिकाण, स्वच्छता निरिक्षण आरोग्य निरिक्षण, तसेच मक्तेदाराचे प्रतिनिधीचे नांव व संपर्क क्रमांक प्रिंटींग करुन प्रत्येक घटांगाडीवर व प्रभाग लावणे बंधनकारक आहे. टोल फ्री नाही, घंटागाडीवर नाही, प्रभागात तसे पोस्टर नाही. मक्तेदाराचे प्रतिनिधीचे नांव व संपर्क क्रमांक लावायचा तो नाही. मक्तेदाराने टोल काटयावर कचऱ्याचा वजन करणे व टोल काटयावर सी.सी.टी.व्ही. बसविणे, सी.सी.टी. व्ही. बसवुन घनकचरा व्यवस्थापन कक्षात बसविणे व पक्षेपन करणे बंधनकारक राहील. अट क्र.३१ मक्तेदाराने ओला व सुका कचऱ्याचे वर्गीकरण करुन त्याची टक्केवारी एका महिन्या ६० टक्के करायला पाहिजे होती असे काही झालेले नाही. मक्तेदाराने आरोग्य विभागाने शिफारस केलेल्या एजन्सी कडुन सर्व घंटागाडी व वाहनांवर विहीकल ट्रॅकींग सिस्टीम स्वखर्चाने बसवुन त्याची नोंद घनकचरा व्यवस्थापन कक्ष, महानगरपालिका

मध्ये करणे बंधनकारक राहील. जी.पी.आर.एस. सस्टीम नाही. अट क्र.४० शहरात उघडयावर पडलेला कचरा संकलन करणे,तसेच शहरातील घंटागाडयांचा नियोजन करणे व शहरात कार्यालय उघडण्याची व्यवस्था करावी लागेल. नागरीकांची तक्रार घेणे कामी प्रत्येक समिती मध्ये प्रभाग समिती क्र.१ ते ४ व्यवस्थापकाची नियुक्ती करावी लागेल. व्यवस्थापकाकडे फोनची व्यवस्था करावी लागेल. तसेच त्यांचेकडुन तक्रारी घेऊन त्याचा निकाल १२ तासाच्या आत करणे आवश्यक राहील.आपल्या प्रभाग समितीमध्ये एक माणुस नियुक्त करायला हवा होता, त्याच्या कडे एक टोल फ्रि नंबर द्यायला हवा होता. असा कोणताही व्यक्ती नियुक्त केलेला नाही. म्हणुन त्याने अट क्र.४० चा सुध्दा भंग केलेला आहे. अट क्र.४१ घंटागाडी व इतर वाहने पाण्याने धुवुन घेणे व क्लिन करणे असे होते पण असा काहीही केलेलं नाही. खुप चांगला करारनामा करुन एकमुस्त ठेका दिलेला आहे. जर सर्व गोष्टी चांगल्या प्रकारे केल्या तर स्वच्छता मध्ये जळगांवचा नांव महाराष्ट्र मध्ये एक नंबर वर जाईल. आता हे सर्व कर्मचारी, अधिकारी व जळगांव शहराची जनतेवर अवलंबुन आहे. अट क्र.४४ मध्ये कर्मचाऱ्यांना द्यायचे वेतन, पी.एफ ची कापलेली रक्कम, ई.एस.आय.सी. चा विमा कपात झालेली कंफर्मेशन रिसीप्ट व यादी पुरावा जमा करायचे होते. जर मक्तेदाराने या सर्व अटीशर्तींची अदायगी नाही केली तर त्याला बिल देता कामानये साहेब, मी तुम्हाला नम्र विनंती करुन सांगत आहे. मक्तेदाराने जे कामगारांना द्यायला पाहिजे ते आहे. घंटागाडी, कॅम्पॅक्टर, व इतर सर्व साफसफाई करणाऱ्या कामगारांना गम बुट,मास्क, गणवेश, हॅण्डग्लोज हे सर्व पुरविणे तसेच कामगार ांना प्रशिक्षण देणे, त्याने गणवेश वगळता काही ही दिलेला नाही. मक्तेदाराने ठेवलेले कामगारांना ओळखपत्र नाही. आज रोजी माहिती घेतली असता, कमी वाहने, कमी कामगार, कमी यंत्रण त्यामुळे रस्त्यावरचा कचरा उचललं जात नाही. त्याप्रमाणे मक्तेदाराला दंडाची आकारणी करावी. नागरीकांना चांगली सुविधा पुरवायची असेल तर मक्तेदाराने मक्त्याची वेळोवेळी अंमलबजावणी करावी. व सर्व प्रकारचे त्रुटी दुर करुन सर्व गोष्टींचा नियोजन करुन ०८ दिवसाच्या आत करायला पाहिजे. अटीशर्तीतील सर्व गोष्टींची पुर्तता दोन दिवसात करावी, जेणेकरुन नागरीकांची तक्रारी दुर होतील व जळगांव शहराचा नांव लौकीक होईल. मा.पंतप्रधानांची किती महत्वकांशी योजना आहे स्वच्छ भारत अभियान राबवत आहे. जर खुप वेगवेगळे आजार पसरत आहे. काही सातीचे आजार आहे. त्यामुळे काही तरुण मुला ं बळी ही गेलेले आहे. या वेळीसुध्दा सातीची वादळ झालेली आहे. अश्या प्रकारी जरी एखाद्या तरुणाची बळी गेल्यास सदोष मनुष्याचा गुन्हा दाखल करण्यात येईल. जे असतील ते, कॅन्ट्रक्टर, मुकादम पासुन जे कोणही नियमानुसार आहे, त्यातला जो प्रतिनिधी आहे तो सुध्दा आणि जे छुपे पार्टनर असतील. त्यांच्या वर सदोष मनुष्यचा गुन्हा दाखल करावा ही विनंती करतो.

**श्री.नितीन लढढा :-** आता कैलास अप्पांनी सांगितलं की, आदरनीय पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी साहेब यांचा जे मिशन आहे, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत जर माझ्या प्रभागाला भेट दिली असती तर त्यांनी निश्चितपणे सांगितलं असतं कुठे नेऊन ठेवलं माझं भारत, इतकी विदाट परिस्थिती आहे. म्हणजे संपुर्ण फोटोग्राफ २८ ऑगस्ट म्हणजे कालचे आहे. सकाळी पासुन दुपार पर्यंत आमच्या प्रतिनिधींनी गोळा करुन आणलेली माहिती. आणि हे फोटोग्राफ्स बघीतल्यानंतर कदाचित मा.आयुक्त साहेब आपल्याला ही विचार पडेल की, हा मक्ता देऊन आपण किती मोठी घोडचुक केलेली आहे. Currancy मध्ये एक currency असते Cripto Currency म्हणतात त्याला. ती Currency फक्त हवेतच Currency असते, ती प्रत्येक्षात नसते. ती दिली जात नाही आणि घेतली ही जात नाही. Cripto Currency हे चलन आहे अंतरराष्ट्रीय चलन आहे. ते दिलं जातं घेतलं जातं पण कागदावर नोट किंवा कॅईन जसा दिसतो तसा कुठलाही प्रभाव त्याच्यामध्ये दिसत नसतो. तश्याच पध्दतीने जळगांव शहरामधील आरोग्य व्यवस्था ही Cripto Currency सारखी झालेली आहे. हे फक्त आभास होत आहे. गाडी फिरते, लाऊडस्पीकरचा आवाज ही कानात पडतो, घंटा ही टंनटनात वाजतो, स्वच्छ शहर, सुंदर शहर, हरीत शहर हे सर्व गोष्टी कानावरती पडतात. कानालाच फक्त स्वच्छता जानवत आहे आजच्या काळात. ही परिस्थिती आज जळगांव शहराची झालेली आहे. धुळेला जर म्हटलं तर कुठे स्वच्छता आणि कुठे मक्तेदाराचा काम हे समाधानकारक नाही. आज कैलास अप्पांनी आज ते सत्ताधारी आहे म्हणुन त्यांना काही बंधन असतील. म्हणुन त्यांनी त्यांची भुमिका सावध केली नाही. म्हणुन त्यांच्या पक्षाच्या भुमिकेला अनुसरुन त्यांनी भुमिका मांडली. वास्तविक तुम्ही बघाल तर हे २५ फोटोग्राफ आणि संपुर्ण २५ फोटोग्राफ हे कुठल्या प्रभागाचे आहे तर प्रभाग क्र.०५ आणि प्रभाग क्र.५ कुठे येतो, जिथे महानगरपालिकेची प्रशासकीय इमारत उभी आहे. आणि ज्या इमारतीत संपुर्ण शहरावर अंकुश ठेवणार

मा.आयुक्त साहेब बसलेले असतात.मा.महापौरताई बसलेले असतात. मा.उपमहापौर साहेब बसलेले असतात आणि सर्व सन्मा.सदस्य काही ना काही कामाने या इमारतीत येत असतात. म्हणजे एक म्हण प्रचलीत आहे. दिव्या खाली आंधार,जर हा दिवा असेल आणि याच्या खालीच आंधार असेल. जो मक्तेदार संपुर्ण शहरामधला मध्य भाग आहे. प्रत्येक भागातुन कुठल्याही प्रभागाचा नागरीक असो. तो काही ना काही कामाने या भागात येत असतो. संपुर्ण रेल्वेस्टेशन या प्रभागात आहे. बस स्टॅण्ड या प्रभागात आहे. बाहेर गावावुन येणारे लोकं असलीत, व्यापारी असतील, राजकीय मंडळी असतील त्यांचा सर्वांचा प्रवास या प्रभागातुन होत असतं. जर या प्रभागाची स्थिती इतकी भयानक असेल. आणि ही आजची परिस्थिती नाही. साधारणता मी ५ दिवस वाट बघीतली. पाच दिवसापुर्वी मी आरोग्य अधिकारी विकास पाटीलांही फोन केला. त्यांना ही सांगितलं की, मक्ता सुरु झालेला आहे परंतु प्रभागाची परिस्थिती काय आहे तुम्ही जाऊन बघा. जेव्हा मी सभागृहात प्रवेश केला, तर दोन वेगवेगळे नागरीकांचे प्रभागातुन फोन आले, मी हॅण्डफ्री करुन दंडवते साहेबांना एकवले. आणि दोघी तक्रारी आरोग्यच्या संदर्भातच होत्या. जवळपास मागच्या पाच दिवसात २०० फोन आले असतील कॉलर आईडी वर पाहुन की हा माझा मतदार आहे मला लाचडीने त्याला हेच सांगावा लागत होतं की आरोग्यच्या संदर्भातील तक्रार असेल तर थोडं वेळ वाट पाहवी लागेल. या मक्त्यावर जे आपण खर्च करत आहे. त्याच्या निम्म्य खर्चामध्ये या शहराच्या साफसफाईचा काम सुरु होता. आणि काम जे चालेलं आहे त्याच्या पेक्षा चांगल्या परिस्थितीत होता. ते १०० टक्के समाधानकारक नसेल परंतु आजच्या परिस्थितीपेक्षा चांगला सुरु होता. आपण पैसा का खर्च करत असतो की, चांगल्या पध्दतीची सोई मिळायला पाहिजे. परंतु जास्तीचा पैसा देऊन त्याच्यापैक्षा निम्म्य सोई देत असेल. असा मक्ता देण्यात आपण खुप काही साध्य केला अशी काही परिस्थिती नाही. आपण स्वत: स्वच्छ भारत अभियानात काम केलेलं आहे. आपला अनुभव आमच्यापेक्षा खुप दांडव आहे परंतु हा मक्ता देतांना आपल्याकडुन कुठेतरी चुक घडलेली आहे. आपण मक्तेदाराला मक्ता देण्यापुर्वी आपल्याकडे जी वाहनव्यवस्था होती. ती वाहन व्यवस्थेच्या अनुषंगाने आणि काही प्रमाणात मक्ते दिले होते त्याप्रमाणे आपण आपली कार्यपध्दती दाखवत होतो. त्याच्यात आपला पैसा ही वाचत होता. आज जसे स्वतंत्र उपायुक्त आपल्याला आरोग्य खात्याला मिळालेले आहे. मागच्या वेळेस आपल्याकडे अधिकारी नव्हते. उच्च दर्ज्याचे अधिकारी नव्हते. प्रशासकीय कामकाजांवरील नियंत्रण इच्छा असुन सुध्दा करत नव्हतो. परंतु आज संपुर्ण प्रशासकीय यंत्रणा पुर्ण झालेली आहे. तश्या परिस्थितीत सुध्दा शहराचा आरोग्य जर धोक्यात येत असेल तर निश्चितपणे मी म्हणतो या मक्तेदाराबद्दल विचार करण्याची परिस्थिती येऊन ठेपलेली आहे. आपण म्हणतो काही वेळ त्याला द्यायला पाहिजे. जसे आपण म्हणतो मुलाचे पाय पाळण्यात दिसतात. विशेष मी प्रशांत नाईक यांचा अभिनंदन सुध्दा करतो. जर त्यांनी ही बाब उघडकीस आणली नसती तर आमच्या डोक्याला इतकं ताप द्यायची गरज पडली नसती. एक आयुक्त किंवा एक महापौर म्हणा संपुर्ण क्षेत्रात जाऊन निरिक्षण करु शकत नाही. ही सुध्दा वस्तुस्थिती आहे. परंतु ज्या पध्दतीने ही सिस्टीम ड्रव्हलप झालेली आहे. त्या अनुषंगाने या कामाच्या मुळात जर तुम्ही जाल तर याच्यात तुम्ही निविदा प्रक्रियेच्या खोलात जा. त्यावेळेला ही आम्ही आमची भुमिका व्यक्त केलेली होती त्यावेळेला ही विरोध केलेला होता. ज्या दिवशी स्वच्छ भारतचा ३० कोटी रुपया आला. पगार हातात पडल्यानंतर तुम्ही खर्च कसे कराल की तुमच्या प्राथमिकता काय काय आहे. तुम्हास काय काय अपेक्षित आहे आणि काय काय करायला पाहिजे. जो ही खर्च करणार आहे ते योग्य पध्दतीने मार्गी लागेल की नाही. परंतु स्वच्छ भारत अभियानाचे ३० कोटी रुपये आल्यानंतर आपण पहिला काम काय करायला पाहिजे होते. आपलं घनकचरा व्यवस्थापन जे बंद पडलेलं आहे तेथे दिड पौने दोन लाख कोटी जुना कचरा साठलेला आहे. त्याचे निष्पण त्या भागातील नागरीकांना भोगावे लागत आहे. पहिली प्राथमिकता ती होती की घनकचरा व्यवस्थापन तातडीने सुरु व्हायला पाहिजे. परंतु यात ४ कोटी रुपयांची वाहन खरेदी झाली आणि वाहन खरेदी झाल्यानंतर आपण विचार केला नाही हा एक मुस्त पध्दतीने हा ठेका द्यायला पाहिजे. एक मुस्त पध्दतीने ठेका द्यायला पाहिजे परंतु हे जे ४ कोटी रुपयाची आपण वाहने खरेदी केली ते ६ महिने जवळपास आपले पार्कींगला पडुन राहिले. आपली यंत्रणा चांगल्या पध्दतीने काम करत नाही म्हणुन चांगली सेवा कश्या पध्दतीने देता येईल. या दृष्टीकोणातुन एकमुस्त ठेका देण्याचा विचार केला. परंतु या महानगरपालिकेच्या प्रांगणात पडलेल्या गाड्या त्यावेळेस नगरपालिकेची स्वत:ची यंत्रणा राबवत होतो आपण त्यावेळेला स्वत: त्यांना सोई सुविधा देण्यासाठी आपण खुप वेगळया पध्दतीने त्यांच्याकडे लक्ष

द्यायचो. असे म्हणतात की जर घरच्या बाईनी साडी मागीतली तर दहा वेळा विचार करणार पण बाहेरच्या बाईने दिली तर दहा मिनटात देणार.

**सौ.नेरकर सरिता :-** हे असे मांडणे चुकीचे आहे .

**श्री.नितीन लढढा :-** ज्या पध्दतीने आपण आरोग्य विभागाच्या वाहनांची व्यवस्था ज्यावेळेला करतो की त्याच्या गाडीचे टायर पंक्चर झाले साधारणत: त्या घंटागाडया दिवसातुन ४ तास त्या पंक्चर झाल्यामुळे बंद राहायच्या , क्लच प्लेट गेली तर १५ दिवस गाडी दुरूस्त होत नाही आणि मक्तेदाराला आपण रेड कार्पेट टाकुन अश्या पध्दतीने त्याचे स्वागत केले की कुठल्याही गोष्टीचा विचार न करता संपुर्ण १०० वाहने आपण त्याला देऊन टाकली ही वस्तुस्थिती आहे अत्यंत चुकीचे व नियमबाहय पध्दतीने घडलेली आहे हे मुळ अत्यंत गंभीर असे मुळ आहे मी ज्यावेळी आरोग्याधिकारी यांचेशी चर्चा केली होती की तुम्ही कशावरून आरेखित करून या मक्तदाराला ही सगळी वाहने विनामुल्य पुरवठा करत आहेत , या मक्तेदाराचा मालेगांव महानगरपालिकेमध्ये ठेका सुरू आहे तीथे महानगरपालिकेने वाहने पुरविलेली आहेत परंतु रितसर त्या वाहनांचे भाडे त्याच्याकडुन वसुल केले जाते परंतु आम्ही ईतके मेहरबान व उदार झालो की आमची महानगरपालिकेची आर्थिक परिस्थितीचा विचार न करता आम्ही कोटयावधी रुपयांची नविन वाहने खरेदी करतो आणि मक्तेदाराला मात्र विनामुल्य देतो ही अत्यंत चुकीची बाब आहे , अशा पध्दतीने जो प्रकार घडला त्याचे मुळच हे आहे की हा जो कॉन्ट्रक्ट झालेला आहे हा पुर्ण बंकायदेशीर रित्या झालेला आहे. मा.महापौर साहेब अप्पा साहेबांनी बऱ्याच सुचना केल्या परंतु सुचना केल्याने उपयोग नाही की कायद्यानुसार त्याला अटी शर्ती नुसार दंड आकारावा हे सगळे अटी शर्ती चा भाग आहे परंतु ही अल्टीमेटली सिस्टिम कोणाच्या भरवश्यावर चालवणार की त्याच कर्मचाऱ्यांच्या भवश्यावर चालवणार आहे की त्याच मक्तेदाराच्या भरवश्यावर चालवणार आहे उदया त्यांच्या खिश्यात दोन पैसे आले की सगळे रिपोर्टस पॉझिटीव्ह होतील , दंडाची कारवाई जी आहे ती कमी होईल तर या दृष्टीकोनातुन

**श्री.कैलास सोनवणे :-** मक्ता रद्य करायचा का ?

**श्री.नितीन लढढा :-** होय मक्ता रद्य करायचा त्याचा महत्वाचा विषय बघा .

**श्री.कैलास सोनवणे :-** भाऊ तुमचे बोलणे झाले की मी बोलतो तुम्ही तशी मागणी करा हा विषय जास्त लाबंविण्यापेक्षा तुम्ही मागणी करा आपण बोलु काय बोलायचे आहे .

**श्री.नितीन लढढा :-** अप्पा ही वस्तुस्थिती आहे की जोपर्यंत सभागृहाला माहिती होत नाही .

**श्री.कैलास सोनवणे :-** वस्तुस्थिती खराब आहे अजुन काय सांगु .

**श्री.नितीन लढढा :-** महापौर ताई कुठेतरी निर्णय घेण्याच्या पध्दतीचे असे आहे की अविवेकी पणाने घेतलेला निर्णय त्याचे ज्वलंत उदाहरण ESSL च्या माध्यमातुन आज आपण बघतोय आपण एलईडी लाईटच्या संदर्भातील असाच घाईघाईने निर्णय घेतला आज परिस्थिती काय आहे की एलईडी लाईट खांबावर आहे ते बंद पडताय आणि त्याठिकाणी आपले जुने ऐसेंबल लाईट लावले जात आहेत हे सगळे तुम्हाला मान्य आहे आणि हे मान्य असल्यानंतरही आपण जर कधी विषाच्या परिक्षेची पाहण्याची भुमिका आपण घेत असु तर मी निश्चितपणे म्हणतो की या महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीलाही घातक आहे , या शहरातील नागरीकांच्या आरोग्याला सुध्दा घातक आहे . अप्पांनी सांगीतले की त्याला दंड व्हायला पाहीजे परंतु ठेका दंड वसुल करण्या संदर्भात दिलेला नाही उदया समजा हे संपुर्ण फोटोग्राफ बघितल्यानंतर जरी वृत्तपत्रातुन वाचले की हा दंड या मक्तेदाराला करण्यात आलेला आहे . मक्तेदाराचा उददाम पणा अश्यापध्दतीने या अटि शर्तीमध्ये ३२ क्रं. ची अट आहे की ३ महिन्यापर्यंत मला दंड करू शकत नाही आणि तो धडधडीत एस.आय व आरोग्याधिकाऱ्यांना सांगतो की तुम्ही कातीही दंड करा व कीतीही कागदे रंगवा.

**श्री.कैलास सोनवणे :-** करारनाम्यात अशी अट नाहीये .

**श्री.नितीन लढढा :-** आहे अप्पा तुम्ही बघा .

**श्री.कैलास सोनवणे :-** नाहीये भाऊ मी बघीतले आहे. तीच ना ६० टक्के ७५ टक्के तीच ना

**श्री.नितीन लढढा :-** जीपीआरएस यंत्रणा बसविणे व त्यावर नियंत्रण करणे व मक्तदाराने घनकचरा नियंत्रण कक्षात त्याचे नियंत्रण कक्ष तयार करून कार्यान्वीत करणे बंधनकारक आहे त्या नियंत्रण कक्षातुन वाहनांवर नियंत्रण ठेवता येईल प्रत्येक

गाडीसाठी कचरा संकलन करणेसाठी सुक्ष्म आराखडा तयार करून प्रत्येक सदर गाडयांवर नियंत्रण ठेवणेची व्यवस्था सक्षम अधिकारी यांच्याकडुन प्रमाणित करून घेणे शहरातील कचरा संकलनाची सर्व यंत्रणा सुरळीत करण्यासाठी ३ महिन्याचा कालावधी देण्यात येईल मात्र त्यानंतर दंडाची आकारणी अटी शर्ती नुसार करण्यात येईल .

**श्री.कैलास सोनवणे :-** आपण उपायुक्त साहेबांचा खुलासा घेवु .

**श्री.सचिन पाटील :-** अप्पा आपण मुद्या मांडलेला आहे ना मग या गोष्टीवर बोलुन काही फायदा नाही .

**श्री.कैलास सोनवणे :-** खुलासा होवु द्या .

**मा.उपमहापौर :-** अप्पा त्यांचे बोलणे होवु द्या .

**श्री.कैलास सोनवणे :-** मी जे मांडलेले आहे ते वास्तव मांडलेले आहे अवास्तव मांडलेले नाही .

**श्री.विष्णु भंगाळे :-** अध्यक्ष महोदय लक्षवेधी आम्ही आधी मांडलेली होती पहिला हक्क आमचा होता व अधिकार होता आपण अप्पांना आधी बोलु दिले व नंतर  आम्हाला सांगतात हे चुकीचे आहे. आज शहरात परिस्थिती ईतकी बेकार झालेली आहे की काय सांगायचे परंतु तुम्ही त्यावर चर्चा करू देत नसाल तर काय अर्थ आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** विष्णु भाऊ सर्व चर्चा होणार आहे काय असेल त्याचे उत्तर मी तुम्हाला देणार आहे. सभेचा कामकाज चालवायचा महापौरांना अधिकार आहे.

**सौ.सनिता नेरकर :-** जो पर्यंत सन्मा. सदस्य महिलांशी माफी मागणार नाही. मिटींग पुढे जाणार नाही.

**श्री.मनोज चौधरी :-** फक्त नितीन भाऊ मागतील का माफी ? कैलास अप्पा ही बोलले त्यानंतर ते नाही एकले का तुम्ही ?

**श्री.कैलास सोनवणे :-** मी नितीन भाऊंच्या बद्दल बोललो, त्यांचे बद्दल बोललो महिला बद्दल बोललो नाही. मी महिलांना बोललेलो नाही. मी फक्त नितीन भाऊंना बोलेलो आहे.

**उपायुक्त, आरोग्य विभाग :-** मा.महापौर, मा.उपमहापौर साहेब, आयुक्त साहेब आणि संपुर्ण सभागृह, सन्मा.सदस्यांनी जे दंडाच्या तरतुदीबाबत जे मुद्दा उपस्थित केलेला आहे. ते करारनाम्याच्या सेक्शन ई ची अट क्र.३२ मध्ये शहरातील कचरा सकलनाची सर्व यंत्रणा सुरडीत होण्यासाठी ३ महिन्याचा कालावधी कंत्राटदाराला देण्यात येईल. मात्र त्यानंतर दंडाची आकारणी सुरु होईल.अशी अट समाविष्ट आहे. परंतु सेक्शन ई मध्ये जी तरतुदी दिलेल्या आहे ते अश्या तरतुदी आहे की घनकचऱ्याचा काम सुरु केल्यापासुन आवश्यक असलेले मनुष्यबळ आवश्यक असलेला काम, आवश्यक असलेल्या घंटागाड्या, कॉम्प्यक्टर, जी.पी.एस.सिस्टीम, बायोमेट्रीक हजेरी सिस्टीम, त्यांची सुपरव्हाईजर, त्यांचे ऑफिसचा टोल फ्री क्रमांक, त्यांनी ऑफीस सुरु करणे, प्रत्येक प्रभागामध्ये तक्रारी घेण्यासाठी ऑफीस सुरु करणे हे सर्व सुविधा पुरविणे आवश्यक आहे जर ते हे पुरवत नसेल तर मग सेक्शन ई मधील जे दंडाची तरतुदी असतील ते लागु होतील. तीन महिन्यानंतर जर सर्व काही सुरडीत आहे,सर्व घंटागाड्या सुरु आहे आणि त्यातुन जर एक घंटागाडी बंद पडते किंवा मनुष्यबळ कमी आहे तर तीन महिन्यानंतर ती तरतुदी सुरु राहतील. परंतु पहिल्या दिवसापासुन जी यंत्रणा त्यानी पुरविली नाही आणि स्वच्छतेवर परिणाम झालेला आहे. तर त्या दंडाच्या तरतुदी त्याला लागु होतील.

**श्री.नितीन लढढा :-** मा.महापौर साहेबा, धुळयाला सुध्दा हाच मक्तेदार आहे. तिथली परिस्थीती अशी आहे. तिथेही भारतीय जनता पक्षाचीच सरकार आहे. तिथे ते सुध्दा या निर्णयाला आले की या मक्तेदाराची बिलांची अदायगी तेथे रोखली गेली. का रोखली गेली ? तेथेपण हा प्रकार होता, वजन वाढविण्याच्या दृष्टीकोणातुन माती आणि दगड भरुन तो त्याचा फायदा घ्यायचा, आपण धुळयाचे जे महापौर असतील किंवा सन्मा.सदस्य असतील त्यांच्याकडुन तुम्ही ही माहिती पडताळु शकता. माझे म्हणणे फक्त इतकेच आहे की, रु.९५०/- प्रति टनाची टिप्पणी फिरवली जाते आणि सर्व घोड येथेच होतो. कारण काय कचऱ्याचा व्हाल्युम मोठं असतं आणि वजन कमी असतं. पैसा केव्हा मिळेल ज्यावेळेला वजन जास्त भरेल तेव्हा पैसा मिळेल आणि वजन कसा वाढवायचं तर प्रशांतने जी शुटींग घेतलेली आहे ते त्याचा पुरावा आहे. आणि जर कधी एखाद्या गोष्टीचा पुरावा प्राप्त झाल्यानंतर ही प्रशासन जर मक्तेदाराची पाठझाकणी करत असेल. तर मला वाटतं हे संयुक्तीक नाही. कारण आपण म्हणतो की एखाद्याला चुक करण्याची संधी आपण स्वत: देतो आहे. दंड वसुल करणे ह्या महापालिकेचा उद्देश नाही. या महापालिकेचा उद्देश आहे संपुर्ण शहरात स्वच्छता व्यवस्थीत व्हायला पाहिजे. या शहराच्या नागरीकांचा आरोग्य निरोगी राहिला पाहिजे. हे उद्देश समोर ठेवुन आपण रुपयाच्या ऐवजी २ रुपये खर्च करत आहे. परंतु

दोन रुपये खर्च करत असतांना सेवा एकच रुपयाची मिळत असेल किंवा याच्यापेक्षा ही खालच्या दर्ज्याची मिळत असेल तर मी निश्चितपणे म्हणतो की आपण मक्तेदाराला पुन्हा पुन्हा अपराध करण्याची संधी उपलब्ध करुन देतो आहे. याचा अनुभव आपण ए.एस.एल. च्या माध्यमातुन घेतला. आणि आज ए.एस.एल. च्या बाबतची परिस्थिती सुध्दा आपण अनुभवत आहे. उद्या जाऊन पाच वर्षाचा कॅन्ट्रॅक्ट आहे हा एक दिवसाचा किंवा एक महिन्याचा नाही. आपण त्यानंतर त्याचे चांगले वाईट अनुभव घेतले आणि मग एक महिन्यानंतर सांगीतले की आम्हाला तुझे काम काही आम्हाला योग्य वाटत नाहीये आणि तु तुझा मोबदला घे आणि मोकळा हो हया कॉम्लीकेशन करारनाम्याच्या अनुषगांने भविष्यात भोगाव्या लागतील आणि त्यावेळेला पाणी ईतके वाहुन गेलेले असेल की त्याचा विचार आपण करू शकणार नाही कारण मक्ता देण्याच्या संदर्भात प्रशासनाने सुध्दा का घाई केली  हे ही एक कोड आहे कारण बऱ्याचशा गोष्टी पुर्णावस्थेत नाहीये कारण नियंत्रण सेंटर बांधुन तयार करण्याचे ही सुध्दा एक प्राथमिकता होती त्याठिकाणी रॅम्प व वजनकाटा पाहीजे आज आपण आज पाहीले तर रॅम्प होत नाही व वजन दुसऱ्या ठिकाणी होत आहे मला अशी माहिती मिळाली आहे की ते वजन काटे असे आहे की तुम्ही त्याला १०० रूपये द्या तुमचा ५ टनाचा कचरा असेल तर तो तुम्हाला १० टानाची रिसीट काढुन देईल मला सांगा या सगळया गोष्टींवर नियंत्रण कोण ठेवणार उद्या समजा आपण सिसिटीव्ही लावले .

**श्री.कैलास सोनवणे :-** भाऊ काय मागणी करायची ती करा ना हे डबल होत आहे. विस्तृत बोलण्यापेक्षा ठारावेिक मुद्दे मांडा .

**श्री.नितीन लढढा :-** मा.उपमहापौर व महापौर ताई मला एक सांगायचे आहे की हा मक्ता या महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचा नाही , या शहरातील नागरीकांच्या हिताचा नाहीये , यापेक्षा या मक्त्यावर जितका खर्च होतोय आज आपल्याकडे स्वत:ची वाहन व्यवस्था तयार आहे , नियंत्रण करण्यासाठी आज आपल्याकडे अधिकारी वर्ग सक्षम झालेला आहे कमी पैश्यामध्ये यापेक्षा योग्य पध्दतीने या शहरात कर्मचाऱ्यांच्या माध्यमातुन सफाईचे काम चांगल्या पध्दतीने करू शकते तुम्हाला उदाहरण पाहीजे असेल तर जिल्हाधिकारी ढाकणे साहेबांना विचारा ते साहेब सोलापुर महानगरपालिकेचे आयुक्त होते. ज्या वेळेला याच्या संदर्भात चर्चा चालु होती. त्यांच्याशी मी चर्चा केली की आपण सोलापुर महानगरपालिका आयुक्त असतांना आपले चांगले आणि वाईट अनुभव काय याबद्दल विचारना केली असता, त्यावेळेला त्यांनी सांगितले की, तुम्ही सोलापुरला जाऊन माझी कार्यपध्दती बघुन या. आहे त्या यंत्रणेतनं आपल्या जळगांव शहरापेक्षा अतिश्य चांगली यंत्रणा तेथे राबवुन संपुर्ण सोलापुर शहर जे आहे कचरा मुक्त केलेला आहे. तर मी म्हणतो प्रशासनात चांगले अधिकारी आहे. फक्त कुठेतरी दिशा देण्याची गरज आहे. योग्य दिशा देऊन जर त्यांना फ्रिहॅण्ड काम करण्याची संधी मिळाली. तर महानगरपालिकेचा पैसा ही वाचेल आणि कमीतकमी आपला कर्मचारी आणि आपला अधिकारी हा कुठेतरी या सभागृहाला Answerable राहील. मक्तेदार आपल्याशी असा वागत आहे, श्री.विष्णु भाऊ निषेध करतील. आपण धुळेची परिस्थिती बघा, आपण नाशिकची परिस्थिती बघा. सगळीकडे आपलेच शासन आहे. परंतु निव्वळ कुठेतरी मक्तेदार पैसा कमविण्याच्या हेतुने, त्याची या शहराशी कुठलीही बांधीलकी नाही. तर माझी या सभागृहाला विनंती आहे आणि आपणास विनंती आहे. या मक्तेदाराला जे काही पुरावे प्रशांत नाईक यांनी सादर केलेले आहे त्याचे अनुषंगाने हा मक्ता तातडीने टर्मिनेट करण्यात यावा आणि संपुर्ण महापालिकेने रेडीरेकनर वरती स्वत: कर्मचाऱ्यांची यंत्रणा उभी करुन महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीकोणातं योग्य तो निर्णय घेऊन या शहराची स्वच्छता करणेची भुमिका स्विकार करावी ऐवढीच माझी विनंती आहे अन्यथा हा या पाच वर्षातला सर्वात मोठा कचरा घोटाळा म्हणुन समोर येईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीन भाऊ बरच काही बोलले त्या काही वास्त पण होतं. काही काही चुकीचं ही मांडलं आणि दिशाभुल करण्याचा प्रयत्न ही केलं सभागृहाचा, भारतीय जनता पक्षाचा या मक्त्याशी कुठेही काहीही एक संबंध नाही. मक्तेदार हा भारतीय जनता पक्षाचा नगरसेवक नाही, मक्तेदार हा भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता ही नाही. तो कसा आहे ते पण मला माहिती नाही. त्याचा चेहरा कसा आहे ते पण मला माहित नाही. तो माणुस आहे की बाई आहे ते पण मला माहित नाही. आता नितीन भाऊ हे सांगता आहे अप्पांनी हे बोलले या ठिकाणी पाहुन घेण्याचा प्रयत्न केला. जर मी रात्री साहेबांना वेळोवेळी सांगत आहे. त्याला दंड करा, इतके प्रमाणात करा, काहीच सोडु नका, म्हणजे मी पाहुन घालण्याचा प्रयत्न केला का, आम्ही पाहुन घालण्याचा प्रत्यन करत नाही. हा मक्तेदारा आपल्याशी संबंधीत नाही. काय काय घडलं

मागच्या वेळेस ते पहा, के.डी.पाटील या ठिकाणी नगराध्यक्ष म्हणुन आला, मक्तेदार होता दांडेकर तो कोणाशी संबंधीत आहे विचारा, तो नगरसेवक होता तुमचा, सर्वांना माहित आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** अप्पा तुम्ही पण आमचेच नगरसेवक होते.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी तुमचा नगरसवेक नाही. मी खान्देश विकास आघाडीचा ही नगरसेवक नाही, तुम्ही मला स्विकृत केलेलं होतं. मी सदस्यपण नाही. मक्तेदाराने काम बंद केला. जळगांवकरांची घाण केली. हे धंदे कोणाचे आहे, हे भारतीय जनता पक्षाचे धंदे नाही. ह्या मक्तेदाराशी काही संबंधी ही नाही. वार्ड क्र.५ बद्दल जसे तुम्ही सांगितले, तुमच्याकडे जसे तक्रारी येतात तसे माझ्याकडे ही येतात वार्ड क्र.५ च्या तक्रारी आपला वार्ड Joint आहे. आपला माजी नगरसेवक प्रशांत पाटील, त्याच्या घराजवळची कचरा कुंडी २४ तासात केव्हाही पाहुन या. तुम्ही फक्त सांगता आमचा वार्ड आमचा वार्ड, विषय फक्त तुमच्या वार्डाचा नाही, संपुर्ण जळगांव शहराचा आहे. तूम्ही ते आदेश जैन आहे त्यांना विचारुन घ्या. कालच्या दिवशी विकास पाटील, कांबळे साहेब संबंधीत मुकादमला विचारलं, माझ्या काही कर्तव्याचा भाग नाही तुमचा वार्ड आहे. तरी त्या ठिकाणी गेलो होतो मी,

**श्री.नितीन लढढा :-** तुम्ही मक्तेदाराची बाजु घेत आहे की कोणाची बाजु घेत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** मक्ता रद्द करता येणार नाही. ज्या मक्त्याला इतके दिवस लागले. मक्तेदाराला १४ दिवस झाले, त्याला संधी द्यायला पाहिजे. जर सुधारणा नाही झाली तर पुढचा निर्णय घेऊ. आता विकास पाटील यांनी सांगितले की, गटारीतुन ही माती वगैरे निघु शकते. आता शंभर घंटागाड्या आहे एकच घंटागाडीत का टाकीन तो. ऐवढे कारण पुरेसे होत नाही मक्ता रद्द करायला, त्याला संधी देणार नाही का तुम्ही. त्याला संधी द्यायला पाहिजे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** ही लक्षवैधी, मा.नितीन लढढा, मा.कैलास अप्पा आणि सभागृहानी या विषयावर चर्चा केलेली आहे. बरेच काही मुद्दे साम्य आहे मी परत त्याच्यावर बोलणार नाही. घडलेली घटना आपल्या समोर आहे, मी आयुक्त साहेबांना विनंती करेल. आणि मी त्यांना चार पाच दिवसापासुन फोटोस ही टाकले की कश्या प्रकारे परिस्थिती आहे. प्रशांत नाईकांनी जी व्हिडिओ क्लिप केली ती ओरीजिनल व्हिडिओ क्लिप आहे. याच्यावर आपले काही दुमत आहे का याचे आपण स्पष्टीकरण आपण आपल्या माध्यमातुन द्यावे. मा.नितीन भाऊंनी सर्व मुद्ये मांडलेले आहेत या सर्व गाडया खर्च करून आपल्या मनपाला मिळालेल्या आहेत आणि ड्रायव्हर जे आहेत समजा की एखाद्या गाडीचा ॲक्सीडेंट झाला तर ती बंद पडते आता आपल्या नविन गाडया आहेत एक गाडी डिजल नाही म्हणून कोर्ट चौकात भर रस्त्यावर उभी राहते अशी दुसरी गाडया ज्याच्या इंजिनमधुन वाफा निघुन ती गाडी रस्त्यात उभी राहते अशी नविन गाडयांची जर परिस्थिती होत असेल तर हा मेंटेनन्स व हा मनपाचा खर्च हया नविन गाडयावर होणारा खर्च हा आपण लक्षात घेतले पाहीजे तसेच अप्पा बोलले की त्यात काही छुपे किंवा काही पार्टनर आहेत आम्ही याबाबतीत काही बोललो नाहीत परंतु जळगांव शहरात हा मक्ता सुरू होवुन ८ दिवस झाले असतील तसेच हा ठेका धुळयामध्ये २ ते ४ महिन्यापासुन हा ठेका आहे तेथील परिस्थिती अशी आहे की तेथील या ठेक्याच्या बाबतीत महापौर व नगरसेवक सुध्दा हताश झालेले आहेत तेथील हा ठेकेदार स्पष्ट म्हणतो की तुम्हाला जे करायचे असेल ते करा. २५% पेमेंट कापुन घेतलेले आहे. एकच पेपर नाही, लोकमत आहे, सकाळ आहे, दिव्य मराठी असे रोजच पेपरात त्याबद्दल आलेले आहे. ज्या प्रमाणे प्रशांत नाईक यांनी व्हिडीओ चित्रण केलं. तिथले प्रभारी आयुक्त जे धुळेचे जिल्हाध्यक्ष होते, कलेक्टर साहेब होते यांनी सुध्दा त्याला रंगेहात पकडलेली आहे. म्हणजे ह्या ठेकेदाराची माणसिकता काय आहे हे आपले म्हणणे आहे. जळगांव शहर स्वच्छ व्हावं या उद्दिष्टाने आमचा विरोध नाही. परंतु आपली आर्थिक सुधारणा होत नसतांना त्यामध्ये खर्च जास्त जात आहे. आणि आरोग्याच्या दृष्टीने कचरा हा जास्त प्रमाणात आडळला जात आहे. याचा कारण का याच्याकडे लक्ष द्यायला पाहिजे असा प्रश्न नितीन भाऊ यांनी लक्षवैधी मांडतांना केलेलं आहे. आदि धुळयाचा कचरा १३५, ११०,१३५ टन येत होता, आता तेथील कचरा किती येतो, २००,२१०,२२५ टन, म्हणजेच किती कचरा वाढला आहे, ५० टन व १०० टन कचरा वाढुन सुध्दा आज तेथील बोंब आहे. आणि तेच आपल्या जळगांव शहरात होत आहे. आम्ही फक्त तुमच्या निदर्शनात आणुन देतो आहे. जर उद्या तशीच परिस्थिती जळगांवात होणार आहे. जर वजन वाढण्याच्या दृष्टीकोणातुन त्याने परत परत तसा केलं आणि तीच गाडी फिरुन आणले. तिथील आयुक्तांनी स्पष्ट सांगुन दिले की मी पेमेंट देणार नाही. लेखापाल रजेवर गेलेले आहे. वाटेल तर

तुम्ही तपास करुन घ्या. महापौर महोदया आपण सुध्दा तेथील महापौरांना फोन लावा आणि विचारा. आमचं एक म्हणणं आहे की हे ठेका रद्द करावा जेणे करुन २ महिने नंतर ही किंवा ४ महिनेनंतर ही जर तो सुधरु शकत नाही. तर मला सांगावा असा वाटतं, नाशिक मध्ये २ दा ब्लॅक लिस्टला गेलेला हा ठेकेदार आहे. तो कोर्टात गेला आणि कोर्टातुन दोनदा आणलं. महापौर महोदया व आयुक्त साहेब आपल्या ऑफिसच्या बाजुची गोलाणी मार्केटची जी बोळ आहे तेथे किती कचरा घान असेते. तर बाकीचे काय बोलणार ? तर मी एकच विनंती करतो की, मा.नितीन भाऊनी मांडलेल्या ठरावास मी पाठिंबा देतो आणि उद्या जर की आपल्या जळगांव शहराचा कचरा १०० टनाने जर १५० किंवा २०० टनावर गेला तर नवल वाटायचा काही कारण नाही या ठिकाणी मी हे नमुद करतो. आपण बोलण्याची संधी दिली या बाबत धन्यवाद.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** एक तासापासुन सभागृहाचा वेळ वाया घालवता आहे. सादा विषय आहे. ज्या ड्रायव्हर आणि कर्मचारी त्यांना येथे बोलवा आणि विचारा की कोणी मुरुम भरायला लावलं आणि कोणी रोडावर टाकायला लावलं.

**श्री.कैलास सोनवणे :-** या ठिकाणी नितीन भाऊ आणि विष्णु भाऊ हे जे इतके कळकळीने बोलले हे सर्व या १४ दिवसातच झाले आहे या पुर्वी काहीच झाले नाही.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मा.महापौर जसे सन्मा.सदस्यांनी या ठिकाणी बोलले, खरं तर असे वाटत आहे की ७०-८० टक्के ठेकेदाराने अटीशर्तींचा भंग केलेला आहे. परंतु उपायुक्तांनी जसा सांगितलं की आम्ही त्याला वारंवार दंडाची नोटीस देत आहोत. किंवा त्याच्या कडुन दंड वसुल करत आहोत. दंड वसुल करणे हे पर्याय नाही. मा.आयुक्त मला सांगा आपण जे हे दंड वसुल करतो आहे. हा दंड आरोग्य वरचा पर्याय नाही. कारण की, सर्व सभासदांना आरोग्य विषयी दिवसभर फोन येत असतात. जर साफसफाई न झाल्यामुळे एखाद्या नागरीकाचा जिव धोक्यात आला किंवा दुरदेवाने त्याला जिव गमवावा लागला तर अशी काही तरतुद आहे का उपायुक्त साहेब ? की आपण जे ठेकेदाराकडुन दंड आकारतो, जर त्या नागरीकाचे आरोग्य जर धोक्यात आले तर आपण ते दंडाचे पैसे त्याच्या सुविधे किंवा उपचारासाठी खर्च करु.

**अनंत जोशी :-** सगळयात पहिले मी गेल्या वर्ष भरापासुन बघत आहे किंवा त्याच्या पुर्वीही असेल आपले जे सदस्य आहे. आपली जेव्हा चर्चा सुरु असते, या ठिकाणी महिन्यातुन एकदा महासभा होते महिन्यातुन एकदा मिटींग होते. शहराच्या विविध प्रश्नांवर चर्चा करायला आपण या ठिकाणी एकत्रीत येतो, निर्णय घ्यायला एकत्रीत येतो. आणि अर्धा तास पौन तास सभेला झाला की चलबिचल सुरु होते सदस्यांची आणि बस झालं किती बोलता, मला एक सांगा जे सद्या आपण बघत आहोत मा.पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी सत्तेवर आल्यानंतर कधी नव्हे ते बघतलेले आहे. लोकसभेचे सभागृह लागोपाठ चालनं हा एक विषय आहे आणि रात्रीतुन सभागृह चालने हा दुसरा विषय आहे. सदस्यांना फायर करणे , रागावणे , सक्तीचे करणे की तुम्ही हजर राहायलाच पाहीजे आणि रात्रीतुन कामकाज चालते एवढया मोठया सर्वोच्च सभागृहात कामकाज चालते तर आपण या ठिकाणी महिन्यातुन एकदा एकत्र येतात आणि थोडी चर्चा केली की लगेच म्हणतात की थांबा म्हणजे चर्चा करायची सुध्दा तयारी नाही ही मानसिकता बदलली पाहीजे आणि चर्चेतुन निर्णय घेतले जातील माझी विनंती आहे ही सभागृहाला आणि ज्यांना त्रास असेल त्यांनी सही करावी मिसळ खावी आणि घरी जावे ही विनंती आहे , याच अनुषगांने दुसरा विषय असा आहे मी मा.महापौर यांची परवानगी घेतली आहे मागील दुसरी की तिसरी मिटींग आहे आजची मी टाळतो आता बोलणे परंतु मा.महापौर साहेब किंवा उपमहापौर साहेब परवानगी देतील त्यावेळेस मी बोलेल आणि आता मी परवानगी घेतलेली होती मला हाच मा.पंतप्रधान यांचा मुद्या मांडायचा होता परवानगी घेत होतो त्यावेळी मला विशालभाऊ व ईतर सदस्य मला अडवत होते हे चुकीचे आहे सभागृहात संपुर्ण अधिकार हा महापौरांचा असतो पिठासीन अधिकारी महापौर असतात त्यांनी त्यावर कंट्रोल ठेवले पाहीजे आणि त्यांनी सांगीतले पाहीजे व उपमहापौर साहेब यांचा अधिकार आहे ते मी मान्य करू शकतो हे सदस्य मी वर्षभरापासुन मी बघतोय आज विशाल भाऊंनी नविन एन्ट्री केली पुर्वी काही सदस्य होते की जे थांबवायचे बोलु द्यायचे नाही वाद घालायचे आता सुज्ञ असे व अभ्यासु नगरसेवक म्हणून त्यांचा परिचय आहे नेताजी ज्याला म्हणतात .

**श्री.विशाल त्रिपाठी :-** माझा उद्येश एकच होता की नितीन भाऊंचे बोलणे झाल्यावर तुम्ही बोलावे .

**अनंत जोशी :-** विशाल भाऊ नितीन भाऊ आमचे ज्येष्ठ नेते आहेत त्यांच्या कडुन आम्ही सर्व शिकलो आहेत मी त्यांची व महापौर व उपमहापौरांची परवानगी घेतली होती तुमच लक्ष नव्हत आणि दुसरा मुद्या मी हे मान्य करतो मला हे मागच्या

मिटींगलाही बालायचे होते मी सभागृहापुढे जाहीर पणे माफी मागु ईच्छीतो की माझ्याकडुन किंवा माझा स्वभाव असेल लगेच रिॲक्ट होण्याचा व माझ्या स्वभावाचा कमकवुत पणा असेल मलाही लगेच राग येतो आणि त्याच्या भरात माझ याकडुन बोलले जाते दोन मिटींग आधी या सभागृहामध्ये अप्पा साहेब २५ ते ३० वर्षापासुन ज्येष्ठ नगरसेवक आहेत आणि ते माझे मोठे भाऊ आहेत माझे व त्यांचे कौटुबिक नाते आहे ते माझ्या मोठया भावासारखे आहेत त्यादिवशी ते मला चुकीच्या पध्दतीने बोलले ते मान्य करतील किंवा नाही करतील ते मला माहिती नाही ऐकुन घ्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी मान्यच करणार नाही .

**अनंत जोशी :-** विषयांतर होणार नाही याची काळजी घेईल मी लगेच माझा विषय संपवतो त्यावेळेस अप्पासाहेब मला चुकीच्या पध्दतीने बोलले ते मला चुकीने ते बोलले व माझ्याकडुन चुकुन मी माझा विषय मांडला असता ते ठिक आहे मी माझी जागा सोडली आणि त्यांच्याशी तिथे वाद घालायला गेलो आणि त्याचे त्यांना वाईट वाटले आणि वृत्तपत्रातुन ते फोटो छापुन आले आणि त्यावर मला स्वत:ला वाईट वाटले की माझा मोठा भाऊ व या सभागृहाचा ज्येष्ठ नेता आहे २५ वर्षापासुन व त्यांचा मान संपुर्ण जळगांव शहर करतो हे सभागृह करते व मी पण करतो ते फोटो आल्यानंतर मलाही खुप वाईट वाटले मला माझ्या घरचेही खुप रागावले दुसरी गोष्ट अश्विन भाऊंबद्दल काही बोललो नव्हतो अश्विन भाऊंचा त्या दिवशी गैरसमज झाला त्या बद्दल मी दोघांचीही माफी मागतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी काहीच करत नव्हतो मी येथुनच बोलत होतो याउलट तुम्ही तेथुन या ठिकाणी आले होते .

**अनंत जोशी :-** सर्व वृत्तपत्रवाल्यांना माझी विनंती राहील की त्या दिवसाचा जसा फोटो छापला होता तसा आणखी एक फोटो छापायची कृपा करावी अशी माझी विनंती आहे माझा आपण एक फोटो घ्या ज्यांना छापायची ईच्छा झाली तर त्यांनी तो छापावा माझ्या कडुन गैरसमज , चुकुन अनवधानाने चुकीच्या पध्दतीने मी वागलो जर मी आधी बोललो असतो कारण मागची माझी पहिली टर्म होती ही माझी दुसरी टर्म आहे म्हणजे ७ वर्ष झाले. मी त्या अर्थाने नविनच आहे. पण भगतभाई सारखा सिनियर माणुस जेष्ठ माणुस ज्या पध्दतीने अमर भाऊंना बोलता, ते खरे पध्दती मला वाईट वाटले. हे भगतभाईकडुन असे अपेक्षित नाही. तर त्या दिवसाच्या फोटोबाबत मी दोघांशी माफी मागतो.

श्री.इब्राहिम पटेल :- या बाबतीत साहेबांनी सांगितले की, ज्या दिवशी ठेका सुरु होईल त्या दिवसापासुन ठेकेदारांनी कामगार आणि तेवढे काम उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. आज १४-१५ दिवस झाले परंतु आमच्या कडे अजुन पर्यंत एकही ठेकेदाराचा कामगार देण्यात आलेला नाही.मी दोन चार दिवसापुर्वी आरोग्य अधिकाऱ्यांना फोन लावला. जर ठेक्यामध्ये आहे की कामगार द्यायला पाहिजे मग आमच्या वार्डात एक ही कामगार का दिला नाही. जे कायम कामगार आहे २-४, तर मी मागच्या आठवड्यात फिरलो वार्डात, फोन लावला मुकादमाला की किती कामगार आहे तर ते म्हणाले चार कामगार आहे. कुठे काम करीत आहे. तो म्हणाला ए.टी.एम. गल्लीत, दुसऱ्या मुकादमाला विचारले, कामगार कुठे काम करीत आहे. त्यांनी ही सांगितले की ए.टी.एम. गल्ली, म्हणजे यांच्या समन्वय बघा, दोन्ही एकच गल्ली सांगत आहे. मी तेथे जाऊन बघीतले तर तेथे फक्त एकच कामगार होता. खान साहेबांना बोलवलं आणि विचारलं, कामगार कुठे आहे. एक तासानंतर तो कामगार पळत आला. आल्यानंतर त्याच्या हातात काहीच नाही.फावडा नाही, झाडु नाही काहीच नाही. मी खान साहेबांना बालविले, गाडीवर बसविले, किती ठिकाणी कुठे कुठे कचरा आहे ते ही दाखविले. खान साहेबांनी विचारले तुझ्या हातात काहीच नाही, तर त्याने उत्तर दिले. मी दहा दिवसापासुन सुटीवर होतो आजच आलो. कर्मचारी कडे फावडा नाही, झाडु नाही, वार्डात एकच बाई आहे ती पण एका तासानंतर आली, तर आमच्या वार्डाने काय गुन्हा केलेला आहे.घंटागाडी फिरत नाही. एकच घंटागाडी आहे. ती पण आताच आली.

**श्री.नितीन बरडे :-** अप्पा साहेब, मला या मक्त्याचा अभ्यास कमी आहे, आपण दैनंदिन ठेका दिलेला आहे, तीन दिवसात झाडु, आणि तीन दिवसात गटार काम, बाबतीत काही तरतुद आहे का या मक्त्यांत एका परिसरात एक झाडु काम तीन दिवसांआड होते , आपण रोज १०० रूपये एका गल्लीला दिलेले आहे मग ३ दिवसाआड गटार व झाडु काम कसे काय होत आहे रोजच्या रोज झाडु व गटार काम व्हायला पाहीजे .

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्ही जे म्हणत आहेत तो या मक्त्याचा विषय आहे का ?

**ईब्राहीम पटेल :-** अप्पा रोज व्हायला पाहीजे .

**श्री.कैलास सोनवणे :-** होईल ना मग तुम्ही तक्रारी करा . महापौर साहेब मला बोलायचे आहे हे जितके बोलत आहे यांना तुम्ही परवानगी दिली आहे का ? मला सांगा मागच्या वेळेस तुम्हीच सर्व जण या बाबत ओरडले तुमच्यातीलच काही लोकांनी पत्र दिले व अकाऊंट मध्ये गेले आणि त्यांचे बिलेही काढुन दिले मग तेव्हा काय झाले होते .

**श्री.नितीन बरडे :-** अप्पा कोणी केले ?

**श्री.कैलास सोनवणे :-** सुनिल भाऊंना विचारा

**श्री. सुनिल महाजन :-** माझे पत्र असेल तर मला दाखवा मी दिलेले नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्ही त्यावेळी उपमहापौर होते व त्यावेळी तुम्हीच हा किस्सा मला सांगीतला होता तुम्ही बोलले होते की मला अडचण आहे म्हणुन मी काढले . म्हणजे आपले राहीले तर काढायचे आणि दुसऱ्याचे राहीले तर मागणी करायची नाही , माझ्या कडे हे नाही व ते नाही तुम्ही तक्रारी मांडा ते उपायुक्त पाहतील ते कार्यवाही करतील काय १४ दिवसांत ठेका रद्य कराल का तुम्ही ? त्याला तुम्ही संधी तर द्या .

**श्री. सुनिल महाजन :-** ज्याचा असेल त्याचे काढुन द्या ना मला काही घेणेदेणे नाही .

**श्री.नितीन बरडे :-** पहिल्या ठेक्याच्यावेळी नितीन बरडे तक्रारी करत होता उपमहापौर साहेब तुमच्या माहितीसाठी सांगतो १६ तारखेपासुन ठेका झालेला आहे आधी मी १९ तारखेपासुन सुरूवात केलेली आहे २१ तारखेला मक्तेदाराचा माणुस नितीन बरडे कडे आला ३ टक्के पार्टनरशिप घेवुन घ्या असे म्हणाला .

**श्री.कैलास सोनवणे :-** किती टक्के ?

**श्री.नितीन बरडे :-** ३ टक्के पार्टनरशिप घे म्हणाला.

**श्री.कैलास सोनवणे :-** हि लायकी ओळखली का त्याने ३ टक्के फक्त .

**श्री.नितीन बरडे :-** दंडाची सुरूवात करावी .

**श्री.कैलास सोनवणे :-** १९ तारखेपासुन मी सुध्दा तक्रारी केल्या आहेत माझ्या वॉर्डातही तक्रारी आहेत . मला तर तो ठेक्याचे बोललाच नाही .

**श्री.सुनिल खडके :-** मा.महापौर ताई , आयुक्त साहेब आणि उपमहापौर साहेब जेडीसीसी बँकेचे त्यानंतर हुडकोचे कर्ज फेडले गेले त्याब.ल आपण सर्वाचे अभिनंदन केले . मा.आमदार राजुमामा भोळे तसेच आपले पालकमंत्री गिरीषभाऊ महाजन व मुख्यमंत्री साहेब या सर्वांचे आपण अभिनंदन केलेले आहे , परंतु नेमके हे प्रकरण काय आहे हे नविन सदस्य जे आता बसलेले आहेत नगरसेवक नगरसेविका यांना तसेच शहरातील नागरीकांना कळावे म्हणून मी आपल्या मार्फत ही माहिती देत आहे . साधारणत: हुडकोचे जे कर्ज आहे ते आपण घेतले होते १४१ कोटी ३४ लाख रूपये कर्ज आपण घेतलेले होते आणि हे कर्ज आपण १९८९ ते ९० च्या दरम्यान घेतले होते तसेच आपण ते २००१ पर्यंत घेतले होते या कर्जाचे आपण ३६० कोटी २१ लाख दहा हजार ८४२ रूपये भरलेले आहे आणि ४३२ कोटी रूपये बाकी आहेत त्यामध्ये मंत्रालयात निर्णय झालेला आहे की अर्धी - अर्धी रक्कम भरणेचा विषय झालेला आहे हे आपल्याला सर्वांना ज्ञात आहे तसेच जेडीसीसी बँकेचे आपण ६९ कोटी ९८ लाख ५० हजार ७०४ रूपये कर्ज घेतलेले होते त्यापोटी आपण या कर्जाचे १८९ कोटी ८२ लाख ७६ हजार ३ रूपये भरलेले आहे तर आपण जर आता हा हिशोब बघितला तर हा सर्व आकडेवारीचा खेळ ९९२ कोटी रूपये फक्त कर्जाचे व्याज भरलेले आहे तर मला वाटते की हे कर्ज जर फीटले असते आणि त्या रक्कमेचा आपण सदुपयोग केला असता तर जळगांव शहर सुंदर शहर हिरवेगार शहर एक नक्कीच आपल्याला जसे काहींचे स्वप्न होते की सिंगापुर बनवु त्याप्रमाणे आपले हे शहर झाले असते असे मला वाटते तर आपल्यामार्फत मी नगरसेवकांना आणि नागरीकांना कारण हे पैसे नागरीकांनी भरलेले आहेत हे पैसे तुम्ही किंवा आम्ही भरलेले नाहीत तर हा भुर्दंड हा खुप मोठया प्रमाणात पडलेला आहे तर असे व्हायला नको होते ते झालेले आहे आणि ही माहीती नगरसेवकांपुढे व नागरीकांपुढे यावी या कर्जाच्या निमीत्ताने म्हणून मी ही माहिती सभागृहाला दिली .

**नगरसचिव :-** सन्मा.सभागृहाला विनंती आहे आता विषय पत्रिकेवरील विषय घेण्यात येत आहेत .

**नगरसचिव :- विषय क्रं:- १)** दि.०३/०८/२०१९ रोजी झालेल्या महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मा.महापौर साहेब या ईतिवृत्ता मध्ये आलेला एक विषय होता की भिल्ल समाजाच्या दफनभुमी करीता जागा मिळावी जसे त्या परिसरात जेवढा भिल्ल समाज आहे तेवढाच नाथजोगी समाज सुध्दा आहे त्यांना दफनविधीसाठी जागा उपलब्ध नाहीये तसे मी महापौरांना पत्र सुध्दा दिलेले आहे त्याबाबत माझी एक विनंती होती की दोघे समाजांना अर्धी अर्धी जागा देण्यात यावी अशी दुरूस्ती करण्यात यावी अशी विनंती आहे.

**सौ.ज्याती चव्हाण :-** आपली जी लक्षवेधी झाली तसे प्रभाग क्र.१३ मध्ये साफसफाई नाही संपुर्ण जळगांव शहरात साफसफाई नाही. आपले जे महानगरपालिकेचे ५०० कर्मचारी आहे त्यांची कशी विभागणी केली आहे. आणि मक्तेदारावर अंकुश ठेवण्याचे काम मा.आयुक्त, मा.उपायुक्त आणि त्यांचे अधिकाऱ्यांचे आहे. त्यांनी मक्तेदारावर नियंत्रण का ठेवले नाही. आपले ५०० कामगार काय काम करीत आहे आठ दिवसापासुन, सगळं आपण मक्तेदारावर सोपविले मग आपले कामगार कुठे आहे घरी होते का ते ?

**उपायुक्त, आरोग्य विभाग :-** मा.महापौर साहेब, मा.उपमहापौर आणि मा.आयुक्त साहेब सन्मा.सदस्यानी जो उपस्थित केलेला मुद्दा आहे की, आपले साफ सफाई कामगार आहे तर प्रभाग समिती क्र.१ च्या क्षेत्रात १७७ कर्मचारी आपले आहे, मागील ८ दिवसाची जी आकडेवारी आहे, १५१ कर्मचारी हजर आहे, काही कर्मचारी गैरहजर आहे काही रजेवर आहे. असे कर्मचारी ३४ आहे. प्रभाग समिती क्र.२ च्या क्षेत्रात १३७ कर्मचारी आहेत. त्यामध्ये १२३ कर्मचारी हजर आहे आणि १४ गैरहजर आहे काही सुट्टीवर आहे. प्रभाग समिती क्र.३ मध्ये १३० कर्मचारी आहे, हजर ९० कर्मचारी आहे, ३१ सुट्टीवर आहे काही गैरहजर आहे. आणि प्रभाग समिती क्र.४ मध्ये आपले फक्त ५ कर्मचारी नियुक्त आहे. आणि ५ ही हजर कर्मचारी आहे. आता जे कर्मचारी गैरहजर असतात किंवा न सांगता सुट्टीवर जातात त्यांच्यासाठी आम्ही एक कडक धोरण तयार करु आणि पुढील चार दिवसात त्याची अंमलबजावणी करु.

**सौ.ज्याती चव्हाण :-** आता प्रभाग समिती क्र.३ मध्ये तुम्ही १३१ कामगार सांगतात तर माझ्या प्रभाग क्र.१३ मध्ये किती कामगार रहायला पाहिजे होते.

**उपायुक्त, आरोग्य विभाग :-** तुमच्या वार्डात कमीत कमी २०-२२ कर्मचारी पाहिजे.

**सौ.ज्याती चव्हाण :-** मग तितके तरी हजर असतात का ? त्याची कधी दखल घेतली का आपण ? मी रोज दखल घेते ३ कर्मचारी हजर असतात. काय करायचं आम्ही. माझा वाढीव भाग आहे रायसोनी नगर त्या ठिकाणी आपले महानगरपालिकेचे कर्मचारी काम करत आहे. रस्ते स्वच्छ नाही, गटारी स्वच्छ नाही,

**उपायुक्त, आरोग्य विभाग :-** आज आम्ही तुमचे प्रभाग क्र.१३ आणि सर्व प्रभागाचे नियोजन करु.

**सौ.ज्याती चव्हाण :-** आज कसे काय आधीच व्हायला पाहिजे होतं हे. आयुक्त साहेब २५ कोटी मधुन आपण पोल लावले पोलवर सर्व्हीस वायर सोडली आणि लॅम्प किंवा टी-५ लाईट त्याचा कडे दिले नाही.त्याला काय सांगण्यात आले की, टी-५ महापालिका लावेल, महापालिका कर्मचारी म्हणतात जेव्हा एल.ई.डी.चे साहित्य निघेल तेव्हा आम्ही ते लावु.आता तेथे आंधार आहे. दिड महिना झाला आता फक्त पोल उभे आहे तिथे.

**मा.आयुक्त :-** सन्मा.महापौर, उपमहापौर व संपुर्ण सभागृह आपल्या दोन लक्षवेधीच्या माध्यमातुन आणि इतर सर्व नगरसेवकांचे जे अनुभव आहे त्याबद्दल चर्चा झाली आणि अतिशय चांगली चर्चा झाली. ज्या वेळेला आपला महानगरपालिकेचे नगरसेवक या कामावर लक्ष देऊन असतो त्यात नक्कीच त्या कामाची गुणवत्ता वाढते. जेव्हा मी इथे आलो मला आश्चर्य वाटलं, जेव्हा मी येथील स्वच्छतेची पध्दत पाहिली. त्यावेळेला अतिशय वाईट परिस्थीती होती आता १५ तारखेला आपले जुने जे ठेके होते. प्रशासनाकडुनच सांगण्यात आलं की कमीत कमी १० जे ठेके बंद होणार आहे त्या ठिकाणी ठेके सुरु करण्यात यावे. काही प्रमाणात ठेकेदाराची यासाठी पुर्व तयारी नव्हती. आणि २२ तारखेपासुन उर्वरीत ठिकाणी काम करायचे होते. ऐवढं मोठं शहर ऐवढे मोठे कामाचे स्वरुप तर काही गोष्टींसाठी आपल्याला वेळ द्यावा लागणार आहे. या १५ दिवसातच काही निष्कर्ष काढु अशी जर टोकाची भुमिका घेतली, ठेकेदाराला कुठलीही प्रकारे agreement च्या बाहेर जाऊन कुठलीही मदत कुठलाही कर्मचारी, अधिकारी करणार नाही, आणि जर तसे कोणी केलं तर त्याच्यावर सक्त कार्यवाही करण्यात येईल.काल या संदर्भात आम्ही २ तास चर्चा केली काय नेमकं होत आहे. तर असे लक्षात आलं की आपण ठेका दिला म्हणजे आपली जबाबदारी संपली, महानगरपालिकेचे जे कर्मचारी आहे, अधिकारी

आहे यांच्याशी संपुर्णपणे काम करुन घेणे आपली जबाबदारी आहे, वार्ड ऑफिसरांना विचारलं तुमच्या वार्डात काय परिस्थिती आहे तर सगळे चहरे Blank होते. आम्ही या ठिकाणी सुचना असे दिलेले आहे, वार्ड ऑफिसर, सि.एस.आय आणि आरोग्याधिकारी यांची रिपोर्ट करणेची जबाबदारी राहील. आपण जर १५ दिवस असं केलं तर संपुर्णपणे घडी बसुन जाईल. आज आपण ८०-८५ टक्के घरापर्यंत पोहचलेलो आहे. काही ठिकाणी घंटागाड्या जात नाही. वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. त्या ठिकाणी हातगाडीच्या माध्यमातुन काम सुरु होणार आहे. आता जे कैलास अप्पांनी जे सांगितले की जर मक्तेदाराने १० ऐवजी २० टॅक्टर लावले तर सर्व कचरा निघु शकेल. तर त्यानी १० ट्रॅक्टर लावले. आणि सांगितलेले होते की, आज पासुन आम्ही २०-२१ ट्रॅक्टर त्या ठिकाणी लावु. वस्तुस्थिती काय आहे ते आज संध्याकाळी लक्षात येईल. आपण त्या ठेकेदाराला संधी देऊ या, ठेकेदाराच्या चुकीच्या वृत्तीला मान्य करणार नाही. वेळ आली तर सर्व रेकॉर्ड चेक करुन ठेका रद्द करण्याचा सुध्दा आपण प्रस्ताव या ठिकाणी ठेऊ. आता स्वतंत्र उपायुक्त या ठिकाणी आलेले आहे. आणि त्यांनी पिंपरी चिंचवड या महानगरपालिकेमध्ये स्वच्छतेचे काम त्यांच्या कडे होते, लातुर महानगरपालिकेत ही त्यांनी काम केलेलं आहे. त्यामुळे एक सक्षम अधिकारी मिळालेला आहे. वार्ड ऑफिसर आणि संबंधीत जे सि.एस.आय आहे त्यांना ही सक्त सुचना राहतील की १५ दिवसातच हे १५ दिवस ही शेवटची मुदत आहे. त्याच्या आधीच एक १० दिवसात मी स्वत: राऊंड घेऊन ज्या ठिकाणी अस्वच्छता दिसेल त्या ठिकाणचे फोटो घेऊन आम्ही कार्यवाही करु आणि संबंधीतांचे म्हणणं एकु. दंडाची जे काही सुचना आहे. तर दंड त्याप्रमाणेच वसुल करण्यात येईल. आणि दंड वसुल आपण हा बिलातुन करु. काही मशनरी हॅण्डओवर करायचे होते ते ही आज होऊन जाईल. दुसरा विषय आहे वजन काटयाच्या संदर्भात तर वजन काट्याची प्रोव्हीजन आपण करायला पाहिजे होती. तर स्थायी मधील प्रस्तावात ते आहे. एक जुना वजन काटा दुरुस्त करण्याच्या संदर्भात प्रस्ताव आहे तर ते दुरुस्त करावा अशी सुचना मी उपायुक्तांना देतो. आपल्याला बऱ्याच दिवसापासुन काही सवय लागलेल्या आहे. जर घंटागाडी प्रत्येक घरापर्यंत गेली तर रस्त्यावर कचरा पडायलाच नको, पण इतके दिवसाची सवय जर आपल्याला बदलायची असली तर त्याला वेळ लागतो. फक्त कचरा ढिगार जे असतील जसे बाजारपेठ असेल, मार्केट असतील, एस.टी.स्टॅण्ड असेल. आपल्याला ती सवय लागेल म्हणुन जी तरतुद ६०% ची केलेली आहे ती त्यासाठीच केलेली आहे. जिथे शुन्य नियोजन आहे ते आपण ६० टक्केवर घेऊन जावं आणि मग ६० टक्केपासुन ९०-९५ टक्के पर्यंत पोहचावं. हे सर्व काही आपण येत्या १५ दिवसात करु इच्छीतो आणि जर नाही झालं तर याची पर्यायी व्यवस्था आपण करु. ई.एस.एल.च्या संदर्भात मागे ताईंनी सांगितले की काय झालं. त्या अनुषंगाने आपण त्यांना नोटीस दिलेली आहे. त्या नोटीसीचे उत्तर अद्याप आलेले नाही. परंतु त्यांचे प्रतिनिधी येऊन गेलेले आहे आणि जे काही जुन्या फिक्सचर्स त्यांनी लावलेले आहे त्यांची दुरुस्ती आम्ही तात्काळ करतो असे सांगितलेले आहे. तुम्ही आम्हाला पत्र द्या, पत्र आल्यानंतर या संपुर्ण योजनेचे काही संचालक, नगरपालिका प्रशासन तर त्या माध्यमातुन काम पुढे जाणार आहे. आणि Terminate केल्यानंतरचा आज काही जे चित्र दिसत आहे संपुर्ण शासन निर्णय वाचल्यानंतर किंवा परवाच पिंपरी-चिंचवडचा एक ठराव विखंडीत झालेला आहे ई.एस.एल.च्या संदर्भात तर आपल्याला पुढची परिस्थिती अजुन भयानक होणार आहे. त्याप्रमाणे त्यांचे जे वरिष्ठ अधिकारी येतील त्यांच्याशी चर्चा करुन आम्ही सभागृहाला अवगत करु.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** साहेबांनी जे सांगितले की, घरच्या कचऱ्यासाठी घंटागाड्या आहे. पण जे काही मेस आहे त्यातील उरलेले अन्न किंवा त्यांच्या कचऱ्यासाठी काही वेगळे पर्यायी आहे का?

**मा.आयुक्त :-** हॅाटेल वेस्टची गाडी आहे. परंतु १०० किलो म्हणजे एक टन पेक्षा जास्त कचरा निर्माण करणारे ठिकाण असतील तर त्याची पुर्णपणे जबाबदारी त्यांची आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१९७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, दि.०३/०८/२०१९ रोजी झालेल्या महासभा आयत्यावेळेचा विषय क्र.०२ ठराव क्र.१८९ अन्वये हरिविठ्ठल नगर, पिंप्राळा हुडको, वाघ नगर, येथे मोठया प्रमाणात भिल्ल आदिवासी समाज वास्तव्य करीत आहे. परंतू सदर भागामध्ये प्रेत दफन करण्यासाठी कुठलीही दफनभुमी नसल्या कारणाने नागरीकांना प्रेत दफन करण्यासाठी पिंप्राळा गट क्र. व उपविभाग २६० मधिल अर्धी जागा भिल्ल

आदिवासी समाजासाठी व अर्धी जागा नाथजोगी समाजाकरिता दफनभुमीसाठी देणेत यावी अशी इतिवृत्तामध्ये दुरुस्ती करुन सदरच्या बैठकीचे कार्यवृत्त दुरुस्तीसह कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभूषण विरभान**

**अनुमोदक :- भिल पार्वताबाई दामू**

**नगरसचिव :- विषय क्रं:-२)** जळगांव महानगरपालिकेतील लिपीक या पदाची सेवा चांदुर रेल्वे नगरपरिषद अथवा अमरावती जिल्हयातील इतर कोणत्याही नगरपरिषद येथे लिपीक संवर्गातील रिक्त पदावर बदलीने नेमणूक देणेकामी ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावाचे वाचन केले.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१९८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, श्रीमती,नलुताई सहदेव दंदी,लिपीक,प्रभाग समिती क्र. 1 यांचा मा.महापौर,मनपा,जळगांव यांचेमार्फत दि.29/04/2019 रोजीचा विनंती अर्ज प्रशासनास प्राप्त झालेला आहे. अर्जात श्रीमती.दंदी यांनी अमरावती जिल्हयातील चांदुर रेल्वे नगरपरिषद किंवा (अमरावती जिल्हयातील ) इतर कोणत्याही नगरपरिषद असलेल्या लिपीक संवर्गातील पदावरील जागी बदलीने नेमणूक देणेबाबत आपले ना-हरकत पत्र मिळणेस व त्याबाबत महासभेचा निर्णय घेवून तसा ठराव पारित करुन मिळणेबाबत नमूद केले आहे.

श्रीमती.नलुताई सहदेव दंदी या मागासवर्गीय अनुशेष भरती सन 2011 अंतर्गत सरळ सेवेव्दारे नियुक्त झालेल्याआहेत. त्या दि.30/11/2012 पासून जळगांव शहर महानगरपालिकेच्या आस्थापना सूचीवरील लिपीक या पदावर वेतनश्रेणी रु.5200-20200/- व ग्रेड पे रु.1900/- मध्ये कायम सेवेत कार्यरत असून हल्ली त्या लिपीक म्हणून प्रभाग समिती क्र. 1 येथे कार्यरत आहेत. त्यांचे मूळगांव साईनगर,दर्यापुर जि.अमरावती येथील रहिवाशी आहेत. त्याचे पती अमरावती जिल्हयातील चांदुर रेल्वे येथे वर्ग 4 चे कर्मचारी म्हणून केंद्रीय सेवेत कार्यरत आहेत. सासु-सासरे वृद्धपकाळाने आजारी आहेत व त्यांची लहान मुलगी असल्याने त्यांचे पालन पोषणाची जबाबदारी कुटूंबकर्ता म्हणून देखरेखीसाठी त्यांचे पती यांना तिथेच निवास करणे भाग पडते.त्यामुळे अमरावती शहर हे जळगाव येथून 300 कि.मी.अंतरावर असल्याने काही अडचणी उद्भवल्यास माझे जाणे शक्य होत नाही. त्यामुळे अत्यंत गैरसोय होत असल्याचे अर्जात नमूद आहे. त्यांची बदली अमरावती जिल्हयातील चांदुर रेल्वे नगरपरिषद किंवा अमरावती जिल्हयातील इतर कोणत्याही नगरपरिषद येथे बदलीने नेमणूक मिळणेसाठी ना-हरकत पत्र व महासभेची (मंजूरीचा ठराव) सहमती मिळण्याची विनंती केली आहे. श्रीमती नलुताई सहदेव दंदी यांनी केलेल्या अर्जाबाबत महाराष्ट्र शासनाने शासन परिपत्रक क्र. SRV-1097/प्र.क्र.20/97/बारा,दि.27 नोव्हेंबर,1997 अन्वये शासकीय सेवकांच्या नियतकालिक बदल्यासंदर्भात ठरविलेल्या धोरणानुसार विचार करता येईल.

तसेच त्यांचे सेवापुस्तक पाहता त्यांचे विरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित नाही. तसेच त्यांचेकडेस काहीएक बाकी घेणे नाही. तसेच लेखा परिक्षणात त्यांचेबाबत कोणताही आक्षेप नाही.

वर नमूद परिपत्रकाचा मुद्दा क्र. 2(1) (ब) नुसार श्रीमती. नलुताई सहदेव दंदी यांचे पती अमरावती जिल्हयातील चांदुर रेल्वे येथे वर्ग-4 चे कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांचेकडेस वृद्ध सासु-सासऱ्यांची पालन पोषणाची जबाबदारी पती पत्नी यांना एकत्रित ठेवण्याच्या शासन धोरणानुसार त्यांना ना-हरकत पत्र देणेकामी महासभेचा ठराव पारित करणे आवश्यक असल्याने परिपत्रकातील सुधारित धोरण क्र. 2 नुसार त्यांच्या सेवेचा जिल्हयातील कार्यकाळ सुमारे 6 वर्षे 5 महिने झालेला असून क्र. 4 नुसार त्यातील (अ) व (ब) नुसार त्यांनी कळविलेली पसंती,त्यांची प्रशासकीय सोय व वैयक्तिक पसंती विचारांत घेता श्रीमती,नलुताई सहदेव दंदी,लिपीक,प्रभाग समिती क्र. 1 यांची अमरावती जिल्हयातील चांदुर रेल्वे नगरपरिषद किंवा (अमरावती जिल्हयातील ) इतर कोणत्याही नगरपरिषद असलेल्या लिपीक संवर्गातील पदावरील जागी आंतरजिल्हा बदलीने नेमणूक होणे कामी ना-हरकत प्रमाणपत्र देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सोनवणे भारती कैलास**

**अनुमोदक :- बालाणी भगतराम रावलमल**

**नगरसचिव :- विषय क्रं:-३)** महानगरपालिका गाळे भाडे निधी (मनपा फंड) अंतर्गत विदयुत विभागाकरिता खरेदी करण्यात आलेल्या TATA ४०७ चेसीसवर ११ मिटर उंचीचे Boom Type Ladder व TATA ७०९ चेसीसवर १५ मिटर उंचीचे Telescopic Type Ladder बांधणी करणे कामी मागविलेल्या ई-निविदा रद्द करुन Technical Specification प्रमाणे अंदाजपत्रकीय दर रक्कम रु.३२,०९,३२०/- मात्रला मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावाचे वाचन केले.

**श्री.धिरज सोनवणे :-** मा.महापौर महोदया, गेले दोन वर्ष झाले ही वाहने खरेदी केलेली आहे. दोन वर्षापासुन हे फक्त निविदा होऊन पडलेली आहे. दोन वर्षाचा कालावधी याच्यात गेला. आजच्या परिस्थितीत ते चेसीस कुठे आहे.याची माहिती सांगावीच लागेल.दोन वर्षात त्याची परिस्थिती काय ? आणि जर परिस्थिती व्यवस्थीत नसली तर त्याच्यावर ३२ लाख रुपये खर्च करुन ते व्यवस्थीत चालतील का ? याची माहिती विभागाने द्यावी. जे निविदा मागविण्यात आलेली आहे त्यात पहिली निविदा, दुसरी निविदा, तिसरी निविदा असे दोन वर्षात बरेच निविदा झालेल्या आहे. आणि जर एकच निविदा आली तर ते शासनाप्रमाणे स्विकारले जाते. आणि ही जी रक्कम आहे. ३२ लाख ही सप्लायर कडुन आलेली रक्कम आहे. ही काही आपल्या ऑटोमोबाईल इंजिनिअर कडुन सुचविलेली रक्कम नाही. हे पण एक संशयाची बाब आहे की एखाद्या सप्लायर कडुन अशी रक्कम आपण मागवायची आणि सभागृहाकडुन मान्य करुन लागु करायची. आणि दि.२०/०२/२०१८ ला ठराव क्र.८६२ चा एक ठराव झालेला आहे. फॅब्रीकेशन आणि मॉडलींग करीता काही तरी रक्कम रु.२१,०५,७५९/- ही रक्कम काढण्यात आली होती.त्याच्यानंतर १०-११ लाख रुपयांनी रक्कम वाढविणेचे कारण काय ? त्यात का बदल केला त्याचीपण माहिती प्रशासनाने द्यावी. एस.एस.पाटील साहेब आता आले तर सुनिल भोळेंनी याची माहिती द्यावी.

**श्री.एस.एस.पाटील :-** मा.महापौर आणि संपुर्ण सभागृह, महासभा ठराव क्र. ७९२ दि.१६/११/२०१७ अन्वये विद्युत विभागाकरीता दोन हॅड्रोलिक लॅडर, एक होतं १२ मिटर उंचीचा आणि एक होते, ९ मिटर उंचीचा, यासाठी आपण चेचीस खरेदी केलेलं आहे. चेचीस खरेदी कामी जो खर्च लागलेला आहे. तो ११ लाखाचा विषय होता आणि १२ मी आणि ९ मी याच्यासाठी जो खर्च होता ते होता २१ लाख असे एकुण चेसीस खरेदी करायचं आणि त्याच्यावरची बांधणी करायची असे एकुण साठी ४१ लाख रुपयांना महासभेने मान्यता दिलेली होती. ज्या वेळेला वाहन विभागामार्फत त्याची निविदा प्रक्रिया सुरु झाली. तर निविदा प्रक्रिया करतांना त्यावेळेला ९ मी आणि १२ मी ची जी लॅडरसाठी बांधणी करायची होती. त्याच्या ऐवजी १५ मी टेलिस्कोपीक आणि ११ मी एल टाईप ट्राझीट मशिनसाठी टेंडर देण्यात आले. हा जो निर्णय आहे हा कसा घेतला मला आता सांगता नाही येणार परंतु हे तांत्रिक Specification जे आहे हे लक्षात घेऊन निविदा काढण्यात आल्या. आणि ह्या निविदा काढण्यात आल्या.

**श्री.धिरज सोनवणे :-** साहेब मी आधीच सांगितले की त्यांना सांगता येणार नाही. त्यांना माहित नाही. तुम्ही भोळे साहेबांना विचारा,

**मा.आयुक्त :-** त्यांना माहिती आहे ना.

**श्री.धिरज सोनवणे :-** त्यांनी ईस्टीमेट केलेलं आहे. त्यांनी अमाऊंट टाकलेली आहे तर ही अमाऊंट आली कुठुन, ती कोणी सुचविली, आणि एजन्सीने कसे ठरविले की हा बरोबर इतकीच रक्कम लागणार आहे. एक सिव्हील इंजिनिअर कसा सांगु शकतो इतके खर्च येईल. आपल्याकडे टेक्नीकल ऑटोमोबाईल इंजिनिअर आहे का ?

**मा.आयुक्त :-** हा विषय पुढच्या वेळेस घेऊ.

**श्री.नितीन लढढा :-** मा.महापौरताई काय झालेलं आहे, वेगवेगळया कारणाने हा विषय प्रलंबीत पडत आहे आणि अत्यंत महत्वाचा आहे कारण चेसीसच्या बाबतीत एक धोका आपल्याला सांगतो, चेसीस जे आहे ते उज्वल ऑटो मोटर्सला पडलेले आहे, चेचीस Purchase झालेले आहे. आता विविध कारणामुळे जर या गाड्यांचे Registeration नाही झाले तर अजुन समस्या निर्माण होईल. आज साधारणता सन २०१८ पासुन हा निर्णय घेतलेला होता, आणि त्यावेळेला निर्णय या अनुषंगाने घेतलेला होता मार्केटच्या गाळे भाडे मधुन साधारणता २४ कोटी रुपये जमा करण्यात आलेले होते आणि महानगरपालिकेच्या फायरच्या गाड्यांची अवस्था बघता फायर सिस्टीम Update करणे आणि वाहने सुस्थितीत ठेवणे, या

अनुषंगाने फायर फाईटरचा निर्णय घेतला, Ethical Manners जे आहे जर ते आपण बघाल तर याची अवस्था अशी आहे की कोणत्या वेळेला तो Collapse होईल आणि कोणाचा जिव जाईल हे ही सांगता येत आहे. त्यावेळेला ही उशीर होण्याच्या मागचे एक राजकारण, त्यावेळेचा पत्रव्यवहार मी दाखवतो की त्या वेळेला श्री.सुनिल दत्तात्रय माळी हे भा.ज.पा.चे गटनेते होते. साधारणता दि.२०/०२/२०१८ रोजी ठराव झाला आणि दि.२०/०२/२०१८ ला ठराव झाल्यानंतर दि.२३/०२/२०१८ ला त्यांनी पत्र व्यवहार केलं. म्हणजेच ५ दिवसांनी, पत्र व्यवहार मजेशीर आहे. दि.२०/०२/२०१८ रोजी झालेली महासभेतील आयत्यावेळेच्या विषयाबाबत, वरील विषयास अनुसरुन विनंती पुर्वक अर्ज करतो की, जळगांव शहर महानगरपालिका अंतर्गत दि.२०/०२/२०१८ रोजी झालेल्या महासभेत विषय क्र. ७ मान्य करण्यात येऊन गाळे भाड्याचे रकमेतुन फायर फाईटर ३ नग खरेदी करणे, ६ नग ट्रॅक्टर ट्रॉली खरेदी करणे, विद्युत विभागासाठी २ नग हायड्रोलीक लॅडर खरेदी करणेस गाळे भोडे रक्कम २४ मधुन खरेदी करण्याचा ठराव करण्यात येत आहे. असा नाही की त्या ठरावाने एखाद्या पदाधिकारीची मरसडीस बेन्झ घ्यायची आहे की ऑडी घ्यायची आहे.असा कुठलाच ठराव नाही. जे काही वाहने घेतले ते म.न.पा.च्यासाठी अत्यावश्यक वाहने आहे. सदर रकमेचा सत्ताधारी अपवेय धरणेचा प्रयत्न करत असुन वरील वाहने या निधीतुन घेण्यात येऊ नये. गाळे भाड्याची रक्कम स्वतंत्र खात्यात ठेवण्यात यावी व या रकमेतुन हुडको कर्ज, जे.डी.सी.सी बँक कर्ज दयावे अशी आमची मागणी असुन म.न.पा.त सत्ताधारी यांनी केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करु नये. वरील ठराव विखंडनासाठी शासनाकडे पाठविण्यात यावा ही विनंती. वरील ठराव शासनाकडे न पाठविल्यास पुढील चार सहा दिवसानंतर मनपा समोर भारतीय जनता पक्षातर्फे व भारतीय जनता पक्षाचे नगरसेवकांचे उपोषण करण्यात येईल. याची प्रशासनाने नोंद घ्यावी. कळावे. प्रत माहितीसाठी मुख्यमंत्री, महाराष्ट्र, पालकमंत्री, श्री.चंद्रकांतदादा पाटील, मा.आ.श्री.एकनाथराव खडसे,मा.आ.श्री.राजुमामा भोळे, श्री.गिरीषभाऊ महाजन, या पध्दतीने तत्कालीन नगरसेवक यांनी शाहनिशा प्रस्ताव दिला. या प्रस्तावाच्या अनुषंगाने जर बघीतलं तर तत्कालीन प्रभारी आयुक्त तथा जिल्हाधिकारी, श्री.किशोरराजे निंबाळकर यांचेकडे प्रभारी पदभार होता. एखादे वेळी सत्तधारींनी घेतलेला निर्णय तो योग्य आहे की अयोग्य आहे हे सर्व तपासुन पाहण्याची जबाबदारी सर्वतोपरी ते आयुक्त म्हणुन आपलीच आहे. तरी सुध्दा शासन त्यांच्या पक्षाचे हाते. आणि जिल्हाधिकारी यांनी त्याची दखल घेतली. आणि दखल घेऊन प्रशासनाला पत्र व्यवहार केला. आणि राज्य शासनाच्या पत्र व्यवहारामध्ये साधारणता ३-४ महिन्यांचा कालावधी वाया गेला. शासनाने परत मा.आयुक्त यांना पत्र पाठविलं. जळगांव शहर महानगरपालिका महासभा ठराव क्र.८६०,८६१ व ८६२ आपले पत्र प्रमाणे मिळाले, सदर पत्रान्वये ठराव क्र.८६०,८६१,८६२ बाबत अहवाल सादर करण्यात आलेला आहे. त्यानुसार अग्निशमन, अतिक्रमण व इतर विभाग सुविधा पुरविणे कामी सदर विभागांना वाहनांची आवश्यकता आहे. सदर वाहने खरेदी करणेस मान्यता देण्यात येत असुन ही प्रक्रियेचा विलंब करु नये. हा एक माणसीकतेचा प्रश्न असतो. खरे अर्थाने बघितले तर श्री.किशोरराजे निंबाळकर साहेब हे वरीष्ठ अधिकारी असलेवर ही अश्या पध्दतीने कुठेतरी राजकीय दबाव वापरुन त्यांना शासनाचा खुलासा मागविणे ही बाब सुध्दा सदविवेक बुध्दीस धरुन नाही. एखादा ठराव आपण केल्यानंतर अप्पा साहेब तर त्या ठरावाची योग्य अंमलबजावणी करणे सर्व जबाबदारी प्रशासनाची आहे. आपण केलेला ठराव संपुर्णत: नियमामध्ये होता. वाहने जी खरेदी करायची होती ती महानगरपालिकेचे सेवेचे अनुषंगानेच खरेदी करायची होती. साधारणता १ वर्षा पुर्वी खरेदी केलेले चेसीस आज बघा त्याच्या इंजनची परिस्थिती काय असेल त्या गाडीच्या टायरांची परिस्थिती काय असेल. उद्या जर अजुन विलंब झाला याला तर Registeration करण्याच्या संदर्भात सुध्दा अडचणी निर्माण होतील. जो काही निर्णय घ्यायचा आहे तो महानगरपलिकेच्या हिताच्या अनुषंगाने घेणे तातडीचे आहे गरजेचे आहे. पुढे जर आचार संहिता लागली पुन्हा विलंब झाला तर ही अत्यावश्यक सेवा जी आहे त्याच्या पासुन ही महानगरपालिका वंचित राहील. तर जो निर्णय घ्यायचा आहे आता घेऊन घ्यावा.

**श्री.धिरज सोनवणे :-** नितीन भाऊंनी जी भुमिका मांडली, हिताच्या हिशोबाने तातडीने घ्यायला हवं, भाऊ मला एक सांगा, रु.३२,०९,३२०/- ही रक्कम कोणी दिली ह्या गोष्टी आपण बघायचे नाही का ? जर २० लाखाचा खर्च ३२ लाख होत आहे. म्हणजे १०-११ लाख त्यात वाढ होत आहे.

**श्री.नितीन लढढा :-** ही चुकी नक्की या विभागाचे अभियंता श्री.सुनिल भोळे निश्चितपणे ती त्यांची चुक आहे. एखाद्या विषयाला जर सभागृहाने एखाद्या Specification ला मान्यता दिली तर महासभेची कुठलीही पुर्व परवानगी न घेता. त्याच्या Specification मध्ये बदल करायचा आणि तश्या पध्दतीची निविदा प्रक्रिया राबवायची आणि आलेल्या खर्चाला रु.३२ लाख ची मान्यता दिली असे दाखवायचे हे अत्यंत चुकीचा प्रकार आहे. मा.आयुक्त साहेब याची सखोल चौकशी करुन जो कोणी याच्यात दोषी असेल त्या बद्दल कायदेशीर भुमिका त्यांनी घ्यायची आहे. परंतु माझे म्हणणे काय आहे ? नव्याने निविदा प्रक्रिया करुन जे जे Specification आपल्याला अपेक्षित असतील Specification प्रमाणे प्रक्रिया राबविली पाहिजे. ही माझी भुमिका आहे.

**मा.आयुक्त :-** या संदर्भात ज्या अधिकाऱ्यानी Specification मध्ये बदल केले त्यांची चौकशी प्रस्तावीत करण्यात येत आहे. दुसरा मुद्दा जे Specification आलेले आहे. ती निविदा आपल्याला मान्य करता येणार नाही म्हणुन ती रद्द करण्यात यावी आणि परत ही निविदा प्रसिध्द करावी.

**श्री.धिरज सोनवणे :-** आयुक्त साहेबांनी ज्या सुचना दिल्या त्याप्रमाणे हा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १९९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रशासनाचा उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात येत असून सदर कामी ज्या जबाबदार अधिकारी यांनी परस्पर Technical Specification मध्ये बदल करुन प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यांची प्रशासनाने चौकशी करुन त्याचेवर कारवाई करावी तसेच सदर कामी मागविलेली ई-निविदा रद्द करुन नव्याने निविदा प्रक्रिया करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सोनवणे धिरज मुरलीधर**

**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:-४)** जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना(जुनी हद्द) मौजे जळगांव शिवार स.नं.४९/३/१ या जमिनीतुन २४.०० व १८.०० मी रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत जमिनीचे भुसंपादनाबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावाचे वाचन केले.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २०० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराच्या मंजुर विकास योजनेतील (वाढीव हद्द) ) मौजे जळगांव शिवार स.नं.४९/३/१ या जमिनीतुन २४.०० व १८.०० मी रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत जमिनीचे संपादनासंबंधी म.प्रा. व न.र.अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक १) श्री.नितीन सुधाकर पाटील २) श्री.रविंद्र रामा महाजन ३) सौ.संगिता यशवंत बारी यांनी नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे मात्र महानगरपालिकेची आर्थिक स्थितीचा विचार करता जमिन मालक १) श्री.नितीन सुधाकर पाटील २) श्री.रविंद्र रामा महाजन ३) सौ.संगिता यशवंत बारी यांना उक्त बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बघता आर्थिक मोबदला देण्याऐवजी टि.डि.आर. देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्रं:-५)** अर्जदार श्री.विठ्ठल दौलत पाटील जिल्हाध्यक्ष, अपंग साधना संघ संचलीत बृहन्महाराष्ट्र अपंगविकास संघटना, जळगांव यांच्या मार्फत प्राप्त दिव्यांग अर्जदार यांना पिंप्राळा हुडको येथील घरकुल देणेबाबत धोरण ठरविणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावाचे वाचन केले.

**श्री.नितीन लढढा :-** मा.महापौरताई, हे घरं आपल्या अंधअपंगांना द्यायची आहे.परंतु याच पध्दतीने आपली आवास योजना पुर्ण झालेली आहे.४७२ घरकुलांची योजना आणि त्या योजनेत ४७२ पैकी ३२८ घरकुले तयार आहे. ३२८ घरकुले तयार झाल्यानंतर आपण साधारणता दिड वर्षापुर्वी २५२ घरकुलांचे वाटप रितसर करण्यात आलेली होती. उर्वरीत साधारणता जे घरकुले बाकी आहे त्यापैकी ७६ घरकुलं आज जवळपास ९ महिन्यापासुन पुर्ण अवस्थेत तेथे तयार आहे. प्रत्येकाला आपल्या हक्काचे घर मिळावे अशी पंतप्रधानांची संकल्पना आहे. आणि या संकल्पनेसाठी मा.पंतप्रधान स्वत: लोकसभेच्या निवडणुकेच्या पुर्वी शिर्डीला पंतप्रधान घरकुलांचा वाटप करण्यासाठी आलेले होते. म्हणजे देशाचे पंतप्रधान इतक्या व्यस्त

त्यांचा कार्यक्रम आणि इतके व्यस्त कार्यक्रमातुन हक्काचे घरकुल कोणाला मिळावे यासाठी ते तिथे आलेले होते. आणि त्यांनी घरकुल धारकांना चाब्या दिल्या परंतु आठ महिन्यापासुन ही घरकुलं पुर्ण अवस्थेत आहे. आणि त्याची जर तुम्ही परिस्थिती बघाल तर मी हे फोटोग्राफ्स आणलेले आहे. अत्यंत चांगल्या प्रकारे बांधलेले घरकुलांमधुन चोरट्यांनी लाईट चोरुन नेले आहे. कोणी दरवाजे काढुन नेले आहे. काही खिडक्यांचे काच फुटलेले आहे. काही घरकुलांचे पुढची जागा अतिक्रमण धारकांनी जागा बळकवुन काल पर्यंत अतिक्रमण वाढविण्याचे काम सुरु आहे. शेवटचे म्हणुन सांगतो मेहरुण घरकुलांची जमीनीचा भुसंपादनाचा मोबदला जो दोन वर्षापुर्वी वाढीव मोबदला म्हणुन ४ कोटी रुपये देण्यात आलेले आहे. त्या ठिकाणी जमिन मालकांकडुन खाजगी वापर आज ही सुरु आहे. त्या ठिकाणी त्यांचा व्यवसाय सुरु आहे. परंतु प्रशासन या विषयावर डोळे झाक का करत आहे. माहित नाही. कुठेतरी या सर्व विषयांची गांर्भियाने नोंद घ्यायला पाहिजे. या घरकुला मधील ८२ घरकुल धारकांनी आपल्या डि.पी. रोड वर आपला वास्तव्य उभ केलं होतं. फेडरेशन कडुन विस्तापीत केलं आणि फेडरेशन रस्त्याची जागा खाली करुन आपण त्यांना मोकळया जागेवर परवानगी दिलेली होती. परंतु तेथे शौचालयाची कुठलीही व्यवस्था नव्हती. जेव्हा हगणदारी मुक्त स्वच्छ भारताची टिम व्हिजीट करणार होती आणि या ठिकाणी त्या लोकांना शौचालयासाठी बसायला कुठेही पर्यायी जागा नव्हती. तर प्रशासनाने त्यांना विनंती केली की तुम्ही उघडयावर शौच बसल्यानंतर जळगांव रॅनकींग मध्ये कमी पडेल आणि त्यांना विनंती करुन पुन्हा विस्तापीत केलं. ते ८२ घरकुल धारक महानगरपालिकेच्या विनंतीचा मान ठेवुन तेथुन सुध्दा विस्तापीत झाले आज ते घरकुल धारक भाडयाचे घरे घेऊन रु.५००,१०००, २००० भाडे भरत आहे. आणि घरकुल तयार असुन सुध्दा आपण त्यांना देऊ शकत नाही ही अत्यंत खेदाची बाब आहे. ते ८२ घरकुल धारकांमधुन जी ७६ घरकुले आहे ते लकीड्रा सिस्टीम ने ती घरकुले तातडीने देण्यात यावी ही माझी महापौरताई आपणास विनंती आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.२०१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, अर्जदार श्री. विठ्ठल दौलत पाटील जिल्हाध्यक्ष , अपंग साधना संघ संचलीत बृहन्महाराष्ट्र अपंगविकास संघटना जळगांव यांचा घरकुल मिळणे बाबतचा दिनांक 22/07/2019 चा अर्ज व त्या सोबतची कागदपत्रे सा.बा./आक्र. /1199 दि. 23/07/2019 अन्वये प्राप्त झाला आहे.

अर्जदारासह एकुण 15 प्रज्ञाचक्षु यांनी मनपाच्या प्रागंणत घरकुल मिळणे कामी केलेल्या उपोषणास अनुसरुन त्यांना मनपा घरकुल योजने अंतर्गत प्राधान्याने घरकुल देणेस महासभा ठराव क्र. 129 दि. 05/03/2019 पारित करण्यात आलेला आहे. त्यानंतर मा.महापौर यांच्या दालनात अर्जदार व त्यांचे प्रतिनिधी तसेच आयुक्त, उपायुक्त व शहर अभियंता व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत मनपा मालकीच्या पिंप्राळा घरकुल योजनेतील रिक्त असलेल्या व कोणत्याही लाभार्थीस अलॉट न केलेल्या घरकुलांचा ताबा अतिक्रमण विभागाने घेवुन ती घरकुले उपोषणार्थी 15 प्रज्ञाचक्षु यांना अलॉट करण्यात बाबत धोरण निश्चित करण्यात आले होते. त्या नुसार अतिक्रमण विभागाने पोलीस विभागाची मदत घेवुन पिंप्राळा हुडको येथील 36 घरकुलांचा ताबा घेतलेला आहे.

सदरच्या घरकुलांपैकी 15 घरकुले उपोषणार्थी 15 प्रज्ञाचक्षु यांना देण्या कामी त्यांना रितसर अर्ज व त्या सोबत (1) अंधत्वा बाबत प्रमाणपत्र (2) अर्जदाराचे व त्यांच्या परिवारातील सर्व सदस्याचे आधारकाडे (3) रेशन कार्ड व मतदान कार्ड (4) जळगांव मनपा क्षेत्रामध्ये रहिवास करीत असल्या बाबतचा रहिवास दाखला किंवा मतदार यादित नांव असल्या बाबत सत्य प्रत (5) पति व पत्नीचा पासपोट साईज फोटो ( प्रत्येकी एक एक ) (6) शासनाच्या इतर कोणत्याही योजनेतुन घरकुलाचा लाभ घेतलेला नसल्या बाबत प्रतिज्ञापत्र असे दत्ताऐवज मागवण्यात आलेले होते. त्या नुसार एकुण 17 दिव्यांगाचे अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह प्राप्त झाले आहे.

तरी ताब्यात घेण्यात आलेल्या घरकुलांचे पात्र प्रज्ञाचक्षुंना ताबा देण्या कामी मनपाचे खालील प्रमाणे धोरण निश्चित करणेत येत आहे.

१) महासभा ठराव क्र. 129 दि. 05/03/2019 नुसार 15 प्रज्ञाचक्षुं ऐवजी अर्ज प्राप्त १७ प्रज्ञाचक्षुं घरकुलाचा लाभ देण्यात यावा.

२) ज्या घरकुलांचा ताबा देणे आहे ती घरकुले मनपाने दुरुस्ती करुन त्याचा ताबा लाभार्थ्यांना द्यावा. घरकुल दुरुस्त करणेस येणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करणेत येत आहे.

३) ताबा देतांना अटी शर्ती बाबत करारनामा करणे कामी अटी शर्ती निश्चित करणेचा अधिकार शहर अभियंता यांना देण्यात येत आहे. त्यांनी अटीशर्ती निश्चित करुन करारनामा करुन घ्यावा.

४) लाभार्थ्यांकडुन दर महा भाडे घेण्या कामी भाड्याची रक्कम निश्चित करणे .

५) या पूर्वी वाटप केलेल्या घरकुलाच्या दरानुसार भाडे आकारणी करावी.

उपरोक्त नमुद केल्या नुसार अर्जदार यांना कागदपत्राची पुर्तता करणे कामी पत्र देण्यास तसेच वर नमुद क्र. 1 ते 5 बाबत आवश्यक ती कार्यवाही होऊन दिव्यांग अर्जदार यांना पिंप्राळा हुडको येथील घरकुल देणेस तसेच १७ घरकुल दुरुस्तीसाठी येणाऱ्या रक्कम रु.४१.० लक्षच्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्रं:-६)** नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत सन 2019-20 करीता प्रस्तावीत 1 ते 41 कामे करणेस व सदर कामी येणारे एकुण रक्कम रु. 14980901/- मात्रचे खर्चास व सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणेस मान्यता देण्या बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावाचे वाचन केले.

**श्री.नितीन लढढा :-** मला प्रशासनाला विचारायचे आहे की साधारणता १.५ कोटीचे प्रस्ताव दलितोत्तर वस्ती सुधारणा योजनेचे आलेले आहे. यात १ कोटी रुपये खुल्या जागांना चैनलिंक फेंसींग करणे त्याच्या मध्ये पाथवे निर्माण करणे आणि ५० लाख रुपये हे हायमस्ट साठी. या शहरासाठी प्राथमिकता आहे का? प्रथमिकता असतील पण जेव्हा प्राथमिकते मध्ये आपण क्रमवारी लावत असतांना आपण हे विचार करतो. बेसिक निड काय आहे शहराची, पाणी आहे, गटार आहे, रस्ते आहे. पथदिवे आहे आणि ह्या सर्व गोष्टी झाल्यानंतर जर तुमच्या कडे काही surplus point असतील तर याकडे वळण्याची भुमिका असेल तर ती मी मान्य करतो. आज जर जळगांव शहराची परिस्थिती बघितली तर मोठया प्रमाणात जळगांव शहराचा विस्तार झालेला आहे. विस्तारीत भागाची जर परिस्थितीचे अवलोकन कराल आज पक्के रस्ते सोडा WBM चे रस्ते सुध्दा नाही. गटारी नाही, जे विस्तारीत भाग आहे ते अमृत योजना च्या टप्पा क्र.३ किंवा ४ मध्ये येतील.हे प्रस्तावीत करणे सोडुन आपण या गोष्टी प्रस्तावीत करतो हे कितपर्यंत योग्य आहे. याच्याच अनुषंगाने एक शाळा बांधण्याचा विषय सुध्दा आहे. त्याचा ही प्रस्ताव आहे. आज जळगांव शहराच्या म.न.पा.च्या शाळेंची परिस्थिती काय आहे हे तुम्हाला ही माहिती आहे मला ही माहिती आहे आणि सर्व सभागृहाला माहित आहे. जळगांव शहराच्या महानगरपालिकेच्या मालकीच्या शाळांची परिस्थिती अत्यंत दयनिय आहे. त्या परिस्थितीचा विचार करुन म.न.पा.च्या मागील तीन शाळा ज्यात विद्यार्थी संख्या नव्हती वर्षानुवर्ष पासुन बंद पडलेली होती. गैरकृत्य तिथे सुरु व्हायचे. तर अश्या पध्दतीने वर्षानुवर्ष बंद पडत असलेल्या शाळा सेवाभावी संस्थांना देण्याचा विचार केला. एक शाळा आपण रामदास पाटील ट्रस्टला दिली. दुसरी शाळा आपण नंदीणीबाई वामन हायस्कुलला दिली, रितसर त्यांच्याकडुन भाडे आकारणी करुन घेतली. तिसरी शाळा आपण जैन उद्योग समुहाला दिली. अश्या पध्दती आपण आपल्या स्वत:च्या मिळकती भाडे तत्वावर देत आहे आणि २ कोटी ४० लक्ष रुपयांची शाळेची उभारणी तेथे करायची, तेथे क्लब हॉलची उभारणी करावी. या प्रस्तावावरुन असे दिसते की जळगांवच्या सगळे बेसीक निडस जे आहे या पुर्णत्वास गेलेल्या आहे. आणि तसे असेल तर तसे सर्टीफिकेट issue करुन द्यावे शहर अभियंत्यांनी, जळगांव शहरात आता रस्त्यासाठी Scope नाही, गटारीसाठी Scope नाही, पथदिव्यांसाठी Scope नाही. आणि त्यासाठी पडलेल्या निधीचा विनयोग कशासाठी करावा तर आम्ही या ओपन स्पेस Develop करण्याच्या संदर्भात विनियोग करत आहे. आपण म्हणतो की महानगरपालिका कर्जमुक्त झालेली आहे. साहेब तरी आपल्याला ३.५ वर्ष ओझे वहायचे आहे. दर महिन्याला आपल्याला ३ कोटी प्रमाणे राज्यशासनाला ११५-११७ कोटी रुपये जे काही प्रस्ताव मान्य होईल त्या अनुषंगाने पैसा द्यायचा आहे. आज आपल्या हातात Liquidity नाही. या शासनाच्या योजनेमधुन आलेल्या निधी वरती या महानगरपालिकेचा कार्यभार अजुन ३ - ३.५ वर्ष चालवावा लागेल. अश्या परिस्थती मध्ये निधीचे योग्य नियोजन न करता प्रशासनाने असे प्रस्ताव देणे संयुक्तीक नाही. याच्यावर प्रशासनाने कुठेतरी विचार करावा. निधीचा योग्य नियोजन व्हावे. १.५ - २ कोटीचे हायमॉस्टचे प्रस्ताव आहे. आपल्याकडुन एल.ई.डी. Maintain होत नाही. खांब उभे आहे परंतु त्याच्यावर लाईट नाही. अश्या परिस्थिती मध्ये केंद्र शासनाचे धोरण आहे सौरउर्जा कडे जावे की विजेची बचत होईल.आणि देशाच्या विजेची उन्नतीमध्ये आपला देशाला हातभार लागेल. अश्या परिस्थिती मध्ये एल.ई.डी.चा निर्णय आपण घेऊ शकत नाही. आणि अश्या परिस्थिती मध्ये ठिकठिकाणी हायमॅस्ट उभे करणे. महानगरपालिकेच्या आर्थिक दृष्टीलाही योग्य नाही. भविष्यातल्या उर्जा प्रगतीच्या धोरणाला ही अनुसरुन नाही. आम्ही जेव्हा सत्तेत होतो तेव्हा आम्ही ही भुमिका स्विकारली होती. ह्या पध्दतीला कुठेतरी बंद केलं होत. ठराव केला होता

या पध्दतीचा. जिथे मोठा चौक आहे आणि ज्या ठिकाणी खुपच रहदारी आहे. आणि तिथे आवश्यकता आहे. निश्चितपणे तिथला निर्णय घेतला तर त्याबद्दल वाद नाही. परंतु तुम्ही बोलता मला मिळाले तुम्हाला का नाही. सुनिल भाऊ म्हणता मला का नाही. असा जर करत गेले तर महानगरपालिकेला आर्थिक भुर्दंड पडेल, उर्जा बचतीचे धोरणही विस्कळीत होईल या प्रमाणे प्रशासनाने विचार करावा हीच माझी विनंती आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीन भाऊ, Personally घेत आहे का तुम्ही,

**श्री.नितीन लढढा :-** Personal ची गोष्ट नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** आता अमृतचे काम चालु आहे रस्त्यांचे काम कसे येतील, भुयारी गटारींचे काम चालु आहे गटारींचे काम कसे येतील आणि ही जी कामांची यादी आहे ही नगरपालिकेच्या कर्तव्यात बसत नाही का ? सांगा मला. आता माझ्या वार्डामध्ये रस्त्यांचे काम घेता येत नाही गटारीचे काम घेता येत नाही. मी तर हसत आहे भोळे साहेबांकडे जाऊन की हे काय प्रकार आहे. जे जीमचे २ कोटी ४० लाख निधी बद्दल तुम्ही बोलेले, तेच टेंडर २००९ मध्ये निघालं होतं. ते तसेचे तसेच टेंडर आहे. ते तेव्हा योग्य होतो आणि आता अयोग्य आहे का ? निघालं होतं की नाही टेंडर सांगा भोळे साहेब.

**श्री.नितीन लढढा :-** भुयारी गटारींच्या अनुषंगाने गटारी घेता येत नाही. प्रभाग क्र.४ अप्पा तुमचा वार्ड आहे ना,

**श्री.कैलास सोनवणे :-** बिल्कुल माझाच वार्ड आहे.

**श्री.नितीन लढढा :-** प्रभाग क्र.४ मध्ये नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत विषय क्र.९ आणि विषय क्र.९ मध्ये क्रमांक ५ आणि ६ मध्ये आपण बघावा, प्रभाग क्र.४ मध्ये आर.एल.शॉप ते हनुमान मंदिर ते पंडीत जमुनाजी त्रिपाठी व्यायाम शाळा पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे खर्च रु.१०,९०,०००/-, प्रभाग क्र.४ जोशीपेठ भागातील भोई गल्ली मध्ये बोळ मध्ये आर.सी.सी.गटार बांधणे रु.४,१०,०००/- आता मला सांगा आपण कार्यादेश देण्याच्या संदर्भात चार दिवसानंतरच्या स्थायी समिती सभे समोर भुयारी गटार बांधण्याच्या प्रस्ताव आहे. भुयारी गटारचा पहिला टप्पा प्रभाग क्र.४ ही येईल आणि प्रभाग क्र.५ ही येईल. साधारणता या कामाची सुरुवात महिना दोन महिन्यामध्ये सुरु होईल. आणि तश्या अवस्थेमध्ये रु.१५ लक्षचे कामे प्रस्तावीत केलेले आहे. हे कितपर्यंत संयुक्तीक आहे. म्हणजे हा पैसा तरतुदी आहे म्हणुन आपल्याला जसा वाटेल तसे विनयोग करावा. ही बाब योग्य नाही. अप्पा जे म्हटले की त्यावेळे त्याचा तसा ठराव झाला आहे. मी त्याला काही व्यक्तीगत घेत नाही. आता अप्पांनीच विषय काढला की आमच्या प्रभागात तसे विषय घेता येत नाही. मान्य आपल्या प्रभागात कामे होत नाही परंतु आपल्या प्रभागात भुयारी गटारचे सुख मिळेल, त्याच वेळीला महाबळ खालचा भाग असेल, निमखेडी खालचा भाग असेल, पिंप्राळा कडचा भाग असेल जेथे साधी गटार सुध्दा नाही, तर हे विनयोग फक्त माझ्या प्रभागातच का ? काही बसत नसेल तर वेगळया पध्दतीने बसवायला पाहिजे. हा आग्रह मला योग्य वाटत नाही. जिथे गरज आहे तिथे द्या. एक भुकेला माणुस अन्नासाठी तरसतो आणि एक पोट भरलेल्या व्यक्ती समोर ताट वाढायचे ? असे जर बघितले तर आपले प्रभाग त्या प्रभागांपेक्षा चांगले आहे कारण आपले प्रभाग शहराच्या मध्यवर्ती भागात आहे, आणि मुलभुत सुविधा आपल्या प्रभागात उपलब्ध आहे. कारण वर्षानुवर्ष काम होत गेलेले आहे. विस्तारीत भागात आमचे नगरसेवक आहे तिथे काम करा, कोणाचे ही काम करा, परंतु जिथे रस्ता नाही, गटारी नाही, पाणी तिथे साचतं, दुर्घीमुळे त्रास आहे. या गोष्टींचा विचार करावा हे माझे मत आहे. मी हे काही म्हणत नाही की तुम्ही हे मत स्विकार करा. परंतु मत मांडण्याचा मला स्वातंत्र्य आहे म्हणुन मी मांडत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** मा.महापौर साहेबा, नितीन भाऊंचा एकदम बारीक बारीक अभ्यास असतो, मी पहिलेच सांगितलं, याला Personally घेऊ नका, प्रभाग क्र.४ माझा वार्ड आहे म्हणजे Personally आला ना विषय, रथ चौकामध्ये वारंवार पाणी साचत होतं. पुनश्च पाणी तेथे येतो, त्या लोकांनी वारंवार आमच्या घरी येऊन आम्हाला सांगितले. ती गटार ओपन केल्यामुळे एक थेंब ही पाणी त्या ठिकाणी थांबत नाही आणि आज सुध्दा ती गटार ओपन आहे तुम्ही तेथे येऊन पाहावे, माझ्या वार्डात काम व्हावे ही नोंद मी का करणार ? वार्ड क्र.४ माझा आहे वार्ड क्र.५ तुमचा आहे. फ्रुट गल्ली मधले अतिक्रमण काढले, प्रकाश मेडीकल कडुन खांबेटे व्यायाम शाळेकडे अतिक्रमण काढले, तिथे ही भुयारी गटारी आहे. पुढची गटार माघे झाली.

**श्री.नितीन लढढा :-** नाही झाली.

**श्री.कैलास सोनवणे :-** झाली, सांगा भोळे साहेब झाली की नाही. डांगे साहेबांनी Priority देऊन केलं की नाही तो विषय,

**श्री.नितीन लढढा :-** नाही झाली,

**श्री.कैलास सोनवणे :-** पण डांगे साहेबांनी Priority देऊन ते काम करायला सांगितले आहे की नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आवश्यकता होती ती,

**श्री.कैलास सोनवणे :-** म्हणजे आमची आवश्यकता नाही.

**श्री. सुनिल भोळे :-** गटार झाली नाही. पण मंजुरी दिलेली आहे, निविदा काढण्यात आलेली आहे.

**श्री.नितीन लढढा :-** अप्पा तो आमचा आग्रह ही नव्हता, ती डांगे साहेबांचीच ती भुमिका होती. प्रभाग क्र.५ टेंडर ही काढु नका.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एक प्रश्न अंडरग्राऊड गटारीचा सतवतो आहे मला. त्याचा खुलासा मी केलं ही. ही वेळ आली म्हणुन त्यांचे उत्तर मला पाहिजे की अंडरग्राऊड गटारी मधुन जे पाणी जाणार आहे त्याचा स्पेसिफीकेशन मला अजुन कळत नाही. कारण मला जी माहिती मिळालेली आहे की जे सेप्टीक टँकचे जे पाणी त्या भुयारी मार्गातुन जाईल की पावसाचे पाणी ते पण त्यातुन जाणार आहे याचा खुलासा सभागृहापुढे झाला पाहिजे.

**श्री.सुनिल भोळे :-** संपुर्ण जळगांव शहराच्या सेप्टीक टँकेचा पाणी जाणार आहे. पावसाचे पाणी जाणार नाही. Storm Water साठी आपल्या रेग्युलर गटारी असणार.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** म्हणजे जे existing गटारी आहे ते आपण रिपेअर करु शकतो.

**मा.आयुक्त :-** ड्रनेज मध्ये म्हणजे सेप्टींक टँक व बाथरुमचा पाणी आणि Storm Water म्हणजेच पाऊसाळी पाणी साठी Separate गटारी आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** भुयारी गटार कुठुन सुरु होणार आहे.

**श्री.सुनिल भोळे :-** पहिला टप्पा गोविंदा रिक्षा स्टॉप ते रिंगरोड ते डि.एस.पी.चौक ते रामेश्वर कॉलनी ते कालंकी माता मंदिरापर्यंत आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** म्हणजेच आर.सी.सी.गटारचे कामे करता येतील.

**मा.आयुक्त :-** कुठल्या वार्डात काय करता येईल हा विषय नाही. घरातले जे पाणी आहे बाथरुमचे आहे प्लस किचनचे आहे. ते सगळ अंडरग्राऊड ड्रेनेजला जाईल. आपला जो मुद्दा आहे ते Storm Water च्या संदर्भात आहे.

**श्री.नितीन लढढा :-** त्यांचे म्हणणं आहे की, ज्या प्रभागामध्ये भुयारी गटार योजना आता मंजुर झालेली आहे आणि त्याच प्रभागामध्ये गटारींची कामे मंजुर करण्यात आलेली आहे. आजच्या प्रस्तावामध्ये तश्याच पध्दतीने आम्हाला सुध्दा आर.सी.सी.गटारी बांधायची आहे तर त्याला परवानगी मिळेल का ? १०० कोटीचे प्रस्ताव पाठविले, त्याच्यापैकी ४८ कोटी मंजुर झाले.

**श्री.कैलास सोनवणे :-** ५० पैकी ४२ कोटी मंजुर झाले ८ कोटी बाकी आहे.

**श्री.नितीन लढढा :-** आता ४२ कोटीचा जो प्रस्ताव राज्य शासनाकडुन मंजुर होऊन आला. त्याची निविदा प्रक्रिया राबविली जाईल. त्या प्रस्तावामध्ये जो पर्यंत अमृतची पाणी पुरवठा योजना आणि अमृतची भुयारी योजना या दोन योजना पुर्ण झाल्याशिवाय रस्त्यांचे कामे हाती घेण्यात येऊ नये असा शासन निर्णय आहे. परंतु त्याच्यापैकी एक काम जे शासनाकडुन मान्य होऊन आलेलं आहे. ते दुध फेडरेशन पासुन ते शिवाजी चौक म्हणजे तुमच्या घरासमोरचा रस्ता आणि बॉम्बे लॉज चौक ते अजिंठा चौफुली ते कालिका माता चौक पर्यंतचा रस्ता प्रस्तावीत केलेला आहे त्याला राज्य शासनाकडुन मंजुरी ही मिळालेली आहे. आता माला सांगा साधारणता संपुर्ण भुयारी गटारचे कामे व्हायला १.५ ते २ वर्षाचा कालावधी जाणार आहे. यातला बराच रस्ता माझ्या प्रभागातुन जातो. या रस्त्याला निविदा प्रक्रिया झालेनंतरही कार्यादेश देता येणार नाही. आज त्या रस्त्याचे जे काही इस्टीमेट असेल २कोटी किंवा ४ कोटी, साधारणता तो निधी खर्चीत पडुन राहील.आता हे निधी ज्या भागात भुयारी गटारी प्रस्तावीत नाही. जिथे अमृतचा पाणीपुरवठेचा काम पुर्ण झालेले आहे. जिथल्या ट्रायल्स झालेली आहे. तिथे प्रस्तावीत केलं असतं तर त्या भागातील नागरीकांना त्याचा दिलासा मिळाला असता. आज आमच्या प्रभागातला जरी रस्ता असला तरी तो रस्ता आज सुस्थितीत आहे. परंतु भुयारी गटार योजनेमुळे हा सर्व

रस्ता खराब होईल खोदला जाईल. त्याला साधारणता १.५ ते २ वर्षाचा कालावधी लागेल वाट पाहावी लागेल. परंतु ही निधीचे रस्ते वेगवेगळया प्रभागात प्रस्तावीत केले असते तर सामान्य नागरीकांना दिलासा मिळाला असता. तर ही जी गोष्टी आहे याचा गांभिर्यपणे विचार व्हायला पाहिजे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भोळे साहेब मला सांगा, ८ दिवसापुर्वी पेपरात होतं की उड्डान पुलाची परत डिझाईन चेंज करुन मुंबईला पाठविलेली आहे. डिझाईन चेंज का झाली त्याची माहिती द्या. आणि नवीन डिझाईन काय ?

**श्री.सुनिल भोळे :-** महापौरताई असा कुठलाही प्रस्ताव आपल्याकडे आलेला नाही. बी ॲण्ड सी.कडुन माहिती मिळेल.

**श्री.सुनिल महाजन :-** भोळे साहेब मी तुम्हाला सांगतो, आम्हाला सर्व सभागृहाला फक्त सह्या करण्याचा अधिकार राहीलेला आहे. सर्व काम तर पी.डबल्यु.डी. करत आहे. यांना काय माहिती राहील की काय डिझाईन चेंज झाली.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** शाळा क्र.१ मराठी शाळाकडे पुल फेडरेशन रोड कडुन येणार आहे आता मला सांगा पुल कुठे जाणार आहे. आठ दिवस झाले पेपराला आलेले आहे. आपल्याला काहीच माहित नाही. आपण फक्त सह्या करायचे आणि एन.ओ.सी. द्यायची.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्हाला येथे उत्तर कोण देणार आहे. तुम्ही बी ॲण्ड सी.तुन तपास करा.

**श्री.भगत बालाणी :-** भोळे साहेब सर्व माहिती बी ॲण्ड सी कडुन घेऊन पुढच्या मिटींगला सादर करा.

**श्री.सुनिल महाजन :-** अश्विन भाऊ प्रत्येक गोष्ट आपण बी ॲण्ड सी ला देत आहोत. सक्षम आयुक्त आहे सक्षम अधिकारी आहे तर का करत आहोत असे आपण. महानगरपालिका कामे करायला सक्षम नाही का?

**मा.उपमहापौर :-** आहे महानगरपालिका सक्षम.

**श्री.सुनिल महाजन :-** भोळे साहेब, ४२ कोटीच्या प्रस्तावांचा Status काय आहे?

**श्री.सुनिल भोळे :-** मी कालच कार्यकारी अभियंतांशी बोललो, ते म्हणले की स्क्रुटनी चालु आहे साईट व्हिजीट चालु आहे. ते झाल्यानंतर निविदा निघेल.

**श्री.कैलास सोनवणे :-** निधी शासनाने दिलेला आहे, बी ॲण्ड सी शासनाचाच आहे, महानगरपालिका शासनाची आहे आता त्यांनी कोणाकडुन काम करायचे हे त्यांचे अधिकार आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.२०२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत अनुषंगाने सन 2019-20 या आर्थीक वर्षाकरीता रक्कम रुपये 1.50 कोटी अनुदान महानगरपालिका जळगांव करीता तरतुद करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी जळगांव यांच्या कडील पत्र क्र.नपा/1/सुजयो/52/2019 दि.15/07/2019 अन्वये सन 2019-20 या आर्थीक वर्षाकरीता तरतुद करण्यात आली असल्याचे सुचित केलेले आहे. त्यानुसार खालील कामे प्रस्तावीत करण्यात आली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| 1 | प्र.क्र.01 लाकुड पेठ , शंकर सी मिल जवळ , हनुमान सॉमील जवळ, अंबिका सोसा, खुबचंद सागरमल विद्यालय क्षत्रिय समाज सोमनाथ किराणा जवळ, येल्लमा माता मंदिर, तिवारी दाल मिल येथे हायमस्ट लॅम्प बसविणे. | 393841/- |
| 2 | प्र.क्र.01 हायमस्ट लॅम्प बसविणे (2 नंग ) | 112524/- |
| 3 | प्र.क्र.04 मध्ये हायमस्ट लॅम्प बसविणे | 1969205/- |
| 4 | प्रभाग क्र.06 स्वातंत्र्य चौक मोहित कॉर्नर चौकात हायमस्ट लॅम्प बसविणे. | 56263/- |
| 5 | प्र.क्र.6 न.भु.क्र.8641 दत्त कॉलनी येथिल खुल्या जागेत व गणेश नगर येथिल खुल्या जागेत हायमस्ट लॅम्प बसविणे. | 112524/- |
| 6 | प्र.क्र.7 रेल्वे कॉलनी ग.क्र.286/2 खुल्या जागेस वॉल कंपाऊंड, प्लाटर तसेच विहीरीवर जाळी बसविणे व कलरकाम करणे. | 725000/- |

| | | |
|---|---|---|
| 7 | प्र.क्र.7 जिवन विकास कॉलनी खुल्या जागेस चेनलिंक फेन्सींग, ट्रॅक करणे | 750000/- |
| 8 | प्र.क्र.7 रेल्वे कॉलनी ग.क्र.286/2 खुल्या जागेत हायमस्ट लॅम्प बसविणे. | 56263/- |
| 9 | प्र.क्र.7 ग.क्र.283/2/अ नंदनवन कॉलनी खुल्या जागेत हायमस्ट लॅम्प बसविणे. | 56263/- |
| 10 | प्र.क्र. 8 ग.क्र.74 खुल्या जागेस कंपाऊंड वॉल करणे. | 465702/- |
| 11 | प्र.क्र.8 ग.नं.99/3 निमखेडी शिवार हितवर्धनी सोसायटी जवळील खुल्या जागेस कंपाऊंड वॉल व पेव्हर ब्लॉक बसविणे. | 785378/- |
| 12 | प्र.क्र.8 क चंदुअण्णा नगर चौकात हायमस्ट लॅम्प बसविणे. | 56263/- |
| 13 | प्र.क्र.8 निमखेडी शिवार ग.क्र.74 येथे हायमस्ट लॅम्प बसविणे. | 56263/- |
| 14 | प्र.क्र.8 खोटे नगर शिवार येथे हायमस्ट लॅम्प बसविणे. | 56263/- |
| 15 | प्र.क्र.8 पवार पार्क येथे हायमस्ट लॅम्प बसविणे. | 56263/- |
| 16 | प्र.क्र.8 निमखेडी गांवातील चौक मध्ये हायमस्ट लॅम्प बसविणे. | 56263/- |
| 17 | प्र.क्र. 8 निमखेडी शिवार हायवे आहूजा नगर स्टॉप हायमस्ट लॅम्प बसविणे. | 56263/- |
| 18 | प्र.क्र. 8 निमखेडी शिवार हायवे दादावाडी स्टॉप येथे हायमस्ट लॅम्प बसविणे. | 56263/- |
| 19 | प्र.क्र. 8 निमखेडी शिवार कल्याणी नगर जुना हायवे येथे हायमस्ट लॅम्प बसविणे. | 56263/- |
| 20 | प्र.क्र.8 निमखेडी शिवार गट क्र. 27 खुल्या जागेत हायमस्ट लॅम्प बसविणे. | 56263/- |
| 21 | प्र.क्र.08 निमखेडी शिवार गट.क्र. 107 मधील ओपनस्पेस जवळ हायमस्ट लॅम्प बसविणे. | 56263/- |
| 22 | प्रभाग क्र.10 पिंप्राळा गट क्र. 292/2 ओमकार पार्क मध्ये हायमस्ट लॅम्प बसविणे. | 56263/- |
| 23 | प्र.क्र.10 पिंप्राळा सिध्दीविनायक कॉलनी निष्ठा क्लासेस समोर हायमस्ट लॅम्प बसविणे. | 56263/- |
| 24 | प्र.क्र.10 ओंकार पार्क सावखेडा रोड येथे हायमस्ट लॅम्प बसविणे. | 56263/- |
| 25 | प्रभाग क्र.11 अर्जुन / मुकूंद नगर उताराजवळील ॲड.श्री.जाधव यांच्या बंगल्याजवळील 100 फुटी रोड उतार रस्त्यावरील नाल्यावर असलेल्या पुलाजवळ हायमस्ट लॅम्प बसविणे. | 56263/- |
| 26 | प्र.क्र.12 श्रध्दा कॉलनी श्री पंचवटी महादेव मंदीर येथे हायमस्ट लॅम्प बसविणे. | 56263/- |
| 27 | प्रभाग क्र.13 स्टेट बॅंक कॉलनी मेहरुण गट नं.563 पवन हिल्स खुली जागा विकसित करणे. | 1485000/- |
| 28 | प्रभाग क्र.14 मस्जीद ए इब्राहीम जवळ, राम नगर, डी-मार्ट समोर शिरसोली नाका जवळ हायमस्ट लॅम्प बसविणे. | 56263/- |
| 29 | प्रभाग क्र.14 तांबापुरा बजरंग चौक दक्षिणमुखी हनुमान मंदिरासमोर हायमस्ट लॅम्प बसविणे. | 56263/- |
| 30 | प्रभाग क्र.14 तांबापुरा बिस्मील्ला पोलिस चौकी व जुम्मा शाह वखर जवळ प्रत्येकी 1 नग हायमस्ट लॅम्प बसविणे. | 112524/- |
| 31 | प्र.क्र.15 मधील पिरजादे कब्रस्थान मध्ये हायमस्ट लॅम्प बसविणे. | 225052/- |
| 32 | प्रभाग क्र.16 सम्राट कॉलनी छापखान्याजवळील चौकात हायमस्ट लॅम्प बसविणे. | 56263/- |
| 33 | प्रभाग क्र.16 खुबा नगर मधील विठ्ठल रुख्माई मंदीर, रामदेवबाबा मंदीर, येथे हायमस्ट लॅम्प बसविणे. | 281315/- |
| 34 | प्र.क्र.17 अयोध्या नगर विठ्ठल मंदीर जवळील ओपन स्पेस विकसित करणे (25 लक्ष) | 2500000/- |
| 35 | प्रभाग क्र.17 जळगांव शिवार ग.क्र.121/ब मनपा खुली जागेस वॉल कंपाऊंड करणे. | 1400000/- |
| 36 | प्रभाग क्र.17 श्रीराम नगर ग.क्र.141/3 खुल्या जागेत ओप जिम तयार करणे. | 700000/- |
| 37 | प्र.क्र.17 सदगुरु नगर स.नं. 39/1 व अपना घर कॉलनी स.क्र. 38/3 मध्ये ओपनस्पेस | 112524/- |

| | | |
|---|---|---|
| | मध्ये ठिकाणी हायमस्ट लॅम्प बसविणे. | |
| 38 | प्र.क्र.17 आयोध्या नगर श्रीराम गार्डन स.नं. 141/3 चौकात हायमस्ट लॅम्प बसविणे. | 56263/- |
| 39 | प्र.क्र.17 आयोध्या नगर स्वामी समर्थ मंदिर चौकात हायमस्ट लॅम्प बसविणे. | 56263/- |
| 40 | प्र.क्र.19 मधील मेहरुण शिवार 184/2 सुप्रिम कॉलनी येथील मनपा मालकीच्या खुल्या जागेत वॉल कंपाऊड बांधणे | 1500000/- |
| 41 | प्र.क्र. 19 सुप्रिम कॉलनी ग.नं.162/1 खुल्या भुखंडात हायमस्ट लॅम्प बसविणे. | 56263/- |
| | **एकुण रक्कम रु. :-** | **14980901/-** |

वर नमुद 1 ते 41 कामांना मान्यता प्रदान करण्यात येत असुन सदर कामांचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस प्रशासकीय मान्यतेकरीता सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- बालाणी भगतराम रावलमल**

**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:७)** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत सन 2019-20 करीता प्रस्तावीत 1 ते 22 कामे करणेस व सदर कामी येणारे एकुण रक्कम रु.19569701/-मात्रचे खर्चास व सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणेस मान्यता देण्या बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावाचे वाचन केले.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.२०३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत अनुषंगाने सन 2019-20 या आर्थीक वर्षाकरीता रक्कम रुपये 1.50 कोटी अनुदान महानगरपालिका जळगांव करीता तरतुद करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी जळगांव यांच्या कडील पत्र क्र.नपा/1/सुजयो /52/2019 दि.15/07/2019 अन्वये सन 2019-20 या आर्थीक वर्षाकरीता तरतुद करण्यात आली असल्याचे सुचित केलेले आहे. त्यानुसार खालील कामे प्रस्तावीत करण्यात आली आहेत.

| **अ.क्र.** | **कामाचे नांव** | **अंदाजित रक्कम** |
|---|---|---|
| 1 | प्र.क्र.01 मध्ये ठिक ठिकाणी रोड क्रॉसिंग स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | 675097/- |
| 2 | प्र.क्र. 2 स्मशान भुमी जवळ नविन मुत्री बांधणे | 320029/- |
| 3 | प्रभाग क्र.5 रेल्वे स्टेशन जवळील स्मारक येथे घुमट व रेलींग बसविणे | 1100000/- |
| 4 | प्र.क्र.6 मेहरुण न.र.यो.क्र.2 अंतिम भुखंड क्र.487 आरक्षित जागेस कुंपन भिंत बांधणे | 585000/- |
| 5 | प्र.क्र.6 मेहरुण शिवार न.र.यो.क्र.2 अंतिम भुखंड क्र.558 गणेशवाडी खुल्या जागेत ओप जिम साहित्य पुरविणे | 500000/- |
| 6 | प्र.क्र. 7 शिक्षकवाडी येथे खुल्या जागेत ओपन जिम साहित्य पुरविणे | 500000/- |
| 7 | प्र.क्र.8 निमखेडी शिवार ग.क्र.107 मधील ओपन स्पेसला कंपाऊड वॉल, मुलांसाठी खेळणी, जेष्ठ नागरीकांसाठी बाक व हायमस्ट लॅम्प बसविणे. | 513234/- |
| 8 | प्र.क्र.8 ग.क्र.74 विठ्ठल पार्क,मुक्ताई नगर ओपन स्पेसमध्ये चेनलिंक फेन्सींग व खेळणी बसविणे. | 465702/- |
| 9 | प्र.क्र.8 निमखेडी शिवार ग.क्र. 86/1 खुल्या जागेस चेनलिंक फेन्सींग करणे. | 507545/- |
| 10 | प्र.क्र.8 पिंप्राळा रोड द्रोपदी नगर पेट्रोल पंपाच्या बाजुच्या गल्लीत आरसीसी गटार बांधणे. | 683185/- |

| | | |
|---|---|---|
| 11 | प्र.क्र.9 ग.क्र.34 प्लॉ.नं.34 बेंडाळे नगर (मुक्ताई नगर) येथे ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे | 505439/- |
| 12 | प्र.क्र.11 पिंप्राळा ग.नं.62,63,64 विद्युत कॉलनी परिसरात आरसीसी गटार बांधुन स्लॅब कल्व्हट बांधणे. | 1000000/- |
| 13 | प्र.क्र.11 पिंप्राळा शिवार गट क्र. 140/2, 140/1क, 129,130 महाविर किराणा परिसरात नविन आरसीसी गटार व स्लॅब कल्व्हट बांधणे. | 1000000/- |
| 14 | प्र.क्र.12 प्रभात कॉलनी परिसरात आरसीसी गटार व स्लॅब कल्व्हट बांधणे | 500000/- |
| 15 | प्रभाग क्र.12 श्रध्दा कॉलनी परिसरात आर.सी.सी.गटार बांधणे | 600000/- |
| 16 | प्र.क्र.12 धांडे नगर मेहरुण स.नं.561/1ब व 2क+2ड उताराचा रस्ता कॉंक्रीटचा करणे | 1264470/- |
| 17 | प्रभाग क्र.13 लांडोरखोरी समोरील ओपन स्पेसला विकसित करणे | 500000/- |
| 18 | प्र.क्र.14 गणपती नगर जुने मंदीर मागील खुल्या जागेत वॉल कंपाऊड, जॉगींग ट्रॅक करणे. | 1000000/- |
| 19 | प्र.क्र.14 मेहरुण स.क्र.422/ब मधील कब्रस्तान मध्ये भराव टाकून पाथवे तयार करणे. | 2500000/- |
| 20 | प्र.क्र.15 मेहरुण रिक्षा स्टॉप पासुन ते स.क्र. 258 भागापर्यतच्या नाल्यास पुर्व बाजुस संरक्षण भिंत बांधणे | 2500000/- |
| 21 | प्र.क्र.15 सदोबा वेअर हाऊसच्या मागे आरसीसी स्लॅब कल्व्हट बांधणे. | 350000/- |
| 22 | प्रभाग क्र.19 सुप्रिम कॉलनी गट नं.162/1 खुल्या भुखंडास कंपाऊंडवॉल करणे | 2000000/- |
| | **एकुण रक्कम रु. :-** | 19569701/- |

वर नमुद 1 ते 22 कामांना मान्यता प्रदान करण्यात येत असुन सदर कामांचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस प्रशासकीय मान्यतेकरीता सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. अनुदान व्यतिरिक्त जादा होणाऱ्या खर्चास मनपा फंडातुन खर्च करण्यासही मान्यता देण्यात येत आहे. अनुदाना व्यतिरिक्त जादा होणाऱ्ा खर्च मनपा फंडातून खर्च करण्यासही मान्यता देण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- बालाणी भगतराम रावलमल**

**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:८)** महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक मुलभुत सोयी सुविधांच्या विकास योजने अंतर्गत सन 2015-16 या आर्थिक वर्षासाठी वितरीत केलेल्या 5 कोटी निधी अनुदान अंतर्गत नव्याने प्रस्तावीत 1 ते 22 कामे करणेस व सदर कामी येणारे एकुण रक्कम रु.4,53,94,916/- मात्रचे खर्चास व सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणेस मान्यता देण्या बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावाचे वाचन केले.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.२०४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका क्षेत्रात प्रथमिक मुलभुत सोयी सुविधांच्या विकास योजने अंतर्गत सन 2015-16 या आर्थीक वर्षासाठी वितरीत केलेल्या 5 कोटी अनुदान व 5 कोटी मनपा हिस्सा असे एकुण 10 कोटी रक्कमेतुन 100 कामे प्रस्तावीत करण्यात आले. त्यानुसार विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचे कडील पत्र क्र. नपा/2/1/जा.क्र./31888/2016 दि.20/08/2016 अन्वये रक्कम रु. 49786742/- मात्र अनुदान व रक्कम रु.49786742/- मात्र मनपा हिस्सा असे एकुण 99573484/- मात्रच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली सदर कामांची निविदा प्रसिध्द करुन निविदा दर मागविण्यात आले व सर्वात

कमी दर आलेल्या मक्तेदार यांना कामाचा कार्यादेश देण्याची कार्यवाही सुरु असतांना दि.11 मे 2017 रोजी पारित केलेला शासन निर्णया नुसार ज्या शहरात अमृत योजना राबविण्यात येत असेल अशा शहरात रस्त्यांची व गटारी बांधकामाचे कामे करण्यात येवू नये असे सुचित करण्यात आलेले असल्याने वरील मान्यते नुसार मान्यता प्राप्त कामांपैकी काही रस्त्यांचे व गटारींची कामे रद्द करण्यात आले.रद्द झालेल्या कांमाच्या शिल्लक असलेल्या निधी अंतर्गत नव्याने मेहरुण तलावास डॉ नाहटा यांच्या घरापासुन ते स.नं.299 पर्यंत डबर पिचींग, रेलिंग, फ्लॉवर बेड, व जॉगीग ट्रॉक बांधकाम करणे कामाचे रक्कम रु.45321182/- मात्रचा प्रस्ताव तयार करुन जिल्हाधिकारी यांच्या शिफारस घेवून प्रशासकीय मान्यतेकरीता जिल्हाधिकारी जळगांव यांच्या मार्फत पत्र क्र.पालीका/2/ आर.आर./27400/2018 दि.11/06/2018 नुसार सदरचा प्रस्ताव विभागीय आयुक्त नाशिक,विभाग नाशिक यांचे कडेस सादर करण्यात आला.सदरच्या प्रस्तावास जिल्हास्तरीय समिती यांनी मान्यता देवून शासन निर्णय क्र.धोरण /2017/प्र.क्र.96/नवि-16 दि.12/12/2017 मधील निर्देशानुसार प्रशासकीय मान्यतेकरीता सदरचा प्रस्ताव प्रधान सचिव नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे कडेस पत्र क्र.नपा/2/1/734/2019 दि.13/02/2019 अन्वये सादर करण्याच आला सदर प्रस्तावास अदयाप पावेतो मान्यता प्राप्त झालेली नाही तसेच मेहरुण तलावावर पर्यटन विभागामार्फत मंजुर निधी अंतर्गत B&C मार्फत जॉगीग ट्रॅक व इतर बाबी मंजूर झालेले असल्याने यापूर्वीचा सदरचा प्रस्ताव रद्द करुन नव्याने खालील कामे प्रस्तावीत करण्यात आली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| 1 | प्र.क्र. 2 कांचन नगर स.नं. 11/1येथिल ओपन स्पेसमध्ये पेव्हर ब्लॉक, कंपाऊंडर वॉलवर चेनलिंक फेन्सींग,रंगकाम, बोअरवेल, सुशोभिकरण करणे. | 1025025/- |
| 2 | प्र.क्र.02 मध्ये बारसे कॉलनी जवळ स्मशानभुमी पासुन मेनरोड साईडला आर.सी.सी. गटार बांधणे | 415560/- |
| 3 | प्र.क्र.02 मध्ये ठिक ठिकाणी रोड क्रॉसिंगला स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | 263280/- |
| 4 | प्र.क्र.02 जळगांव स.नं. 509/8 बारसे कॉलनी मधील खुल्या जागेला चेनलिंग फेन्सिग करणे. | 405771/- |
| 5 | प्रभाग क्र.04 डि.पी.आरक्षण क्र.48 जागेवर शाळा व स्पोर्ट हॉट इमारत बांधणे. | 24098748/- |
| 6 | प्र.क्र.6 दत्त कॉलनी खुल्या जागेत ओप जिम साहित्य पुरविणे. | 500000/- |
| 7 | प्र.क्र. 7 पिंप्राळा ग.क्र.57/1-1 येथिल श्री.सुनिल भगत यांच्या घराजवळ रस्ता व गटार बांधणे. | 587902/- |
| 8 | प्र.क्र.8 निमखेडी शिवार गट क्र. 27 वॉल कंपाऊंड करुन विकासित करणे (योगा सेंटर 29.20 लक्ष) | 3220000/- |
| 9 | प्र.क्र.8 निमखेडी शिवार गट क्र. 122/2/2 खुला भुखंडास वॉल कंपाऊंड करणे | 1092802/- |
| 10 | प्र.क्र.9 गट.नं. 27 व गट.नं. 22+23 पिंप्राळा मधील ओपनस्पेसला चेनलींग फेंन्सींग करणे व खेळणी बसविणे. | 1483262/- |
| 11 | प्र.क्र.14 मेहरुण स.नं.444ओपन स्पेसमध्ये खेळणी पुरविणे व बसविणे. | 250000/- |
| 12 | प्र.क्र.14 मेहरुण स.नं.266/1धअ ओपन स्पेसमध्ये खेळणी पुरविणे व बसविणे. | 250000/- |
| 13 | प्र.क्र.14 मधील लक्ष्मी नगर जवळ पाटचारी क्रॉसिंगला स्लॅब कल्व्हर्ट बांधणे | 500000/- |
| 14 | प्र.क्र.14 गणपतराव ढेकळे व्यायाम शाळा मध्ये व्यायाम साहित्य पुरविणे व बसविणे. | 230000/- |
| 15 | प्र.क्र.14 रामेश्वर कॉलनीतील बालाजी किराणा जवळ गणपती मंदीरचे बाजुला कल्व्हेट, स्वामी समर्थ मंदीराजवळ रामेश्वर कॉलनी व इतर ठिकाणी कल्व्हेट करणे. | 510000/- |
| 16 | वार्ड क्र.14 मधील रामेश्वर नगर भागातील मेहरुण स.नं.251 मध्ये 18 मी.रुंद रोड क्रासिंगला गटार बांधुन स्लॅब टाकणे | 287636/- |
| 17 | प्र.क्र.15 मेहरुण अंतर्गत मेहरुण गावठण भागातील मनपा मालकीच्या खुल्या जागेत समाज मंदिर बांधणे | 2000000/- |
| 18 | प्र.क्र.15 जय भवानी शाळेच्या ओपन स्पेस पासुन ते सार्व. शौचालया पर्यत नाल्यास पुर्व साईडला संरक्षण भिंत बांधणे. | 2000000/- |

| | | |
|---|---|---|
| 19 | प्र.क्र.16 सर्व्हे नं. 506/4 व 506/5 खुली जागेवर संरक्षण भिंत बांधणे व टि.पी.2 प्लॉट नं. 516 श्रीकृष्ण ढाकेवाडी चेनलिंक फेन्सींग करणे व मुकूंद नगर स्लॅब कल्व्हेट बांधणे | 1499930/- |
| 20 | प्र.क्र.17 ड मध्ये स.क्र.145 मध्ये असलेल्या खुली जागेत पेव्हींग ब्लॉक व खुल्या जागेला संरक्षण भिंत (चेनलिंक फेन्सींग) व खेळणी बसविणे. | 1575000/- |
| 21 | प्र.क्र.18 मधील स.नं. 15/3/ब/4 खुल्या जागेस कंपाऊंड वॉल व विहीरीला संरक्षण जाळी बसविणे. | 1700000/- |
| 22 | प्र.क्र.19 सुप्रिम कॉलनी ग.क्र.166/1अ4,165,167/2,168/,162/1 मध्ये आरसीसी गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे. | 1500000/- |
| | **एकुण रक्कम रु. :-** | 45394916/- |

वर नमुद 1 ते 22 कामांना मान्यता प्रदान करण्यात येत असुन सदर कामांचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस प्रशासकीय मान्यतेकरीता सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील चंद्रशेखर शिवाजी**

**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:९)** आण्णा भाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत सन 2019-20 करीता प्रस्तावीत 1 ते 11 कामे करणेस व सदर कामी येणारे एकुण रक्कम रु.1,99,94,691/- मात्रचे खर्चास व सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणेस मान्यता देण्या बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावाचे वाचन केले.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २०५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की,नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत अनुषंगाने सन 2019-20 या आर्थीक वर्षाकरीता रक्कम रुपये 2 कोटी अनुदान महानगरपालिका जळगांव करीता तरतुद करण्यात येत असल्याचे जिल्हा प्रशासन अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव यांच्या कडेल पत्र क्र.नपा/1/सुजयो /57/2019 दि.24/07/2019 अन्वये सन 2019-20 या आर्थीक वर्षाकरीता सन 2018 मध्ये नव्याने झालेल्या प्रभाग रचने नुसार अनुसुचित जातींकरीता राखीव प्रभाग क्रमांक 1,3,4,10 व 13 मध्ये शासन निर्णय क्र.विघयो-102000/1595/प्र.क्र.189/नवि-4 मंत्रालय मुबई दि.05 मार्च 2002 च्या अनुषंगाने खालील कामे प्रस्तावीत करण्यात आली आहेत.

| **अ.क्र.** | **कामाचे नांव** | **अंदाजित रक्कम** |
|---|---|---|
| 1 | प्रभाग क्र.01 मधील फायर ऑफिस जवळ कंपाऊंडवॉल, पंप हाऊस तसेच विहीरीला सुरक्षाभिंत बांधणे. | 2350734/- |
| 2 | प्रभाग क्र.01 मधील भागात फायर ऑफिस समोरील जागेत पंप हाऊसच्या आजुबाजुस पेव्हींग ब्लॉक बसविणे. | 413740/- |
| 3 | प्रभाग क्र.03 अंतर्गत स.नं.77/5 व 77/6 जळगांव शिवार मध्ये आर.सी.सी.गटार बांधणे. | 1999980/- |
| 4 | प्रभाग क्र.03 मधील जुना असोदा रस्ता व जुना खेडी रोड येथे आवश्यक ठिकाणी रोड क्रॉसिंग स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | 2000000/- |
| 5 | प्रभाग क्र.04 मधील आर.एल.शॉप ते हनुमान मंदिर ते पंडीत जमुनाधरजी त्रिपाठी व्यायाम शाळे पर्यंत आर.सी.सी.गटार बांधणे | 1090000/- |
| 6 | प्रभाग क्र.04 जोशी पेठ भागातील भोई गल्ली मधील बोळ मध्ये आर.सी.सी.गटार बांधणे | 410000/- |
| 7 | प्रभाग क्र.10 अंतर्गत खंडेराव नगर परिसर (स्लम) व मांगवाडा भिलवाडा पिंप्राळा हुडको परिसरात आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे | 2908655/- |
| 8 | प्रभाग क्र.10 अंतर्गत गट नं.176/1,176/2 पिंप्राळा शिवार येथे कॉक्रीटचे रस्ते | 2500000/- |

| | | |
|---|---|---|
| | तयार करणे. | |
| 9 | प्रभाग क्र.10 पिंप्राळा गट नं.303,304 गणपती नगर परिसरात आर.सी.सी.गटार बांधणे | 800000/- |
| 10 | प्रभाग क्र.13 समता नगर मधिल पाथवे कॉक्रीटचे करणे. | 4314582/- |
| 11 | प्रभाग क्र.13 नेहरु नगर स.नं.415 ओपनस्पेस मध्ये क्लब हॉल बांधणे. | 1207000/- |
| | **एकुण रक्कम रु. :-** | 19994691/- |

वर नमुद 1 ते 11 कामांना मान्यता प्रदान करण्यात येत असुन सदर कामांचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस प्रशासकीय मान्यतेकरीता सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- तायडे सुरेखा नितीन**

**नगरसचिव :- विषय क्रं:१०)** महानगरपालिका मालकीच्या जागेवरील संस्थामध्ये मा.महापौर व मा.आयुक्त यांना सदर संस्थेच्या कार्यकारणीत पदसिध्द अधिकारी म्हणून नेमणूक करणेबाबत श्री.भगतराम रावलमल बालाणी,गटनेता, भा.ज.पा. जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव यांनी दिलेल्या प्रस्तावाचे वाचन केले.

**श्री.नितीन लढढा :-** मा.महापौरताई, मा.आयुक्त यांनी मला सांगावे की कोणत्या नियमानुसार आपण अशी भुमिका स्विकारु शकतो. याच्या संदर्भात सभागृहाला माहिती अवगत करावी.

**मा.आयुक्त :-** अशासकीय प्रस्ताव जरी असला तरी जागा महानगरपालिकाची असुन आपण असे म्हणु शकतो.

**श्री.नितीन लढढा :-** कार्यकारी अधिकारी म्हणुन त्यांना त्यांचे संस्थेत घेण्यात यावं. असे म्हटलेले आहे. तुमच्या महानगरपालिकेचा पैसा जर अलाहबाद बँक किंवा ॲक्सीस बँकेत ठेवलेला आहे तर उद्या तुम्ही हे दावा करुन टाकाल की, मा.महापौर आणि मा.आयुक्त यांना त्या ॲक्सीस बँकेमध्ये डायरेक्टर म्हणुन घेण्यात यावा. तुम्हाला तो पुर्णता अधिकार आहे. त्याच्यासाठी ठराव करण्याची आवश्यकता नाही. त्याच्या करारनाम्याच्या अटीशर्ती मध्ये हे सर्व गोष्टी ऑलरेडी नमुद असता. गोलाणी मार्केट मध्ये महानगरपालिकेचे निवासीका आहेत. बी.जे.मार्केट मध्ये निवासीका आहेत.

**मा.आयुक्त :-** आता ज्या ठिकाणी महानगरपालिकेची जागा आहे आणि त्या ठिकाणी संस्था चालु आहे. तर त्या संस्थेचे कामकाज पाहण्याच्या संदर्भात त्या संस्थेत महानगरपालिकेचे प्रतिनिधी असा हा उद्देश असावा.

**श्री.नितीन लढढा :-** तुम्हाला ते अधिकार आहे त्यासाठी ठरावाची आवश्यकता नाही. जर रस्त्याला चालत्या माणसाने ही तुमच्याकडे एखादी संस्थाबाबत तक्रार केली तर तुम्हाला तिथे जाऊन पाहावे लागेल. ते तुमचे अधिकार आहे. कुठलातरी प्रस्ताव आणायचा तो मान्य करायचा आणि कोणाच्याही संस्थेमध्ये कोण तुम्हाला प्रवेश कसा देईल.जे अधिकार अबाधी आहे त्यांच्यावर पुन्हा ठराव करायचं. या काही Logic तर पाहिजे. हे सर्व Executive Powers तुमच्याकडे सुरक्षीत आहे. आपण काही तरी वेगळं करत आहोत हे दाखविण्याचा काय हा वेगळा हट्ट आहे. जो पर्यंत आम्ही सत्तेत होतो.तो पर्यंत भारतीय जनता पक्षाची स्पष्ट भुमिका होती की ज्या ३८७ जागा ज्या काही कायदेशीर किंवा बेकायदेशीर वाटप झाल्या असतील. जे काही घडलं असेल. त्या परत घेण्याच्या संदर्भातली भुमिका, एकीकडे त्याच भुमिकेला छेद देऊन बदललेल्या भुमिकेच्या अनुषंगाने आज आम्हाला कायदेशीर प्रवेश हवा. तो ही त्यांच्या कार्यकारणी मध्ये. आता विवेकानंद प्रतिष्ठानला आपण एक जागा दिली हाती. उद्या आपण त्यांना म्हणणार का की तुमच्या कार्यकारणी मध्ये तुम्ही आम्हाला बॉडी मेम्बर म्हणुन घ्या. जा कुठे गैरकृत्या चालत असतील तर सभागृहाला ही नाही रस्त्यावर चालणाऱ्या माणसाला ही त्याचा अधिकार आहे. आणि तशी तक्रार करायची की सदर संस्था दिलेल्या अटीशर्तीचा उलंघन करत आहे तर मा.आयुक्तांनी कार्यवाही करावी.

**श्री.भगत बालाणी :-** मा.नितीन भाऊंनी जे विषय मांडला की हा ठराव करायचे कारण काय ? तुम्ही गाळे धारकांच्या संस्थाला या विषयाशी जोडु नका. महानगरपालिकेकडुन ज्या संस्थांना आपण जागा दिलेल्या आहे. करोडो रुपयांची जागा आपण त्यांना जनतेची सेवेसाठी मोफत दरात त्यांची सेवा होईल या हेतुने आपण केलेले आहे आणि नंबर दोन आजपावेतो कोठेही कोणत्याही संस्थेवर मनपाचे जळगांव महानगरपालिकेचा उल्लेखही नाही मा.आयुक्त साहेब व मा.महापौर साहेब या दोघांच्या नियुक्तीचा विषय नाहीये याच्यामध्ये जे ऐच्छिक सभासद आहेत सन्मा.सदस्य आहेत या सर्वांचा मान वाढणार आहे. आणि त्या कार्यालयामध्ये काही चुक होते किंवा एन्ट्री का नाहीये याचे कारण जसे पदसिध्द सदस्य असतात तर ते आहे. हे जे सुविधा त्यांना पुरवायच्या आहे ते व्यवस्थीत आहे का ते पाहण्यासाठी आहे. आणि आपण हे चुकीचे बोलले

की, भारतीय जनता पार्टी ३८७ जागा परत घेण्यासाठी उत्सुक आहे. परंतु ज्या गोष्टीला सामाजिक बांधीलकी तुम्हाला ही आहे, भारतीय जनता पक्षालाही आहे, आयुक्त साहेबांना ही आहे. ते टोकाची भुमिका घेत नाही म्हणुन मी त्यांचे धन्यवाद मानतो की ते टोकाची भुमिका घेत नाही. हायकोर्टाचा निकाल आहे. कुठला तरी मार्ग निघावा. सेवा संस्था, समाज संस्था जे आहे ते चालु आहे. महापौरांना पावर आहे, आयुक्तांना पावर आहे तर तेच आपण देत आहे. त्याचा तुम्हाला त्रास का होत आहे. याचा अर्थ तुमचा कुठेतरी त्रास होत आहे. तुमची कुठलीतरी संस्था असेल जिथे तुमचा हेतु साध्य होत नसेल. आम्ही हे मान्य करत आहे. तुम्हाला विरोध नोंदवायचा असेल तर नोंदवु शकता.

**श्री.नितीन लढढा :-** मा.महापौरताई, आता जसे भगतभाईंनी सांगितले की, याच्याने सन्मा.सदस्यांचा सन्मान वाढेल, मला सांगा असे सांगुन नगरसेवकांचा तो कदाचित अपमान ही दिसतो.फक्त या संस्थेमध्ये जाऊन नगरसेवकांना सन्मान मिळेल अशी काही बाब नाही.आपल्याला असलेले अधिकारांना आपण पुन्हा सर्टीफाईड करत आहे असे दिसत आहे. अधिकार ऑलरेडी आहे. सन्मा.सदस्यांना ही आहे. म.महापौरताईंना ही आहे आणि मा.आयुक्तांना ही आहे. मग परत त्यावर स्टॅम्प मारण्याची गरज का पडत आहे. हा एक महत्वाचा विषय आहे. चांगल्या सुसंस्कृत महिला महापौर आहे उद्या त्या पदावर कोण येईल माहित नाही. मग तश्या वेळेला त्या अश्या संस्थेंमध्ये वेगळया पध्दतीची भुमिका सुध्दा मांडली जाऊ शकते. लेबलींग केले जाऊ शकते. तर या विषयाला आमचा विरोध आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २०६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील विविध प्रभागात महानगरपालिकेतर्फे मनपा मालकीच्या जागा विकसित करणेसाठी विविध सामाजिक संस्था यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत उदा.शाळा, दवाखाने, ग्रंथालये, वाचनालये इत्यादी तसेच भविष्यात मनपाच्या मालकीचे जे भुखंड विकसित करणेसाठी संस्थांना देण्यात येतील अश्या संस्था बाबत जागेचे नियोजन, विकास करण्यासाठी महानगरपालिकेस समन्वया अभावी अनेक अडचणी निर्माण होत असतात.

उपरोक्त मनपाच्या मालकीच्या संस्थांना जागेत जळगांव शहर महानगरपालिकेचा उल्लेख करणे, कार्यकारणीच्या माहितीचा तपशिल, नागरीकांना नाममात्र दरांत सेवा तसेच सामान्य नागरीक / मनपा कर्मचारी यांना देण्यात येणाऱ्या सेवा-सुविधा यांचा माहितीचा तपशिल लावणे तसेच इतर आवश्यक बाबींसह सुचना संस्थेस देण्यात येणाऱ्या जागेच्या दर्शनी भागावर लावणे आवश्यक आहे. जळगांव शहर महानगरपालिकेने यापुर्वी दिलेल्या सर्व खुल्या जागांवर व ज्या संस्थेस जागा प्रदान करण्यात आलेल्या आहेत अश्या सर्व संस्थांबाबत काही तक्रारी असल्यास संस्था व नागरीक यांच्यात समन्वय ठेवुन तक्रारींचे निरसन करणे कामी व नियंत्रण राहावे म्हणून उपरोक्त संस्थांना दिलेल्या जागांवर मा.महापौर व मा. आयुक्त या पदांवर वेळोवेळी जे कार्यरत असतील त्यांची समन्वयक म्हणून नेमणूक करणे कामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकूल मते :- ५३ प्रतिकुल मते :- ११**

**सूचक :- बालाणी भगतराम रावलमल**

**अनुमोदक :- ढेकळे सदाशिव गणपतराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:११)** राष्ट्र संत शिरोमणी श्री.नामदेवजी महाराज यांची ७५० वी जयंती सन २०२० ला असल्याने शहरातील फायनल प्लॉट नं.३६५ (पारीक पार्क) औंकारनगर स्थित उदयानाचे नुतनीकरण व त्या उदयानास "राष्ट्र संत शिरोमणी श्री.नामदेवजी महाराज उद्यान " असे नामकरण करणेस व सदर उदयान विकासाकरिता हस्तांतरित करणेबाबत अध्यक्ष, श्री.क्षत्रिय अहिर शिंपी समाज हितवर्धक संस्था,जळगांव यांनी दिलेल्या प्रस्तावाचे वाचन केले.

**श्री.सचिन पाटील :-** यापुर्वी नांव दिलेले असल्यास तपासावे असे म्हटलेले आहे. तर मनपा ने पत्र दिलेले आहे की तपासणी केली असता यापुर्वी नाव दिल्याची नोंद आढळुन येत नाही. दि.०८/०८/२०१९ च्या पत्रानुसार जो आलेला प्रस्तावानुसार मनपाने योग्य ती कार्यवाही करावी.

**श्री.अनंत जोशी :-** मा.महापौर साहेब, सर्व प्रथम सर्व सभागृह आणि सन्मा.सदस्यांना जय नामदेव, पारीख पार्क उद्यानाचा जो विषय आहे संत शिरोमणी नामदेवजी महाराज यांचे वंदन करुन त्यांचा आदर राखुन हा जो पारीख पार्कचा विषय आलेला आहे त्या संदर्भात काही माहिती मला द्यायची आहे. जास्त वेळ होण्या आधी, कारण पिढी बदललेली आहे. सदस्य नविन आलेले आहे. अधिकारी नविन आलेले आहे. शहराची पिढी बदललेली आहे. बऱ्याच गोष्टी माहित नसतात त्यामुळे या विषयाचा खुलासा होणे गरजेचे आहे. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या विषयाच्या संदर्भात बोलण्यासाठी मी ऐवढयासाठी उभा आहे, या संस्थेचा सदस्य म्हणुनपण आणि हा जो विषय आहे हा माझ्या कुटुंबाशी संबंधीत असलेला विषय आहे. मी माझी भुमिका मांडत आहे. मला ५ मिनंट आपण द्यावे. ओंकारदास बाळाराम जोशी, म्हणजे माझे पंजोबा या शहरात १००-१५० वर्षापासुन त्यांचा रहिवास आहे.आणि १०० वर्षापेक्षा जास्त जमीनीचा व्यवसाय सुध्दा आहे. पहिले मोठया प्रमाणावर जमिनीचा व्यवसाय होता आता त्यात काही घट झालेली असेल. १०० वर्ष जुनं आमचा व्यवसाय, पिंप्राळा शिवार, मेहरुण शिवार, जळगांव शिवार जे जळगांव पुर्वीचं होते, २५-३० किंवा ४० वर्षापुर्वीचं, असे म्हटले जाते, माझे वय पण कमी आहे, हे सर्व जुन्या गोष्टी सांगत आहे मी, जळगांवचा विस्तार मोठया प्रमाणावर झालेला आहे, असे म्हणतात जुने लोकं, अर्धे जळगांव माझ ो आजोबांचं होतं. अशी परिस्थिती होती, आता तशी परिस्थिती नसली तरी कधी तरी अशी परिस्थिती होती. अजोबांचे शेत होते ते शेतांचे अनेक ले आऊट करुन विकले गेले आणि अनेक जागा आहे ज्या ठिकाणी महानगरपालिकेच्या मोकळया जागा आज ही आहे, त्यावर कुठलं ही उपयोग होत नाही, बऱ्याच जागा आहे त्यावर काही प्रकल्प उभे आहे. १०० ते १५० वर्षापासुन जमीनीचा व्यवसाय असतांना सामाजिक भान ठेवुन किंवा शहरामध्ये आपुलकी ठेवुन जे काही माझे पुर्वजांनी, माझे पंजोबा असतील, आजोबा असतील किंवा माझे वडील मोठे बाबा असतील, इतक्या जमिनी असतांना आज जळगांव शहरामध्ये मी मोजुन दाखवु शकतो अनेक शाळा, अनेक शाळांचे प्लेग्राऊड, म्हणजे खेळाचे मैदान जे असतात ते, व्यायाम शाळा, सामाजिक भवन, छोटी छोटी मंदिरे असतील किंवा उद्यान असतील ते माझे आजोबांच्याच ले आऊट मध्ये आहे. ती आता महानगरपालिकेचीच जागा आहे ते काही आज आमचे नाही, इतके सर्व जागा असुन ही या सभागृहातील सदस्यानी, पदाधिकाऱ्यानी किंवा जे जानते असतील जेष्ठ असतील ज्यांना माहिती आहे. त्यांनी सिध्द करुन दाखवावं. माझे कुटुंबाने, माझे वाडवडलांनी एकाही ठिकाणी स्वत:चा नाव दिलेलं आहे. जेव्हा रु.११०००/-, रु.२१०००/- किंवा रु.५१०००/- अशी अपेक्षा ठेवली जाते की त्या ठिकाणी माझं नांव द्या. बोर्डावर किंवा कमानीवर माझं नांव द्या. या १००-१५० वर्षात या शहरात खुप गोष्टी माझ्या वाडवडलांच्या हातुन घडल्या असतील किंवा त्यांच्या अनुषंगाने घडल्या असतील. या ठिकाणी माझे वाडवडलांचं एका ही ठिकाणी नांव शोधुन दाखवावं. ओंकारेश्वर देव स्थान जे जळगांव शहराचा मानबिंदु आहे, संपुर्ण महाराष्ट्रात याची ओळख आहे, श्रध्दा स्थान आहे. ते सुध्दा माझे आजोबांनी स्वखर्चाने स्वत:च्या जागेवर उभारलेले आहे त्या काळी. अनेक छोटी मंदिरे असतील, व्यायाम शाळा असतील, उद्यान असतील आज ही अनेक जागा अश्या आहे जे विकसीत होतील या अनुषंगाने, आपल्या शहराच्या दृष्टीने म्हणत आहे मी, फक्त तीन ठिकाण आहे संपुर्ण शहरात आणि पारीख पार्क चौथा, ओंकार नगर ज्या ठिकाणी हे पारिक पार्क स्थित आहे. जो बगीचा आहे पारीख पार्क हा ओंकार नगर मध्ये आहे. ओंकार नगर म्हणजे माझे पंजोबा ओंकारदास बाळाराम जोशी मधील ओंकार हे त्यांचे मुलांनी म्हाणेज माझे आजोबांनी त्यांची प्रेम म्हणा, आपुलकी म्हणा, श्रध्दा म्हणा ते नांव दिले ते ओंकार नगर, हे ओंकार नगर स्वतंत्र्यांचे जवळपासचे आहे. १९४८ ते १९५२ ह्या काळातला आहे. त्यानंतर मोहन नगर माझे आजोबांचे भाऊ ज्यांचे निधन लवकर झाले. त्यानंतर जय नगर ज्या ठिकाणी ओंकारेश्वर मंदिर आहे. माझे आजोबा त्यांचं ही निधन लवकर झालं. त्यांचे दोन भावांनी हे नांव दिलेलं आहे. जय नगर, मोहन नगर आणि ओंकार नगर या व्यतिरिक्त ही त्यांचे स्वत:चे ले आऊट, त्यांची शेती, त्यांनी प्लॉटींग केल्या आणि त्यांनी स्वत:च्या मेहनतीने कष्टाने उभारलेल्या जागा विकल्या. त्या कॉलनीला त्या भागाला त्यांनी नांव दिलं. त्यांनी कोणाला आग्राह केलं नाही की तुम्ही आमचे नांव द्या. तुम्ही आमची जागा आमची ओपन स्पेस वापरत आहे. कोणत्याही संस्थेला केले नाही. आज आम्ही ही करत नाही. ही आमची चौथी पिढी आहे. असे असतांना ओंकार नगर मध्ये पारीख पार्क आज स्थित आहे. त्या ठिकाणी असा कुठलातरी प्रस्ताव येणे कोणीतरी असा प्रस्ताव देणे संत महात्मांचं थोर पुरुषांचं, राष्ट्रीय संतांचं, राष्ट्रीय पुरुषांचं आदर मला ही आहे कोणीच त्याला नाकारत नाही आणि कधीच नाकारणार नाही. पण पारीख पार्क बद्दल जे काही चुकीचं सगळ झालं. प्रस्ताव देणाऱ्यांचे ही मला आश्चर्य वाटतं. शहरात सेकडो जागा उपलब्ध असतांना ४०० च्या वर जागा उपलब्ध असुन त्यातल्या २०० किंवा २२५ जागा आज वापरात आहे. तिथे हॉल असतील, व्यायाम शाळा असतील किंवा काही दुसरे

असेल. परंतु १५०-२०० जागा आज ही मोकळे असतांना तीच जागा का पाहिजे हा हट्ट मला कळालेला नाही. दुसरा विषय आपल्याकडे एखादा प्रस्ताव येतो तो आपण सभागृहासमोर ठेवायचा का याचा कारण सांगतो.सभागृहात प्रस्ताव ठेवतांनाही सदस्यांनी किंवा पदाधिकाऱ्यांनी विचार केला पाहिजे की आता एक समाजाने राष्ट्रीय संत नामदेवजी महाराज यांचे नांवाने त्या जागेची मागणी केलेली आहे. तर अश्या संताचा विषय येणे मी विरोध करणे आपण त्यावर चर्चा करणे हे देखील पाप आहे. पण मला हे करावे लागत आहे. कारण माझी तेथे गुंती आहे. कागदपत्रात चुकीचं केलेलं आहे. ते पारेख नाही, पारीख नाही पारीख आहे ते माझे आडनांव आहे. आम्ही जोशी लावतो. समाज पारीख, आडनांव पारीक आम्ही जोशी लावतो. आमच्या कुटुंबाची १००-१५० वर्षपुर्वीची असलेली एकमेव खुन ते पारीक पार्क आहे. पदाधिकारी या शहराचे रहिवासी, या शहराचे नागरीक, हे वर्षानुवर्ष पदाधिकारी सुध्दा येथे राहत आहे. आपण बाहेरुन आलात साहेब, उपायुक्त साहेब बाहेरुन आले आहे. पण अनेक अधिकारी जे जळगांव चे रहिवासी आहे. त्यांना हे सगळं इतिहास माहित आहे. भास्कर भोळेंनी त्याच्यावर रिमार्क केलेली आहे स्वाक्षरी केलेली आहे. त्यांना सुध्दा या सर्व गोष्टी घटना त्यांना माहित असाव्या त्यांच्या वयाच्या हिशोबाने, आणि पारिक पार्क जे आहे हे प्रचलित नांव आहे हे आजचे नाही. जवळपास ५० वर्षापासुन हे प्रचलित नांव आहे. तेथील लोकं Postal Address म्हणुन वापरतात, ओंकार नगर, पारिक पार्क जवळ, प्रचलित आणि तोंडावर पडलेलं नांव आहे. त्या ठिकाणाची प्रवेशद्वार जे ५० वर्षापुर्वी बनविलेली आहे जी आज ही तशीच आहे. त्या ठिकाणी त्या कमानीवर त्या द्वारावर सिमेंटाने कोरलेले नांव आहे. तेथे माझे पंजोबा, आजोबा, माझे मोठे बाबा किंवा आम्ही जाऊन कोरलेला नाही. तेथे कोणशिला आहे. १९७२ मध्ये कोठरजी संगजी म्हणुन नगरसेवक होते. त्या भागाचे आणि यशवंत सोमा बारी म्हणुन अध्यक्ष होते आणि चौधरी उपनगराध्यक्ष होते. त्यांनी परत त्या बगीच्याला नांव दिले असेल. कोणशिला लाऊन त्याला तसे नांव दिले. ती कोणशिला आज ही त्या प्रवेशद्वाराजवळ लागलेली आहे. सन २०१२ साली श्री.विष्णु भाऊ महापौर असतांना त्यांनी त्या ठिकाणी १०-१५ लाख रुपये लावुन त्या ठिकाणी संपुर्ण Renovation केलं. त्यावेळेची ही कोणशिला देखील तेथे आहे. त्यावर देखील पारिक पार्क म्हणुन त्याचा उल्लेख आहे. हे सगळे Evidence असतांना याच्या पुढची कडी म्हणुन एखादी जागा आपल्याकडे सुप्रीम कोर्टाचे आणि कोर्टाचे आदेश असतांना की आपण कुठलीही एखाद्या कॉलनी भागातील जागा वेगळया संस्थेला किंवा व्यक्तीला आपण देऊ शकत नाही. त्यावर अधिकार जो असतो त्या भागातील नागरीकांचा असतो ज्यांनी त्या ठिकाणी प्लॉटे घेतलेले आहे. प्लॉट घेतांना त्यांनी त्या जागेचे पैसे भरलेले आहे. त्या रहिवाश्यांचा त्या प्लॉट धारकांचा त्यावर सर्वात प्रथम हक्क आहे. कोर्टाचे देखील निर्देश या अनुषंगाने आहे. असे असतांना या ठिकाणी टि.पी.स्कीम आहे. सन १९९२-९३ ला स्कीम झाली होती. हा जो प्लॉट आहे हा टि.पी.स्कीम - २ चा प्लॉट आहे. मी काल जाऊन जर आपले अधिकाऱ्यांकडे जे अधिकारी ज्यांना टेबलावर बसुन काही जमत नाही. त्यांच्याकडे जर एखाद्या पदाधिकाऱ्याचा प्रस्ताव आला. तर कुठलीही शाहनिशा न करता, कुठलीही मेहनत न घेता, फक्त पेन रगडायचा आणि पेनाने कागद काळा करायचा फक्त इतकीच आपण मेहनत घेता. जर हे आपल्या अधिकाऱ्यांनी काही केलं असतं तर ही वेळ आली नसती की हे झाले कसे, याचा शासकीय उतारा जे मी काल काढुन आणला, त्या शासकीय उताऱ्यावर सुध्दा पारिक पार्क हे असे नांव आहे. मी उतारा मा.महापौरताईंना दिलेला आहे, मा.आयुक्त साहेबांना दिलेला आहे. सिटी सर्व्हेच्या उताऱ्यावर सुध्दा तशीच नोंद आहे. मला आनखी याच्यात सांगायचे आहे की हा जो विषय आहे. जसा अप्पांनी सांगितल्याप्रमाणे मी सगळयांना सांगतो की, वादविवाद होत असतील, माझ्या कडुन बोलण्यात चुका होत असतील. मी कधीतरी वागण्यात चुकत असेल. हे माझ्या जिवाढ्याचा विषय आहे, माझे वाडवडीलांचा विषय आहे. म्हणुन मी हात जोडुन सांगतो सगळयांना की तुम्ही हा विषय व्ययकतीक घेऊ नका, हा झाला प्रस्तावाचा विषय, त्याची पार्श्वभुमी, त्याचं भुतवगळ किंवा इतिहास, नंतर अधिकाऱ्यांचा विषय फक्त जागेवर बसुन फक्त हात काळा करायचं, नोंद आढळुन येत नाही फक्त असे लिहुन मोकळे व्हायचे, कोणतीही मेहनत घ्यायची नाही. कोणाच्या भावना जुडलेल्या आहे, काय इतिहास आहे काही बघायचे नाही. मी परत सांगतो कोणीही वाद घालुन गैरसमज करुन घेऊ नका. भारतीय जनता पक्षाची सत्ता आहे, म्हणजे माझं वय ४२-४३ वर्ष आहे. मी लहान्याचा मोठा येथे झालेलो आहे, मी पण भारतीय जनता पक्षा कार्यकर्ता राहिलेलो आहे, पदाधिकारी राहिलेलो आहे. मी पण अगदी मनपासुन आणि मेहनतीने काम केलेलं आहे. काही कारणामुळे बाहेर पडलो, ५-८ वर्षापुर्वी ५८ नगरसेवक या वेळी निवडुन आलेले आहे. जळगांव शहराच्या इतिहासात जे कधीच नाही घडलं ते घडलेले आहे. गेल्या ५० वर्षापासुन तो बगीचा त्या ठिकाणी आहे नांव त्या ठिकाणी आहे. यापुर्वी असा कुठला ही प्रस्ताव पटलावर आला नाही आणि कोन्ही आणला नाही. मला खेदाने सांगावं लागतं की माझ्या

कुटुंबाने भारतीय जनता पक्षासाठी अहोरात्र मेहनत घेतलेली आहे. प्रत्येक बाबतीत हे कोणीही नाकारु शकत नाही, आर्थिक असेल किंवा इतर माझ्या कुटुंबाने भारतीय जनता पार्टी, जनसंघ, जनता पार्टी ते भारतीय जनता पार्टी पर्यंत मेहनत घेतलेली आहे हे पक्ष उभारण्यासाठी, पक्षाची बांधणी करण्यासाठी, मी त्याचा साक्षीदार आहे. मी लहानपणापासुन बघत आलेलो आहे. असे असतांना माझे मोठे बाबा, माझ्या वडीलांचे सख्खे मोठे भाऊ या संस्थेमध्ये सभासद राहिलेले आहे, अनेक वर्ष नगरसेवक राहिलेले आहे. उपनगराध्यक्ष राहिलेले आहे. प्रभारी नगराध्यक्ष राहिलेले आहे. त्यानी पक्ष उभारणीसाठी पक्ष बांधणीसाठी काम केलेले आहे. भारतीय जनता पक्षाकडुन असा प्रस्ताव येतो कसा आणला कसा जातो, याची शाहनिशा का नाही केली जात. अधिकारी बरेच असे असतात जे फक्त कागद काळा करतात आणि भास्कर भोळे बद्दलतर मला चांगलेच माहिती आहे. ते माझे मोठे भाऊ आहे, माझे मित्राचे भाऊ म्हणजे माझे भाऊ आहे. ते कश्या पध्दतीचे काम करतात. पण त्यांनी फक्त कागद काळा केला नाहीतर हा विषय इतपर्यंत आलाच नसता. भारतीय जनता पार्टी पुढे जे काही मला बोलायचं होते ते देखील मी बोललो, मी अधिकाऱ्यांबद्दल ही बोललेलो आहे, आपल्याकडे मी Evidence सुध्दा दिलेले आहे. सर एखादा प्रकल्प उभारतांना शहरातील एखादा व्यक्ती, एखादी संस्था, एखादा कुटुंब जर महापालिकेशी किंवा तत्कालीन नगरपालिकेशी जोडला गेलेला असेल तर त्याची बांधीलकी त्या व्यक्तीची त्या संस्थेची महानगरपालिकेची बांधीलकी ही व्यक्ती म्हणुन नसते. संस्था म्हणुन असते, पक्ष येतात आले जातील, पदाधिकारी येतात आले जातील, अधिकारी येतात आले जातील. ही संस्था इथेच असते. एखादी Commitment बांधीलकी जर त्या तत्कालीन वेळेस कोणी दिलेली असेल. ती Commitment पाडली गेली पाहिजे. जर हे Commitment हे बांधीलकी जपली नाही. तर मला सांगा या शहराच्या विकासासाठी सामाजिक कार्यासाठी उपक्रमासाठी कुठला माणुस, कुठली व्यक्ती, कुठली संस्था पुढे येणार आहे. आता भाऊंचे उद्यान तयार झालेलं आहे. जागा जरी आपली असली, शासनाकडुन आपण घेतली मग ती जागा आपण जैन उद्योग समुहाला दिलेली आहे. आज ठिक आहे. कोटी रुपये खर्च करुन त्यांनी गांधी उद्यान बनविले, भाऊचे उद्यान बनविले. त्या ठिकाणी ५ लाख रुपये महिना ते फक्त Maintainance वर खर्च करत आहे. गांधी उद्यानाचे वेगळं असेल. ते देखरेख करत आहे. म्हणुन आपल्याला सुस्थितीत दिसत आहे तो बगिचा महापालिकेचे Under मध्ये राहिले असते तर त्याचे १२ वाजले असते ६ महिन्यात. इतके सगळे ते लोकं करत असतांना २०-२५ वर्षानंतर एखादी बॉडी वेगळी आली, पदाधिकारी वेगळे आले, दुसरा पक्ष आला किंवा दुसरा अधिकारी आला आणि त्यांना वाटलं की, हे भाऊंचा उद्यान नको हे काकांचा उद्यान किंवा मामांचा उद्यान पाहिजे आपण करुन मोकळे होणार का ? याच्यात बांधीलकी कुठे आली याच्यात Commitment कुठे आली. माझी सर्व सभागृहाला, पदाधिकाऱ्यांना सर्वांना विनंती आहे, सभ्य ते विचार केला पाहिजे आणि सर्वांनी योग्य तो निर्णय घेतला पाहिजे. संत नामदेव महाराजांनी आपल्या देशात नाही अनेक देशात भर केलेली आहे आणि मी त्या समाजाचा जावाई आहे.

**श्री.सचिन पाटील :-** बंटी भाऊ तुमचं जे बोलणं आहे ते खरोखर सत्य आहे. त्यात काही चुकीचे नाही. यात कुठेतरी आपल्या भावनांना छेद पोहचलेला जाणवत आहे. आपल्याकडुन या अश्या प्रकारे आलेल्या प्रस्तावाला उत्तर देणे ही पण चुकीची बाब आहे. याची आपण दखल घेतली पाहिजे. अशासकीय प्रस्ताव जरी असला तरी मी माफी मागतो की, आपले भावना दुखविण्यात आल्या पण राष्ट्रीय संत शिरोमणी नामदेव महाराज यांचा जो प्रस्ताव आलेला आहे तो आम्हाला तेवढाच आदरणीय आहे. भारतीय जनता पक्षाकडुन आपली व आपल्या कुटुंबाची व्यक्तीगत भावना दुखावी हा हेतु नाही. फक्त इतकेच सांगतो प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** आज सभागृहात हा विषय आला आणि या ठिकाणी बंटी जोशी जे काही बोलले, हे सगळा विषय पार्टी मिटींग मध्ये झालं, पार्टीची मिटींग जरी असली तरी, त्यात काही मतभेद असतात. आणि हे सर्व विषय आधीच सन्मा.नगरसेविका शुचिताताईंचे मिस्टर श्री.अतुलसिंह हाडा यांनी मांडला आणि मी पण बोललो की हा विषय नसावा. बंटी जोशींनी जितकं या ठिकाणी मांडलेलं आहे ते १००% खरं आहे. भारतीय जनता पक्षाशी त्यांचे परिवाराचे जे नाते आहे. पहिल्या पासुन ते आहे. त्यात काही ही दुमत नाही. जे टेक्नीकल मुद्दे या ठिकाणी बंटी भाईनी मांडले तर असे करता येईल का ? आम्ही जर ठराव ही केला तर असे होईल का ? होणार नाही. म्हणुन आपण हा ठराव या ठिकाणी करायचा नाही.

**श्री.अनंत जोशी :-** हे तुम्ही जरी केलं तर टी.पी.स्कीम मध्ये जितके प्लॉट धारक आहे ते सर्वांची संमती तुम्हाला आणावी लागेल.

**श्री.कैलास सोनवणे :-** तो विषय येणारच नाही. आम्हाला काही चांगलं वाटत आहे या ठिकाणी असे नाही. संत शिरोमणी महाराज बद्दल आदर आहे आणि बाकीच्यांच्या संतांबद्दल आदर सर्वांनाच आहे, महाराष्ट्र ही संताची भुमी आहे. आपण

त्यांच्यासाठी एखादी चांगली जागा शोधावी आणि तेथे काय काय Development महानगरपालिका मार्फत करता येईल ते पाहवे. आणि शिरोमणी महाराज फक्त शिंपी समाजाचे नाही सर्वांचे आहे. तो गरीब समाज आहे. तर आपण मनपाकडुन अतिशय चांगलं काही Develop करुन द्यावे आणि हा विषय मागे घेण्यात यावे.

**श्री.अनंत जोशी :-** सर्वांचे धन्यवाद.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.२०७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील फायनल प्लॉट नं.३६५ (पारीक पार्क) ओंकारनगर स्थित उदयानाचे नुतनीकरण व त्या उदयानास “राष्ट्र संत शिरोमणी श्री.नामदेवजी महाराज उद्यान ” असे नामकरण करणेस व सदर उदयान विकासाकरिता हस्तांतरित करणेबाबत अध्यक्ष, श्री.क्षत्रिय अहिर शिंपी समाज हितवर्धक संस्था,जळगांव यांनी दिलेला प्रस्ताव मागे घेण्यात येत असून श्री.क्षत्रिय अहिर शिंपी समाज हितवर्धक संस्था,जळगांव यांना उपरोक्त जागे ऐवजी जळगांव शहरातील महापालिका मालकीची अन्य चांगली जागा देवुन ती विकसित करुन देणेस मान्यता प्रदान करणेत येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील सचिन भिमराव**

**अनुमोदक :- मराठे जितेंद्र भगवानराव**

**नगरसचिव :- ज्यादा विषय क्रं:१)** जळगांव शहरातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र.५३ (जुना राष्ट्रिय महामार्ग क्र.६) वरील कालिंका माता चौका पासुन ते खोटे नगर चौकापर्यंतच्या नविन विकसित होणाऱ्या चौपदरी करण्याच्या रस्त्यावर नविन पोल उभारुन व काही प्रमुख चौकांमध्ये हायमास्ट पोल उभारुन प्रकाश व्यवस्था करण्याचे काम शासनाकडुन मागणी करुन प्राप्त होणाऱ्या निधितुन अथवा अन्य योजनेतुन सदर काम हाती घेणे कामी अपेक्षित खर्च रक्कम रु.३,०६,३४,९०३/- मात्रला मान्यता देणे अथवा B.O.T. तत्वावर करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावाचे वाचन केले.

**श्री.भगत बालाणी :-** हा विषय B.O.T. तत्वावर न करता, शासकीय निधी किंवा मनपा निधीतुन करण्यात यावा व हा रस्ता कालिंका माता मंदिर चौक ते बांभोरी पुलापर्यंत विकसीत करण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २०८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र.५३ (जुना राष्ट्रिय महामार्ग क्र.६) वरील कालिंका माता चौका पासुन ते खोटे नगर चौकापर्यंतच्या रस्त्याच्या रुंदी करण (चौपदरी करणे) करुन विकसित करण्याचे काम व त्यावर नविन इलेक्ट्रीक पोल व आवश्यकतेनुसार चौकांमध्ये हायमास्ट पोल उभारण्याचे एकत्रीत प्रस्ताव राष्ट्रीय महामार्ग ६ यांनी मंजुरीसाठी केंद्र शासनाकडे पाठविण्यात आलेला होता. परंतु रस्ता रुंदीकरण्याच्या (चौपदरी करण करणे) कामासाठी आम्ही मंजुरी देऊ शकतो परंतु नविन पोल उभारुन आवश्यकतेनुसार लाईट व्यवस्था करण्याचे काम हे स्थानिक स्वराज्य संस्थेचे असल्याने सदर कामास येणारा खर्च व अंदाजपत्रक त्यांच्याकडुन करावा असे सांगण्यात आले व सदर काम लवकरच सुरु करण्यात येणार असल्याबाबतचे पत्र राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणा कडुन जा.क्र./NNAI/PIU-JAL/NH-६ Jalgaon City Road – २०१९/६३० दि.२५/०७/२०१९ अन्वये कळविण्यात आलेले आहे. त्यांनी हाती घेतलेल्या रस्ता रुंदीकरण्याच्या कामात पथदिवे उभारण्याच्या कामाचा समावेश केलानसल्याने सदर पथदिवे उभारण्याचे काम महानगरपालिकेने करावयाचे सुचविले आहे. सदर पत्रात भारतीय राष्ट्रीय प्राधिकरणा कडुन (जुना राष्ट्रीय महामार्ग क्र.६) वरील नविन स्ट्रिट लाईट पोल उभारण्याचे काम चौपदरी करण्याच्या कामात तयार करण्यात येणाऱ्या डिव्हाडर मध्ये पथदिवे उभारण्यात यावे असे पत्रात नमुद केलेले आहे. तरी सदर कामी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग व कालिंका माता चौका पासुन ते खोटे नगर चौकापर्यंत ९ मीटर उंचीचे ३८८ पोल तसेच आकाशवाणी चौक, इच्छादेवी चौक, अजिंठा चौकात प्रत्येक १ असे २० मिटर उंचीचे एकुण ३ व १२.५ मीटर उंचीचे १४ हायमास्ट पोल उभारणीचे कामाचे (डी.एस.आर) सन २०१८-१९ च्या

दर सुचीनुसार रक्कम रु. ३,०६,३४,९०३/- इतका खर्च (GSTसह) अपेक्षित आहे. याबाबतचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन सदरच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली आहे.

उपरोक्त प्रमाणे जळगांव शहरातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र.५३ (जुना राष्ट्रिय महामार्ग क्र.६) वरील (जळगांव मनपा हद्द) भुसावळ रोड, दुरदर्शन केंद्रा पासुन ते बांभोरी पुलापर्यंतच्या नविन विकसित होणाऱ्या चौपदरी करण्याच्या रस्त्यावर नविन पोल उभारुन व काही प्रमुख चौकांमध्ये हायमास्ट पोल उभारुन प्रकाश व्यवस्था करण्याचे काम करणेस येणारा अपेक्षित खर्च रक्कम रु. ३,०६,३४,९०३/- मात्रला तसेच सदरचे काम शासकीय निधी अथवा मनपा फंडातून करणेस मान्यता प्रदान करणेत येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- बालाणी भगतराम रावलमल**

**अनुमोदक :- मराठे जितेंद्र भगवानराव**

**नगरसचिव :- आयत्यावेळेचा विषय क्रं:१)** जळगांव शिवार गट नं.१०३/३ मधील मनपाची खुली जागा जय श्री.विठुराया बहुउद्देशिय मंडळ जळगांव या संस्थेस देणेबाबत आलेल्या पत्राचे वाचन केले.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २०९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, जय श्री विठुराया बहुउद्देशिय मंडळ दिनकर नगर जळगांव यांनी दि.२९/०८/२०१९ रोजी दिलेल्या पत्रात नमुद केले प्रमाणे जळगांव शिवार गट नं.१०३/३ मधील मनपाची खुली जागा तेथील रहिवासी यांना सामाजीक, धार्मिक, शैक्षणिक व आरोग्य विषयक कार्यक्रम घेणे कामी खुल्या जागेत वृक्षरोपन, फुल झाडांचे संगोपन व लहान मुलांना क्रिडांगण तसेच बालसंसकार केंद्र, वृध्दांकरीता बैठक व्यवस्था, वाचनाल इ. बाबत वापर करावयचा असल्याने सदरची जागा संस्थेस देणेबाबत नमुद केले आहे तरी सदर संस्थेस जळगांव शिवार गट नं.१०३/३ मधील म.न.पा.ची खुली जागा जय श्री.विठुराया बहुउद्देशिय मंडळ यांना म.न.पा. चे अटी शर्तीस अधिन राहुन देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय /आदेशाप्रमाणे अवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- कैलास नारायण सोनवणे**

**अनुमोदक :- किशोर रमेश बाविस्कर**

**मा.महापौर :-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.
राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**
**(सिमा सुरेश भोळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**